REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०　अकोला रविवार ता० ६ माहे आगष्ट सन १८७६ इ०　अंक ३२

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जलम आणि खामगाव स्टेट रेल्वे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेल्वेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. यावरून प्यासेंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

| | |
|---|---|
| फर्स्ट क्लास .................... | १ रुपया |
| नेटिव लोक .... ............... | ४ आणे |

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चेही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिरात

## सर्वज्ञानसंग्रह.

विनंतीयुक्त सूचना.

प्रति महिन्यास निघणारें पुस्तक.

सर्वांस विनंती जे सप्तंबर महिन्यापासून पुढें प्रत्येक महिन्यास मी खालीं सही करणारा वरील नावाचें पुस्तक डिमि कागदाच्या अष्टपत्री सांच्यावर १२० पृष्टांचें टैपावर छापून प्रसिद्ध करण्याचा हेतु राखतों हा ग्रंथ न्याशनल छापखान्यांत मध्यम टैपानीं सुवाच्य रीतीनें छापणार. ह्या ग्रंथास विद्यावृद्धि, ज्ञानवृद्धि इच्छुकांनीं, आणि सतत् नवीन सत्कार्यास आश्रयभूत उत्तेजन देणार सद्गृहस्थानीं, व परोपकारी मंडळींनीं मला साह्य द्यावें, अशी माझी त्यांस प्रार्थना आहे. ह्या ग्रंथाची अवश्यकता असावी. व सर्वांनीं व, मुख्यत्वें प्रापंचिकांनीं, हा ग्रंथ निरंतर संग्रहीं ठेवावा ह्मणून ह्या ग्रंथांत सर्वोपयुक्त, व मान्य विषय लेखन करण्याची योजना केली आहे. माझें मत असें आहे कीं, हा ग्रंथ मुलांस, व स्त्रीशिक्षणासही मोठा साह्यभूत होईल.

ग्रंथांत येणारे विषय.

१ नीतिसंग्रह; २ सर्व प्राकृत प्रियग्रंथांतील इतिहास; ३ एक सुंदर कल्पित गोष्ट. ४ एकंदर वाचकांस उपयोगी पडणारा सर्वमान्य सुभाषितसंग्रह, त्यांत समश्लोक, संस्कृत आर्या, अभंग, दोहरे, व इंग्रजी अर्थ; ५ एक प्रकारचा कोश कीं, ज्यांत बहुशः अवश्यक वस्तूंचीं मराठी, इंग्रजी इ० नावें अनुक्रमानें येत जावीं; ६ प्रत्येक महिन्याच्या वर्तमानाचा समुच्चय, ७ दिवाणी फौजदारी कायदे; धर्मशास्त्रानुरूपनोंध; ८ कवितेस उपयोगी पडणारीं साधनें. मुलींस उपयुक्त होणाऱ्या गोष्टी अगर गाणीं इ० इ० इ० व यापेक्षां कित्येक फरमाशीवरून नवीन विषय थोडे थोडे अनुक्रमानें येतील.

अशा करारानें पुस्तक रचण्यास किती श्रम लागतील हें कोणाच्याही लक्षांत साहजीकरीत्या येईल, ह्मणून या ग्रंथाची किंमत सांप्रत प्रतिवर्षाची १० रुपये सुर्ती ठेविली आहे. बरेच आश्रय जमले आहेत, परंतु पुरतें साह्य मिळाल्यावांचून सुरवात होणें नाहीं.

प्रथम हा ग्रंथ कसा निघणार त्याबद्दल नमुन्यासह मोठीं पत्रकें सर्वांस व आश्रयदात्यांस प्रसिद्ध होतील त्यांत सविस्तर मजकूर लेखन होईल.

पत्ता— पत्र घेणारानीं आपलीं नावें मुंबईंत न्याशनल छापखान्यांत, ठाण्यास सूर्योदयांत, साताऱ्यांत महाराष्ट्रमित्रांत, व वडोदें येथें सिद्धनार्थी गणपतिमंदिरांत मालकाचे नावें पाठवावीं.

मुंबई, १ली जून सन १८७६ इसवी.

विरेश्वर सदाशिव छत्रे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपल्या पत्रामध्यें खालीं लिहिलेला मजकूर प्रसिद्ध व्हावा या अशेनें चार ओळी रवाना करितों.

" इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत होण्यास सुलभ उपाय " इंग्रज लोक हिंदुस्थानामध्यें १६वे शतकांमध्यें व्यापारी ह्मणून आले त्यापूर्वी पोर्तुगीज, डच आणि फ्रेंच हे इकडे वसाहत करीत होते. त्या लोकांचा पाडाव करून इंग्रज सर्व हिंदुस्थानचे राजे झाले. यांची सत्ता वाढण्यास मूळ कारण औरंगजेब बादशहा ह्मटल्यास चालेल. कारण या लोकांस हिंदुस्थानांत व्यापार करण्यास खलीत्याद्वारें औरंगजेब बादशहानें परवानगी दिली पुढें त्यांच्या पत्नीस औषधोपचार करून मुलखामध्यें वखारी बांधण्यास यांनीं हुकूम मिळविला. सर्व गोष्टींमध्यें मनुष्यास एक दोन गोष्टी फारच जरूरीच्या आहेत. त्यांतमध्यें रहाण्यास घर हें एक होय. मुळारंभीं इंग्रजांस राहण्यास जागा मिळाली. पुढें मुंबईबेट मिळालें. नंतर गोरे शिपाई राजेलोकांजवळ नौकरीस राहिले. आमचे हिंदु राजे भोळसर त्यांस पुढें काय परिणाम होईल याजबद्दल विचार नाहीं. तशांत जितके राजे या भरतखंडांत होऊन गेले ते सर्व मराठे, रजपूत, शिक आणि मुसलमान याच जातीचे होते. हे लोक शिपाईगिरीच्या उपयोगीं आहेत ब्राह्मणी कावा आणि आत्महित हें यांस माहित नाहीं, ह्मणून या लोकांवर असा दुर्घट दिवस येऊन कित्येक लोक स्टेट प्रिझनर झाले, कित्येक राजाचे सरदार झाले, कित्येक राज्यरहित झाले. अस्तु. यांत साताराचे राज्याविषयीं मला फार वाईट वाटतें.

सातारचें राज्य बेवारस ह्मणून इंग्रजानीं घेतलें. हे लोक कोणतेंही काम करतात त्यास कायद्याचा आधार असतो. हिंदु धर्मशास्त्रांत लिहिलें आहे कीं, ब्राह्मणाशिवाय इतर जातींचे मालक त्याचे वंशज. मग ते पुत्राचे असोत अगर कन्येचे असोत असें लिहिलें आहे. पण त्याप्रमाणें सातारचें झालें नाहीं. सातारच्या राज्याचा शेवटचा पुरुष मेला त्या वेळेस त्याच्या स्त्रिया हयात होत्या त्या राज्याच्या वारस होऊ नयेत काय? हल्लींच्या आपल्या महाराणी साहेब आपल्या पतीच्या पाठीमागून राज्यकारभार चालवीत आहेत. तो प्रकार मनांत आणून त्यांनीं सातारच्या राणीकडे राज्य राखावयाचें होतें. शिवाय हिंदु राजाच्या स्त्रियानीं दत्तक घेतलेला मुलगा राज्यास हक्कदार होत नाहीं काय? केला. आपासाहेब महाराज यांच्या पत्नी आई साहिब ह्या सुमारें ३ वर्षांपूर्वी मयत झाल्या. त्यांस नेमणूक ५००० रुपयांची होती ती पाठीमागें त्यांच्या दत्त पुत्रास न देतां बंद केली. आणि तिच्या मोबदला २५०० रुपये मोठ्या प्रयासानें दिले तेही मुलाच्या नावानें नसून नातवाच्या नावानें झाले ह्मणतात. रहाण्याचे मोठाले राजवाडे ते सर्व घेऊन डोंगराचे कडेला एक लहानसा वाडा त्यांस दिला. आणि मोठ्या राजवाड्यांत आपल्या कचेऱ्या नेल्या, याचें नांव इंग्रजी कायदा! सर्व दक्षिण प्रांत शिवाजी राजाचें अन्न खात आहे. परंतु कोणी देतील ते राज्य पुनः मिळण्या विषयीं प्रयत्न करीत नाहीं. ह्मण आहे कीं "जोंपर्यंत शितें तोंपर्यंत भुतें" दुसऱ्याचें दुःख आपल्या डोक्यावर घेऊन त्याचा परिहार करणें हें काम मोठ्या इमानाचें आणि राजनिष्ठेचें आहे. सातारच्या राज्यासारखी दुर्दशा दुसऱ्या राज्याची झाली नाहीं. पेशवे हे शिवाजीचे मुख्य प्रधान होते. कालांतरीं कांहीं राज्याचा भाग यांच्या ताब्यांत दिला होता त्याचा उपभोग त्यांनी १२५ वर्षेंपर्यंत घेतला. अखेरीस पळून गेले. शूर पुरुषाचें हें काम नव्हे. त्यांनीं पुनः राज्य मिळण्याविषयीं प्रयत्न न करितां जपजाप्यांत वेळ घालविला. ते पुणें शहरीं रहात होते हें सांगण्यास नको. कोणी परका मनुष्य त्या शहरीं शहर पहाण्यास गेला तर त्यास असें वाटणार नाहीं कीं या ठिकाणीं राजा होता. ते अल्प काळाचेच राजे होते. पिढीजाद राजे असते तर त्यांजपैकीं कांहीं तरी अंश राहिला असता. हल्लीं पुणेकर लोकांनीं जें मानपत्र आपल्या महाराणी साहेबांस दिलें त्यांजमध्यें सातारचें राज्य आणि वऱ्हाडचा मुलूख सोडून द्यावा असें लिहिलें आहे. तर महाराणी साहेब इकडे लक्ष पुरवून मानपत्रांत लिहिल्याप्रमाणें करतील अशी उमेद बाळगतों कळावें तारीख ९ माहे जुलै सन १८७६ इसवी.

एक ब्रा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपली तारीफ करावी असें नाहीं परंतु मला पश्चिमेकडील विद्येचें थोडें बहुत पाणी लागल्यामुळें अलीकडे मी शोधक झालों आहे. कोठें कांहीं चमत्कार दृष्टीस पडला ह्मणजे त्याजबद्दल विच्यार करण्याची मला सवय व लवक लागली आहे. सार्वजनिक कामें, सार्वजनिक हक्क, व सार्वजनिक विद्या याबद्दल विच्यार करण्याची तर मोठीच हौस व त्याच हेतूनें खालील चार ओळी लिहिल्या आहेत.

ज्याप्रमाणें इतर मोठमोठ्या शहरांत शहरसफाईकरितां व मुख्यत्वेंकरून सार्वजनिक सुखाकरितां म्युनिसिपाल कमेट्या नेमिल्या आहेत त्याप्रमाणें या वत्सगुल्मक्षेत्रींही एक छोटीशी कमेटी आहे. तिचें मोठें उत्पन्न ह्मटलें ह्मणजे पोलिसपट्टीपासून. ही पट्टी कोणत्या उत्पन्नावर व कोणावर कशा दरानें लादावी याजबद्दल सरकारचा खुलासेवार ठराव नव्हता ह्मणून आजपर्यंत कमेटी करील ती पूर्व दिशा होती व त्यामुळें कित्येक मेंबरांचें गावांत चांगलें वजन असे. कमेटीचे ठरावावर कोणी अपील करण्यास धजत नसत व जे धजत त्यांस त्यापासून क्वचित् फायदा होई असें ऐकण्यांत आहे. यांत मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं कारण पट्टीचा ठराव म्यानेजिंग कमेटीनें करून तो जनरल कमेटीनें पसंत करावा असें असून जनरल कमेटींत जे अध्यक्ष असतात तेच कमेटीच्या ठरावावरच्या अपिलांचा निकाल करितात यामुळें जनरल कमेटींत बसलेली पट्टी अपिलांत फिरण्याचा संभव फारच थोडा असतो.

कमिटीच्या व्यवस्थेतही एक चूक आहे असें मला वाटतें. न्यायानें पाहिलें असतां ज्या अधिकाऱ्याचा कमिटीशी निकट संबंध नाहीं अशा स्वतंत्र अधिकाऱ्यानें कमेटीच्या ठरावावरच्या अपिलांचा निकाल करावा हें योग्य व शांतच रयतेचा नफा आहे. असो. हल्लीं सरकारचा ठराव शेंकडा एक रुपयाप्रमाणें पट्टी वसूल करावी असा झाल्यामुळें कमेटीचे हात बरेच बांधले गेले आहेत. कमेटीचें उत्पन्न दर साल अजमासे चार साडे चार हजाराचें होतें तें आतां एक हजारावर येऊन ठेपलें आहे. या वाईच्या ( पट्टीच्या )तडाक्यातून पुष्कळ लोक सुटले ही मोठी आनंदाची गोष्ट आहे त्यांत या वसगुल्म क्षर्ती विशेष आनंदाची आहे कारण एथें फारसा व्यापार नसून लोक दिनचर्येस महाग आहेत.

गेल्या आठ पंधरा दिवसांत येथील लायब्ररींत एकदां म्यानेजिंग कमेटी व एकदा जनरल कमेटी भरली होती तेवेळेस गम्मत पाहण्याकरितां मीही तेथें गेलों होतों. म्यानेजिंग कमेटींत मेहरबान ताजुदीन साहेब चेयरमन असून रा. रा. विनायक रामचंद्र डे० ए० इन्स्पेक्टर व रा. रा. बाळाजी नाईक दंडे सभासद होते. त्यांणीं या सालचे अंदाज्याचें बजेट तयार करून कमेटीचें उत्पन्न कमी झाल्यामुळें टाउनपोलिसाचा व मुलींच्या शाळेचा खर्च ठेवावा किंवा नाहीं. कोंडवाड्याचें काम पाटलाकडून काढून व जन्ममृत्यूचें पोलिसाकडून काढून आपल्याकडे घ्यावें असा विच्यार करून या सर्व गोष्टी जनरल कमेटीपुढें ठेवाव्या असा ठराव केला. पुढें तारीख २४ मिनहूरोजीं जनरल कमेटी भरली होती. त्यांत मेहरबान डि० क० साहेब, मेहरबान पोलिस सु० साहेब, मेहरबान सिव्हिलसर्जन साहेब व इतर सहा मेंबर हजर होते. बाळाजी नाईक दंडे यांस इंग्रजी येत नसल्यामुळें रा. रा. विनायक रामचंद्र डे० ए. इ. यांणीं कोण कोणत्या विषयांविषयीं विचार करावयाचा याजबद्दल इंग्रजींत युरोपियन मेंबरांस सांगितल्यावरून प्रथम म्यानेजिंग कमेटीनें अंदाज्याचें बजेट केलें होतें तें जनरल कमेटीनें पास केलें. नंतर गावांत गौळ्यांस गुरें बांधण्याची व गवत ठेवण्याची परवानगी द्यावी किंवा नाहीं याबद्दल वाटाघाट होऊन शेवटीं असा ठराव झाला कीं, जीं दुभतीं गुरें असतील तेवढींच त्यांणीं शहरांत ठेवून बाकीचीं शहराबाहेर ठेवावीं व असें त्यांनीं न केल्यास प्रत्येक गुराबद्दल दोन दोन रुपये पोलिसपट्टी द्यावी. गौळ्याच्या गुरांपासून लोकांस फार त्रास होतो. परंतु म्यानेजिंग कमिटीनें आजपर्यंत त्याबाबदींत कांहीं तजवीज केली नाहीं सबब गौळ्यांच्या संबंधानें सर्व व्यवस्था करण्याचें मेहेरबान पोलिस सु० साहेब यांजकडे सोपलें आहे. तिसरें प्रकरण कोंडवाड्याचें निघालें. अध्यक्षाचें मत होतें कीं, कोंडवाड्याचें उत्पन्न कमिटीनें आपलेकडे ठेवावें परंतु उत्पन्न व खर्च यांत बहुधा रमारमी होते असें कित्येक मेंबरांच्या नजरेस आल्यावरून कोंडवाड्याचें उत्पन्न कमिटीकडे नको असें ठरवण्यांत आलें. इतकें खरें आहे कीं, कोंडवाड्यावर कमिटीची चांगली देखरेख असती तर कमिटीस उत्पन्नाची जागा होती. अगोदरच कमेटीचें उत्पन्न कमी झालें आहे त्यांतून अशा उत्पन्नाच्या बाबी सोडून दिल्या तर कमेटीस अकाबाई आठवली व तिच्या लयाचा समय जवळ आला आहे असें ह्मणण्यास काय हरकत आहे. चौथें प्रकरण मुलींच्या शाळेबद्दल निघालें. अध्यक्षांनीं असें सुचविलें कीं ज्याअर्थीं कमेटीचें उत्पन्न फारच कमी झालें आहे त्या अर्थी ही शाळा मुळींच बंद करावी. असा त्यांचा रोख पाहिल्या बरोबर रा. रा. विनायक रामचंद्र डे० ए० इ० याखेरीज बाकीच्या सर्व मेंबरांचें मत अध्यक्षाप्रमाणें पडण्याचा रंग दिसूं लागल्यावरून त्यांणीं कमेटीस असें सुचविलें कीं विद्यावृद्धीस उत्तेजन व मदत देणें हें कमेटीच्या कर्तव्यकर्मांपैकीं एक कर्तव्यकर्म आहे, व उत्पन्न कमी झाल्यामुळें शाळा बंद करण्यापेक्षां हल्लीं दरमहा ३१ रुपये खर्च आहे त्यांत कांहीं कमी खर्च करून शाळा ठेवावी. हें फार चांगलें. ही सूचना युरोपियन मेंबरांपेक्षां नेटिव मेंबरांस सुचल्यावरून बहुमतानें असें ठरलें कीं हेड मास्तराचा पगार रुपये १०, शिपाई रुपये४. सादिल रुपाया १ न घरभाडें रुपये ४ मिळून दरमहा १९ रुपयांचा खर्च कमेटीजवळ देण्यास पैसा आहे तोंपर्यंत ठेवावा. सर्व ठिकाणीं मुलींच्या शाळेचा निमे खर्च सरकारी पंशांतून असून निमे म्युनिसिपालटींतून मिळतो सबब नवीन व्यवस्थेप्रमाणें कमेटीस सालीना १८६ रुपये द्यावे लागत होते ते आतां ११४ द्यावे लागतील.

सदर्हू हकीकतीवरून इतकें स्पष्ट होतें कीं, पुढें मागें या शाळेवर संक्रांत येणार. कमिटीनें ठरविलेल्या पगारावर हल्लींचे मास्तर रहातील किंवा नाहीं याचा संशय आहे. व त्यांचे पश्चात् असे भरवशाचे व लोकप्रिय मास्तर मिळणें दुर्मिळ आहे. व वऱ्हाडांत मुलींच्या चांगल्या शाळांपैकीं वाशिमची शाळा आहे तिचा अभिमान डे० ए० इन्स्पेक्टर यांस असणें हें फारसें नवल नाहीं परंतु त्यांनीं खटपट करून ही शाळा जारी ठेविल्यास व १०चे बदला निदान १९ रुपये हेड मास्तराचा पगार करविल्यास त्यांचे मोठे उपकार होतील. असें करण्यास फारशी अडचण आहे असें नाहीं. सरकारांतून दरमहा ४ रुपये भाडें मिळतें तें बंद करून शाळेस कोठें तरी फुकट जागा पहावी व कमेटीकडून आणखी दरमहा आठ आण्याची मदत घेऊन मास्तराचा पगार वाढवावा हें योग्य आहे. परंतु हें सर्व करणें मे. डायरेक्टर साहेब यांचे हातीं आहे. कळावें हेविनंती.

एक
फिरस्ता.

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य २ शके १७९८.

## मि० दादाभाई नवरोजी यांचे लेखावर टीका

हिंदुस्थानास सांप्रत फार दरिद्रावस्था प्राप्त होत चालली आहे व तिचें निवारणाचा कांहीं उपाय न केल्यास ती अवस्था निकरास जाईल याजकरितां या गोष्टीचा सर्वांनीं विच्यार करावा ह्मणून मि० दादाभाई नवरोजी यांनीं फार माहिती मिळवून एक निबंध तयार केला त्यांतील मतलब मागेंच आह्मी आपले वाचकांस कळविला आहे. आलीकडे त्याविषयींची बरीच चर्चा होऊन सभेंत वादविवाद झाले व त्या सर्वांवर दादाभाईंनीं समर्पक उत्तरें दिलीं असें नुकतेंच प्रसिध्ध झालें आहे. त्यावरून कित्येक युरोपियन लोकांस फार वाईट वाटलें असें दिसतें. त्या वाईट वाटणारांपैकींच मि० विलियम सावर्बी साहेब नांवाचे एक इंजिनीयर खात्यांतील गृहस्थ आहेत. त्यांनीं दादाभाईची थट्टा करून टीकेचें एक पत्र टाइम्समध्यें छापिलें आहे. त्यांतील मजकूर आह्मीं आपले वाचकांस प्रथम कळवितों. नंतर त्या टीकेवर टीका करूं.

हिंदुस्थानचें राज्य इंग्लिश लोकांचे हातीं आहे व त्यामुळें इंग्लंडास बराच पैसा जातो हें एक हिंदुस्थानचे दरिद्रास कारण दादाभाईंनीं दाखविलें आहे त्याविषयीं अतिशयोक्तीनें सावर्बी साहेब ह्मणतात कीं दादाभाईचे लेखांत ३ मुद्दे आहेत ते असे:—

१ हिंदुस्थानचें राज्य इंग्रज लोकांकडे असल्यानें अतिशयीत खर्च लागतो तो कमी झाला पाहिजे.

२ हा खर्चाचा बोजा हिंदुस्थान देशाला सोसवत नाहीं इतका फार आहे व त्यामुळेंच देश दरिद्री झाला आहे व होत आहे.

३ इंग्लिश लोकांचें राज्य नाहींसें होण्याची तजवीज झाली पाहिजे किंवा इकडे इंग्लिश लोक कामावर जितके कमी येतील तितके आले पाहिजेत.

याप्रमाणें दादाभाईच्या लेखाचे मुद्दे कल्पून पुढें सभेचा ठराव होऊन सिद्धांत असे असे कां झाले नाहींत? ह्मणून कल्पनेचे तरंग चालविले आहेत तेही ऐकण्यासारखे आहेत.

१ हिंदुस्थानाला इंग्रजसरकारचें प्रभुत्व फार खर्चाचें आहे सबब त्यापासून मोकळें व्हावें.

२ याकरितां वजनदार लोकांची एक कमिटी नेमावी.

३ मि. दादभाई नवरोजी व मि. नवरोजी फरदूनजी यांस या सभेचे प्रेसिडेंट व व्हाइस प्रेसिडेंट नेमावे.

४ एक पंचाईत नेमून तींत इंग्रज लोकांचे हक्काचा निकाल करावा. २० वर्षे पुष्कळ उत्पन्न त्यांनीं नेलें आहे तें जमेस धरून त्यांचे घेणें एकादा रुपया फिरत असल्यास त्यांस देण्याची तजवीज करावी.

५ युरोपियन लोकांस हिंदुस्थानांतून जाण्याचा हुकूम द्यावा. व ते पुन्हा परत न येतील असा करार करून घेऊन त्यांस फ्री पास द्यावा.

६ त्यांचा रेल्वे त्यांस परत घेऊन जाण्यास सांगावें.

७ हिंदुस्थानांत लोकसत्तात्मक राज्य स्थापावें. व अमेरिकेंतील लोकांनां तें पहाण्यास बोलवावें.

सावर्बी साहेब ह्मणतात कीं दादाभाई व त्यांची मित्रमंडळी यांचे विच्यार इतके पोरकट आहेत कीं त्यांच्या सभेंत वरील प्रकारचे ठराव झाले असें ह्मटलें असतां फारसें थट्टास्पद दिसणार नाहीं.

इंग्रज लोकांस हिंदुस्थानांत येण्यास कोणी सांगितलें होतें ? व त्यांना हिंदुस्थानचें राज्य घेण्याची काय जरूरी होती ? हिंदुस्थानची स्थिति न सुधारतां इराण व तुर्कस्थान या देशांप्रमाणेंच राहिली असती तर इंग्रजांचें काय जात होतें ? वगैरे मजकूरही सदर्हू साहेबांनीं लिहिला आहे. या उपरोधिक लिहिण्याचा अर्थ इंग्लिश लोक हिंदुस्थानावर केवळ उपकार करण्याच्याच हेतूनें इकडे आले त्यांत त्यांचे स्वाहित कांहीं नाहीं असा असेल काय? असो.

दादाभाईंनीं लिहिलें आहे कीं हिंदुस्थानांत इंग्लिश सरकारचें राज्य आहे त्यामुळें हिंदुस्थानचें उत्पन्नांतून निव्वळ ३९ कोटि रुपये प्रतिवर्षीं इंग्लंडास जातात. यांत विलायतेंतील कामदार लोकांचे पगार, पेनशन, कर्जाचें व्याज, वगैरे मिळून १९ कोटि रुपये व इकडे जे साहेब लोक आहेत त्यांच्या पगारांतील संचय व व्यापाराचा नफा वगैरे मिळून २० कोटि रुपये बेरीज आहे. ती सावर्बी साहेब कबूल करितात व त्या संबंधानें कोटि करितात ती अशी:—

हिंदुस्थानांत आज मितीस इंग्रज लोक सुमार ७०००० खपत आहेत व हे बहुतेक शूर शिपाई आहेत यामानानें ३९ कोटि रुपयाविषयीं पाहिलें ह्मणजे एका मनुष्यास सालाचे ९००० रुपये पडतात व तेवढ्यावारी एवढ्या मोठ्या अफाट हिंदुस्थान देशाचें रक्षण होतें व लोकांचे जीव वाचतात आणि संपत्तीचा बच्याव होतो. असें आहे तर हा खर्च अधिक आहे काय ?

देशांतील लोक ही देशाची संपत्ती होय असें अर्थशास्त्राचें मत आहे. याप्रमाणें पाहाल तर लाहानशा इंग्लंडदेशानें ७०००० वीर पुरुष तानिरवाणे, नव्या रक्ताचे व निवडक असे हिंदुस्थानाला दिले ही लहान संपत्ती आहे काय? व तिचा मोबदला मागती ९००० रुपये फार आहे काय? दादाभाई व त्यांची मंडळी या गोष्टीचें मोल बरोबर जाणत नाहीं.

याप्रमाणें सावर्बी साहेबांनीं व्याख्यान करून नंतर दुसऱ्या प्रकारची कोटि चालविली ती अशी:—

ते ह्मणतात दादाभाईचे मताप्रमाणें कल्पना करूं कीं, इंग्लिश लोकांचें हिंदुस्थानांतील राज्य नाहींसें होण्याचा क्रम सुरू झाला व इंग्लिश लोक परत स्वदेशीं जाऊं लागले तर शेवटचा इंग्लिश गृहस्थ पालव बंदरावर पाय ठेवील तोंपावेतों मुंबईस एक तरी पारशी गृहस्थ जिवंत राहील काय? आणि राहिलाच तर त्याची काय अवस्था होईल ? बहुधा एक महिन्याचे आंत सर्व पारशी ठार मरतील, भिकेस

लागतील व घरादारास मुकून भटक्या मारित फिरतील. व नुसत्या पार्शी लोकांचीच अशी दशा होईल असें नाहीं, मुंबई पासून ब्रह्मदेशापर्यंत आणि कन्याकुमारी केपापासून पेशावरापर्यंत सर्व पैसेवाले लोकांची अशीच दाणादाण होईल. बंडाचे वेळीं कशी काय अवस्था झाली होती ती आह्मी पाहिली आहे असें साहेब बहादूर लिहितात.

दुसरें आणखी ते असें ह्मणतात कीं, इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थान सोडिलें कीं, दुष्काळ, रोग, लढाया, महामारी इत्यादि गोष्टींकडून २० कोटि प्रजेतून कोट्यावधि लोकांचा नाश होईल. याविषयीं या देशाला पूर्वीचा अनुभव आहेच व इराण देशाकडे लक्ष्य पुरविलें असतां अधिक खात्री होईल. आणि तसें झालें ह्मणजे हिंदुस्थानांतील सर्व संपत्ती, उत्पन्न व भरभराट यांची काय वाट होईल? तुर्कस्थान, इराण यांकडे नजर देऊन पहा, तेथें स्वभावसिद्ध संपत्तीला कांहीं वाण नाहीं, पण लोकांची स्थिति किती दैन्यप्रद आहे? इराण देशाला इंग्लंड देशाचें प्रभुत्व मिळून त्याची स्थिति सुधारली व सर्व उत्पन्नाचा यथान्याय त्यांस उपभोग मिळूं लागला तर त्यांतून चौथाई उत्पन्न इंग्लंड देशाला इराण देश खुशीनें देईल. आणि तोच न्याय पाहिला तर त्या देशापेक्षां हिंदुस्थानची चांगली स्थिति इंग्लंड देशाचें त्यावर प्रभुत्व असल्यापासून झालेली आहे तर उत्पन्नांतून शेकडा दहापंधरा रुपये इंग्लंडास देणें हिंदुस्थानास भारी वाटावें काय?

साबर्मी साहेब आणखी असें ह्मणतात कीं दादाभाई वगैरे मंडळी ज्या विषयावर बोलतात तो विषय त्यांस चांगला कळत नाहीं. दादाभाईंनीं झटलें असतां बडोद्याच्या राज्याची दिवाणगिरी केली आहे तेव्हां तेथें राजकीय धर्म त्यांच्या नजरेस कांहीं आले असेल. त्या संस्थानांतील घोटाळा, दाबदडपा, बेबंदी, फंदफितूर, लादानी, उधळेपणा, अन्याय, जुलूम, लांच, भ्रष्टता, अडदांडपणा, लुटारूपणा, दरोडे, खून वगैरे अपराधांचा उपशम दिवाणांनीं कसा काय केला? राजाला फुकाचा बुद्धिवाद सांगून दुर्गुणपराङ्मुखही त्यास केलें नाहीं व त्यावर प्रसंग येण्याचा रंग दिसला तसें दिवाणांनीं आपलें चंबु गबाळें आटपलें. बिचारा राजा फाशीच्या खांबावर चढावयाचा तो सुदैवेंकरून पदभ्रष्ट होऊन सुखी राहिला. ही राजशाली अद्भुत नव्हे काय?

दादाभाई वगैरे मंडळीस तोंडें आहेत ह्मणून ते कांहीं तरी बोलतात व दौत, पेन, कागद आहेत ह्मणून पांढऱ्यावर काळें करितात. राज्यकारभार चालविण्यालायक असे त्यांचे विचार अजून झाले नाहींत. हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्याची त्यांस काळजी आहे तर त्यांनीं अन्य उपाय शोधावे. दोषयुक्त मतें प्रसिद्ध करून इंग्लिश लोकांचे डोळ्यांत बोटें घालावीं यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांना स्वदेशप्रीति आहे याजबद्दल मी त्यांची वाखाणणी करितों; पण त्यांच्या मताच्या सिद्धांतावर अवलंबून रहाणें सुरक्षित नाहीं. त्याना सुधारणेची प्रीति आहे तर म्युनिसिप्यालिटी, टौन कौन्सील यांत त्यांनीं सुधारणा करावी. व तें काम पूर्णतेस पोचलें ह्मणजे मग राजकीय सुधारणेकडे त्यांनीं लक्ष द्यावें.

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

ह्या जागीं नाणें ह्या शद्बाचा सामान्य व्यवहारिक अर्थ व अर्थशास्त्रांतील अर्थ यांमध्यें जो भेद आहे तो सांगणें जरूर आहे असें आह्मांस वाटतें. व्यवहारांत नाणें या शद्बाचा उपयोग हजारों वर्षांपासून नाणीं सोन्या रुप्याचीं असल्या कारणानें सामान्यतः रोकड या अर्थीं करितात. उदाहरण आपण नेहमीं ह्मणतों कीं, "फलाण्या सावकारापाशीं नाणें फार कमती आहे." "त्यास नाण्याची फार तूट पडली" इत्यादि. परंतु अर्थ शास्त्रांत नाणें याचा अर्थ भिन्न आहे. तो आरंभीं सांगितलाच आहे. व त्याच अर्थीं ह्या निबंधांत त्या शद्बाचा उपयोग केला आहे.

मागें असें सांगितलें आहे कीं, अमुक पदार्थ देशाचें नाणें करणें किंवा न करणें तेथील लोकांच्या सर्वांशीं स्वाधीन आहे. व पृथक देशांत पृथक प्रकारचीं नाणीं असतात. हीं नाणीं सुरू करण्याचें प्रथम प्रयोजन कसें झालें असावें व नाणीं होण्याचे पूर्वीं लोकांमधील देवघेव कशा चालत होत्या ह्याचा आतां विचार करूं.

ह्या जगामध्यें ईश्वरानें मनुष्यांस अगदीं निराश्रित केलें आहे. ह्मणजे त्याचे समोर सर्व सामुग्रीचें बीज आयतें उत्पन्न करून ठेविलें आहे परंतु तें पेरून फलप्राप्ती त्यास स्वतःच्या मेहनतीनें करावी लागते. या संसारांत त्यास वस्तूही अनेक लागतात. त्या सर्व वस्तु एकटा उत्पन्न करीन असें ह्मणेल तर त्याचें सर्व आयुष्यही पुरणार नाहीं. याजकरितां एक मनुष्यानें एक वस्तु उत्पन्न व तयार केली तर दुसऱ्यानें दुसरी हातीं घ्यावी लागते; तिसऱ्यास तिसरी; व याप्रमाणेंच पुढें, व त्या सर्वच जरूरीच्या असतील तर त्या सर्वांस आपण तयार केलेला जिन्नस थोडी फार देऊन दुसऱ्या जवळची जिन्नस थोडी फार घेतली पाहिजे व असेंच इतर लोकांशीं वर्तणें त्यास भाग पडेल, नाहीं तर त्याचा निर्वाह लागणार नाहीं. अशा व्यापारास अदलाबदल असें ह्मणतात व नाणीं सुरूं होण्यापूर्वीं अशाच अदलाबदलीनें लोकांचे प्रपंच चालत असत. अशी वहिवाट एकाद्या गावांत १० अगर २० घरें असतील व सर्व घरें जर एक विच्यारानें व एकोप्यानें रहातील तर मात्र चालण्याचा संभव दिसतो. परंतु जेथें दोन चारशें घरें आहेत, जेथें पाहिजेल तो मनुष्य बाकीच्यास न विचारतां हवा तो धंदा आरंभतो अशा ठिकाणीं एका मनुष्यापाशीं गहूं आहेत व त्यास कापडाची जरूरी आहे तर ज्या मनुष्यापाशीं कापड असून त्यास गव्हाची जरूरी आहे असा मनुष्य सर्व वस्तीभर धुंडून शोधून काढावा लागेल व तसा मनुष्य सांपडेल तर मात्र त्यास कापड मिळेल, नाहीं तर मिळणार नाहीं. अशा देवघेवीस इंग्रजींत बार्टर असें ह्मणतात व मराठींत वर सांगितल्या प्रमाणें अदलाबदलीचा व्यापार असें ह्मणतात. आतां हें उघडच आहे कीं, मोठ्या वस्तींत अशा देवघेवीस मोठा त्रास पडतो. मनुष्यास तावडतोब चाहिल तो जिन्नस मिळत नाहीं व तो मिळविण्यास फार दगदग, त्रास व मेहनत घ्यावी लागते. असा प्रकार होऊं लागला ह्मणजे सर्व लोक, किंवा असल्यास तेथील सत्ताधारी, असा एक पदार्थ निवडून व्यवहारांत चालूं करितो कीं हव्या त्या अन्य जिनसे बदल तो पदार्थ बाजारांत मोबदला मिळावा व त्या पदार्थाच्या मोबदला हवा तो अन्य जिन्नस मिळावा. तोच पदार्थ मग तेथील नाणें होऊन अशा रीतीनें प्रचारांत सुरू होतो.

पु. चा.

## वऱ्हाड.

दिवाण साहेब सर सालरजंग लंडन शहराहून ता. ३१ जुलै रोजीं परत यावयास निघाले.

हैदराबादेकडे ता. २८ जुलैपर्यंत एकही चांगला पाऊस पडला नाहीं. अकोला उमरावतीकडेही या आठवड्यांत हकाटी आहे.

अकोल्यास टौनहालांत ११ वे तारखेस शुक्रवारीं रात्रौ ९॥ वाजतां छावणीतील सभ्य स्त्रिया व पुरुष गायनाचा बेत करणार आहेत व त्या प्रसंगास नेटिव लोकांस आठ आणे व च्यार आणे दराच्या टिकिटानें येऊं दिले जाईल असें प्रसिद्ध करण्यास एका गृहस्थांनीं आह्मांस शिफारस केली आहे.

जुडिशिपल कमिशनर कर्नेल अलार्डाईस साहेब बुलढाण्यास गेले होते ते मंगळवारीं स्टेशनावर येऊन तसे परभारेंच उमरावतीस गेले.

मि० ड्रिस्डेल साहेब डिपुटी कान्सरवेटर आफ फारेस्ट चिखलदऱ्याहून येथें आले होते. व गुरुवारीं वाशिमाकडे गेले. या आठवड्यांत परत येतील. रा. रा. त्रिंबक अमृत वैजापुरकर हेडक्लार्क त्यांचे बरोबर आहेत.

मे. मौलवी मेहदे अली साहेब हैदराबादचे मुलकी आफिसर अकोल्याहून औरंगाबादेकडे परत गेले. जमीनीसंबंधीं व मुलकी इतर कामासंबंधीं त्यांनीं एथें पुष्कळ शोध करून माहिती मिळविली. त्यांनीं एथें फिरून सरकारी कचेऱ्या पाहिल्या गांव पाहिला व व. स. छापखाना पाहिला. एथील मंडळीही त्यांना भेटावयास पुष्कळ गेली होती.

रा. रा. वामनराव नारायण बापट चांदूरचे तहशिलदार रजा घेऊन मित्रमंडळीस भेटण्याकारितां येथें आले आहेत.

अकोल्याचे रा. रा. चितो परशराव परचुरे पुण्यांच्या म्युनिसिप्यालिटीकडील हेड ओव्हरसियर सस्पिंड असलेले बडतर्फ झाले.

भागकाड्यांच्या पेट्या—पुण्यास बापू विष्णु आणि मंडळी यांनीं भागकाड्याच्या नवीन पेट्या केल्या आहेत त्यांचा मासला आमचे कारखान्यांत पाहण्यासाठीं ठेवला आहे. व उमरावतीस १००० पेट्या प्रमोदसिंधु छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. एक पैशाला दोन पेट्या मिळतात. या पेट्या नवीन आहेत तरी चांगल्या व मंडळीस आश्रय देण्यास योग्य अशा आहेत.

मेजर जेमिसन साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट यांस चाकरीचा राजीनामा देण्याची परवानगी मिळाली. व ते येथून गेले.

मि० किट्स साहेब आफि. असि. क. यांस ५००० रु० पर्यंत दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार दिला.

मि. फार्बस साहेब सिकंदराबादचे वकील हैदराबादेस प्रासिक्युटर नेमिले.

मि० बेनन सा. पैनगंगेकडील सुपरिंटेंडेंट यांस १५ वे तारखे पासून ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मि० इनायत हुसेन उमरावतीचे तहशिलदार रजेवर गेले व त्यांचे काम रा. रा. गिरराव रामचंद्र पाहूं लागले व त्यांस सेकंड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

क्या० बुलक साहेब डिपुटी कमिशनर व क्या० लेन साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट यांस उमरावतीच्याच भजनालयाचे (चर्चे) ट्रस्टी नेमिले.

शिवणगाव येथें मि० अनदराव नारायण यांस स्पेशियल सब रजिस्टर नेमिलें. त्यांचें आफिस नेर पिंगळाई येथें राहील.

मि० विनायक वामन आपटे यांस पूर्व वऱ्हाडांत प्रोबेशनरी सब ओव्हरसियर नेमिलें.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, उमरावतीच्या प्र. सिं.चे मालक व कर्ते रा. रा. यशवंतराव गोविंद सातारकर पक्षघातवायूनें आजारी होऊन औषधोपचारार्थ पुण्याकडे गेले होते ते दुरस्त होऊन परत आले.

वाशिम—पाऊस तुरळक आहे. गावांत रोग नाहीं पण रस्ते खराब झाले आहेत.

सूचना—या आठवड्यांत कित्येक उपयुक्त मजकूर व बातम्यांचीं पत्रें आलेलीं स्थलसंकोचामुळें घेतलीं गेलीं नाहींत, तीं पुढें घेऊं.

## वर्तमानसार

सरकारी चाकरींतील कोणत्याही नोकरानें हिंदुस्थान सरकारची अगाऊ परवानगी घेतल्यावाचून नेटिव राजे रजवाड्यां पासून कोणत्याही प्रकारची देणगी वगैरे घेऊं नये असा ठराव झाला आहे.

दर तासांत २०० मैल या मानानें हवेंतून फिरतां येण्यासारखें एक वाफेचें यंत्र विलायतेंतील एक मनुष्य तयार करीत आहे.

मारिशियस बेटांत एकंदर ३४५२०० लोकवस्ती असून त्यांत २०८३५३ पुरुष व १३७८४७ बायका आहेत. या सर्वांत १५०८८९ पुरुष १३६८४७ बायका इतके लोक हिंदुस्थानांतील आहेत ! या वर्षाच्या पहिल्या तिमाहींत या बेटांत एकंदर १७३ लग्नें झालीं व त्यांतील ४४ लग्नें हिंदुस्थानच्या लोकांचीं होतीं.

सुएझच्या कालव्यानें जो व्यापार चालतो त्यांत सर्वांपेक्षां इंग्रजांचाच ज्यास्त आहे. जो एकंदर व्यापार चालतो तो १६ आणे धरला तर त्यांत इंग्रजांचा १२ आणे व बाकीच्या ४ आण्यांत जर्मनी, फ्रान्स, इटाली, होलंड, आस्त्रिया, स्पेन, रशिया, स्वीडन, नॉर्वे, टर्की, ग्रीस, इजिप्त, बेलजम, डेन्मार्क, पोर्टुगाल व जपान, या सर्वांचा व्यापार !

पृथ्वींतील सर्व प्रकारचे चमत्कारिक पदार्थ फिलादल्फिया एथें जमा झाले असून त्यांत इलिनोइज एथून आणलेला डी लॉबर्ट नावाचा एक १४ वर्षांचा मुलगा फारच चमत्कारिक आहे. हा १४ वर्षांचा असून ६ फूट उंच आहे. याचे पाय ३ फूट असून पायमोचे रहाण्याकरितां त्याच्या कंबरेस जो पट्टा बांधावयाचा त्याची लांबी ६॥ फूट असून तो हव्या त्या घोड्यास तंग चांगला पुरेल ! या मुलाचें वजन ४७९ पौंड ह्मणजे पक्के २७३ शेर आहे.

विलायतच्या ता. २६च्या तारेवरून समजतें कीं, सर्वियन फौजेची उमेद खचल्यासारखी दिसत असून ते पुढें चाल करण्याचें सोडून आपल्या बचावाच्या उद्योगास लागले व त्याकरतां किल्ल्यांची सिध्धता करीत आहेत. मिसरच्या शेजारीं तुर्की फौजेबरोबर लवकरच एक लढाई होईल असें दिसतें. अ. द.

गोदावरीचा कालवा बांधून आणण्यास वगैरे आजपर्यंत सुमार १ कोटि ९लक्ष रुपये खर्च लागला व आजपर्यंत ३ कोटि रुपये उत्पन्न झालें.

मद्रास येथील उद्योगशाळेचा खर्च भागत नाहीं ह्मणून ती शाळा बंद होणार.

भविष्य— मद्रास इलाख्यांत कित्येक ठिकाणीं गुदस्त सालीं पर्जन्य चांगला पडला नाहीं यामुळें तिकडे धान्याचे भाव वाढत चालल्याबद्दल आह्मी लिहिलें होतें. हल्लीं मद्रास सरकारचे खगोल विद्यावेत्ते मि० पागसन यांणीं असें भाकित काढलें आहे कीं, ह्यावर्षीं मद्रास इलाख्यांत पर्जन्य चांगला पडणार नाहीं व याहीपेक्षां पुढले वर्षीं कमी पडेल.

दिल्ली एथील कांहीं नेटिव लोक तेथें एक सुताची व कापड विणण्याची गिरणी स्थापन करण्याचा विचार करीत आहेत.

मालवणचा एक गृहस्थ कळवितो कीं, तेथून चार पांच कोसांवर हिरलें ह्मणून एक गाव आहे तेथें तारीख ९ जुलै रोजीं सकाळचे ९ वाजतां एक बाई प्रसुत होऊन तिला दोन मुलें झालीं, एक मुलगी व एक मुलगा. मुलगा झाला त्यास चार हात असून गणपतीप्रमाणेंच सोंड होती व वर्ण चाळीप्रमाणें होता; पण या गणेश आकृतीच्या मुलाची उत्पत्ति पाहून ऐकणारास व प्रत्यक्ष पहाणारास आनंद व आश्चर्य होऊन सर्वतोमुखीं हेंच वर्णन चाललें आहे. परंतु त्यांत दुःख इतकेंच कीं, बाळ गणेशाची आयुष्यमर्यादा जन्मल्यापासून ८ | १० घटकांनींच संपली तरी मुलाच्या प्रेताचें दर्शन घेण्याकरितांच पुष्कळ लोक जात होते. ही खरी अनुभवशीर गोष्ट असल्यामुळें मुद्दाम तुमच्याकडे पाठविली आहे. ने. ओ.

लंडनच्या सावकार लोकांनीं चीन देशास चांदी पाठविण्याचा झपाटा चालविला आहे असें समजतें.

सर्व पृथ्वींतील एकंदर लोकवस्ती १,०८,३९,००,००० आहे असें कळतें.

डेकन कालेजच्या विद्यार्थ्यांच्या वाडिलांनीं व पालन करणारांनीं पुनः सरकारास ता. १२ जून रोजीं बी. ए. च्या परिक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांची परिक्षेस जाण्याच्या मनाईची शिक्षा रद्द करावी ह्मणून अर्ज केला; परंतु सरकारास राग येऊन त्यांनीं या कामांत आणखी हात घालूं इच्छित नाहीं ह्मणून सांगितलें. हा अर्ज व त्याचें उत्तर हीं २८ जुलैच्या बां. ग्या. छापिलीं आहेत.

नवे नेटिव सिविल सर्वंट— सन १८७४ सालीं सिविलसर्विसच्या झालेल्या परिक्षेंत उतरलेल्या उमेदवारांपैकीं पुढची दोन वर्षांची अखेरची परिक्षा उतरलेल्या ३४ उमेदवारांत दोन नेटिवांची नांवें आहेत त्यांत सी. रस्तमजी यांचें नांव दुसरें आणि पी. आर. चेट्टी यांचें सातवें आहे. पहिल्या गृहस्थाची नेमणूक वायव्य प्रांतांकडे व दुसऱ्याची मद्रासेकडे झाली.

योग्य व्यवस्था:— असें कळतें कीं, कै० श्री० यशवंतराव गोपाळ ऊर्फ बाळा साहेब यांच्या मागें यांचें जागीं अधिकारी त्यांचे पाहिले घरचे सखे कनिष्ठ बंधु व दुसरीकडूनही अगदीं जवळचे योग्य वारस श्री० गंगाधरराव ऊर्फ बाप्पा साहेब हे मालक झाले. ही योजना फारच उत्तम झाली असें सर्व बोलतात. बाप्पासाहेब स्वतः हुशार, सुशिक्षित तरुण आणि स्वभावानें उमदे आहेत. ह्मणून दिवाण साहेबांनीं केलेली निवड अति उत्तम होय, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. अशींचदिवस गेल्यानंतर यथाविधि दत्तविधान वगैरे होणार असें समजतें. मुंबईचे हायकोर्टांतील प्रसिद्ध गृहस्थ मि० खंडेराव चिवणराव हे हल्लीं तेथें राहून बंदोबस्त ठेवीत आहेत.

बडोदें संस्थानचें उत्पन्न सर टी. माधवराव यांच्या कारकीर्दींत वीस लक्ष रुपये अधिक वाढलें आणि दहा लक्षांचा खर्च वाढला असें ह्मणतात. इं. प्र.

कास्पियन समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यावर बाकू नावाच्या गावीं एक हिंदू लोकांचें देऊळ आहे. या देवळावर एक ब्राह्मण उपाध्याय आहे. हा ब्राह्मण मूळचा पंजाबचा रहाणारा आहे. या देवळाच्या खर्चाकरितां त्या प्रदेशाचे मालक खान यांणीं जमीन दिली आहे तिच्या उत्पन्नावर ब्राह्मण आपली उपजीविका चालवितो.

कृष्णा प्रदेशांत ९३,२३० रु० किमतीचे सोन्याचे गट एका असामीस सांपडले. सरकारानें ज्या मनुष्यास सांपडले त्यास त्यांतून ४ गट दिले. ज्याच्या माहितीनें याचा शोध लागला त्यास १,००० रु. दिले.

गेल्या शुक्रवारीं विलायतची आगबोट गेली तींतून हांगकांग व शांघाई ब्यांकेनें ३९,००० रु. किंमतीच्या लगडी व बांबे ब्यांकेनें १,००,००० रु. किमतीचें सोनें विलायतेस पाठविलें.

सुरत येथें एका युरोपियन जोडप्यानें ख्रिस्ती धर्म सोडून मुसलमानी धर्म स्वीकारला.

जस्टिस जोसेफ नामे ख्रिस्ती मनुष्यानें काढिलेल्या नवीन पंथाप्रमाणें येशू ख्रिस्त ६ वर्षांनीं पुनः पृथ्वीवर येईल असें आहे. सु. प.

## नोटिसा.

रामसुक रामनारायण मारवाडी दुकान कल्याण यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुमचे पत्र श्रावण शुद्ध ५चें श्रावण शुद्ध ९स पावलें त्या पत्रांत तुमचे कडून सर्वच उलट मजकूर असल्यामुळें मुद्दाम नोटिस देण्यांत येतें कीं आमचा गुमास्ता तेथें असून आमचे नावचा माल पोतें २०० वाघिनींत भरून रवाना केला असतां तोच माल आमचे गुमास्त्यास न कळूं देतां तुह्मी विकला असून त्याचे नुकसानीबद्दल आह्मास तुमचे कडून अजमास रुपये १२५ पाठवावें वगैरे बद्दल पत्र लिहिलें असून तुह्मी उत्तर न पाठवितां मुद्दाम भुसावळ दुकानचा गुमास्ता पाठविला तेव्हां त्याचें आमचें बोलणें झालें त्यांत त्यांनीं कांहीं खुलासा न करितां फक्त १०० पोत्यांस ५० रुपये नुकसान घ्यावें असें बोललें परंतु ती गोष्ट आह्मी कबूल केली नाहीं. आह्मी रीतीप्रमाणें नुकसान मागितलें तेव्हां गुमास्ते मजकूर यांणीं आह्मांस सांगितलें कीं मी शेटजीस पत्र लिहून खुलासा कळवितों असें सांगून गेल्यावर गुमास्ते मजकूर याजकडून अगर तुमचे कडून कांहीं उत्तर न येतां एकदम तुह्मी आह्मास रुपये मागता हें बरोबर नाहीं. कारण आह्मी तुह्मास खरीदी लिहिली नाहीं. फक्त आमचे नुकसानीबद्दल रुपये १२५ पूर्वी पत्र गेल्याप्रमाणें व नोटिसीचा खर्च यासुद्धां रकम १५ दिवसांत पाठवावी. तुमचे पत्रावरून विनाकारण ही नोटिस देण्याचा प्रसंग आला. १५ दिवसांत नोटिसीचा खर्च व नुकसानीबद्दल रुपये न पाठवाल तर रीतीप्रमाणें तजवीज करून रुपये घेण्यांत येतील. कळावें. तारीख ३० जुलै सन १८७६ इसवी.

(सही) महादापा खंडापा

वहिवाटदार लक्ष्मणदास.

नोटिस.

देवलिंग अप्पा भुजंग अप्पा जंगम दुकान पेठ बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मास तारीख २३ माहे जून सन १८७६ इसवी रोजीं दस्तैवज लिहून देऊन त्यांत डागिणे सोन्याचे चांदीचे लिहून दिले आहेत ते डागिणे एकंदर तुह्मी ही नोटिस पावल्याचे तारखेपासून ८ दिवसांत आमचे ताबेंत द्यावे याबद्दल तुह्मी आह्मास अलाहिदा करारनामा लिहून दिला कीं, ज्या वेळेस सदर्हू डागिणे तुह्मी आह्मास मागाल त्यावेळेस तुमचे स्वाधीन करूं. असें असोन तुह्मी हल्लीं अनमान करता सबब ही नोटिस दिली आहे. या नोटिशीचा खर्च तुह्माकडून घेण्यांत येईल. वर लिहिलेल्या मुदतींत डागिणे न द्याल तर ताब्यांत घेण्याकारितां रीतीप्रमाणें तजवीज करूं. कळावें. तारीख ३० माहे जुलै सन १८७६ इसवी.

(सही) महादापा खंडापा वहिवाटदार लक्ष्मणदास चुनिलाल दस्तुर खुद.

बाबुअपा बापूअपा महाजन दस्तुर खुद

नोटिस.

काशीराव विश्वासराव देशपांडे रहाणार आडगाव यांस गणपतराव वलद चंद्रभान देशमुख मौजे तुपगाव तालुके अकोट यांस नोटिशीनें असें कळवितों कीं मौजे तुपगाव तालुके अकोट येथें तुमची इनामी जमीन तुमचे नावें आहे ती तुह्मी आह्मास सन १२८६ तागाईत सन १२९२ फसली पावेतों सात वर्षे सरकारी सान्याशिवाय तुमचे स्वामित्वाबद्दल रुपये ३५ दरसालप्रमाणें सात वर्षांचे रुपये २४५ देण्याचे कबूल केलें. यावरून तुह्मी आमचे पासून दस्तैवज लिहून घेऊन सदर्हू जमीन आह्मास वहितीस दिली व त्यावरून आह्मी जमीनींतील कुंधा वगैरे काढून साफ केले नंतर तुमचा दस्तैवज आह्मांस करून द्यावा ह्मणून आह्मी ह्मटलें असतां तुह्मी आह्मास सांगितलें कीं सात वर्षांचे नफ्याबद्दल रुपये २४५ चा सावकारी आकडा व सरकारी सान्याबद्दल मौजे मजकुरचे पाटील यांची तिऱ्हाइती असें आह्मास आणून द्यावें ह्मणजे आम्ही तुह्मास दस्तैवज करून नोंदून देऊं. त्याजवरून आम्ही सावकारी आकडा २४५ रुपयांचा व पाटील यांचें पत्र तुह्मास आणून दिलें असतां सदर्हू आकडा व पाटील मजकूर यांचें पत्र तुह्मी नाकबूल करून सदर्हू जमीन तुह्मी आमचे भाऊबंद भाऊजी बापुन्याजी देशमुख मौजे तुपगाव याजला दिली व त्यांनीं आमचे वखर बंद केले. यास्तव या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं या कामांत तुह्मी आमशी दगाबाजी केली हें योग्य नाहीं करितां या नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत सदर्हू शेत वहीतीस आमचे ताब्यांत द्यावें. न दिल्यास शेताचे लागवडीबद्दल, नुकसानीबद्दल, व साहूचे व्याज बव्याबद्दल कोर्टामार्फत तजवीज करण्यांत येईल. कळावें. तारीख २ माहे आगस्ट सन १८७६ इसवी.

[सही], गणपतराव चंद्रभान देशमुख दस्तुर खुद.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० १३ माहे आगष्ट सन १८७६ इ० अंक ३३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. महाराज पर्जन्यानें प्रथम वक्रदृष्टि केली होती परंतु हल्लीं प्रेमावलोकनानें इकडे लोकांस आनंदी केलें आहे. प्रथम बरेच दिवसपर्यंत झडी धरली होती परतु आतां उघाडी दिल्यानें निंदण्याचें ( भांगलीचें ) काम सुरू असून जंगलांत ढवरे धरण्याची धूम उडून गेली आहे. ह्याकालपर्यंत पिकें बरींच आहेत.

हल्लीं इकडे श्रीधर बुवा नावाचे नगपुरा नजिक कळंब ह्मणून गांव आहे तेथील रहाणोर फिरत असतात यस्तहास एक महिना कीर्तन समारंभ झाला. जरूड येथें ही बरेच दिवस समाज होऊन हल्लीं मोर्शीकडे रवाना झाले परंतु मोर्शीस पोंचत तोंपर्यंत बरेच दिवस लागतील. कारण गांवोगावचे लोक बुवास आपले गांवीं नेण्यास्तव व एक रात्र तरी कीर्तन समारंभ होण्यास्तव उमेदवार असतात.

बुवा तरूण आहेत, वृत्ती उदासीन असून सर्वांभूती नमन व प्रेमयुक्त भाषण करून सर्वांचें मन रंजवितात. नित्य रात्रीं कीर्तन समारंभ होतो वाणी संस्कार वऱ्हाडी जरी आहे तथापि विषय विप्रयांतर होऊन पुन्हा मूळपदावर येणें हा प्रकार बरा आहे. बहुतकरून ब्रह्मनिरूपण होत असतें. शेवटलें दिवशीं राधाविलास श्रृंगार रस प्राधान्य स्त्री पुरुषांस कथन केल्यावर गोपाळकाला करतात. ज्या गांवीं जें मिळेल तें तेथेंच उडवून व दान धर्म करून टाकावें व दुसरे गावीं जावें हा क्रम असतो नित्य पंक्तीस जो येईल त्यास ना नाहीं. यामुळें बरेंच लोकांचा समुदाय असतो. हे बुवा कांहीं दिवसां पूर्वी अक्कलकोट येथें जाऊन स्वामी महाराजांच्या सन्निध कीर्तन करून कालक्षेप करीत असतां एके दिवशीं स्वामींनीं कीर्तनास येऊन एक रुमाल नागपुरी यांचे आंगावर टाकला व सांगितलें कीं दुसरी वस्तु यशवंता ( देव मामलेदार ) पासून घे.

स्वामीची आज्ञा झाल्यावर बुवाची स्वारी यशवंतराव महाराजाकडे आली त्यांणीं पहातांच सांगितलें कीं स्वामींनीं सांगितलेली वस्तु आहे ती मी देतों. व एक दोन दिवस राहिल्या नंतर एक झोळी देव मामलेदार यांणीं दिली. हल्लीं श्रीधर बुवा ती झोळी गावांत फिरवित असतात व भजन समारंभीं तो रुमाल बांधित असतात. कीर्तनीं व भोजनीं स्वामी महाराजांची व यशवंतराव महाराजांची जय चाललेली असती.

बुवांची निस्पृहता बरी आहे. लोभ नाहीं; संग्रह नको, यामुळें लोकांचीं मनें फार राजी असतात. कळावें. तारीख १ आगष्ट सन १८७६ इसवी.
मुक्काम जरूड तालुके मोर्शी.

तुमचा बातमीदार
( क्ष )

---

### स्वदेशीय वस्त्रें अधिक चांगलीं.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज आपणाकडे खालीं लिहिलेल्या चार ओळी पाठविल्या आहेत त्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

हा हिंदुस्थान देश फार पुरातन काळापासून सुधारणेच्या कळसास जाऊन पोंचलेला आहे हें आमच्या एकदेशी मतानेंच सिद्ध होतें असें नाहीं तर पृथ्वीच्या सर्व भागांतील लोक याच्या कीर्ति समुद्रांत गटंगळ्या खात आहेत पण अजून पैलथडीस गेले नाहींत यावरून सिद्ध होतें. पण तो हल्लीं इतक्या निकृष्टावस्थेप्रत पावला आहे कीं या सारखा अभागी, दुर्बल, हतवीर्य व बोळ्यानें दूध पिणारा देश पृथ्वीच्या पाठीवर दुसरा क्वचितूच असेल याला कारण त्यांतील रहाणारांचें दुर्दैव ह्मटल्यावाचून उपाय नाहीं.

पहा या देशांतील अनेक वस्तु परदेशीं जात असत त्यांत कापड हें जर घेतलें तर कांहीं वर्षांपूर्वीचें परदेशांतूनही याचें नाव सापडतें. तेव्हां एथील लोकांचे निर्वाहापुरतें कां कापड एथें विणलें जात नसेल ? पण हल्लींची स्थिति पहातां देशी कापड किती थोडे लोकांचे वापरण्यांत आढळतें? मला वाटतें कीं परदेशीय कापड ज्याचे अंगावर नाहीं असा हजारांत ही एक निघेल न निघेल याची भ्रांतीच आहे. यावरून वाचकांचे मनांत सहज कल्पना येईल कीं देशी कापडापेक्षां त्या परदेशांतून आलेल्या कापडांत कांहीं असाधारण गुण असला पाहिजे तरच लोकांनीं घरचें टाकून शेजारचें वस्त्र अंगिकारिलें असेल. ह्मणून ती कल्पना दूर होण्याकरितां आपण त्याचा विच्यार करूं.

परदेशाहून येणारें वस्त्र हवें तसें रुंद, सफा, हलकें, किमतीनें स्वस्त व देखणें असल्यामुळें एतद्देशीय लोकांची त्यावर आसक्ती जडली. आतां हे वर दर्शविलेले गुण देशी वस्त्रांत नाहींत असें नाहीं पण किंमत तेवढी अधिक पडते. व जितकी कमी किंमत पडेल तितकी खर्चून निर्वाह करण्याचा मनुष्यमात्राचा साधारण कल असल्यामुळें विदेशीय वस्त्राचा प्रचार वाढला याबद्दल त्यांस दोष देतां येत नाहीं; पण या काटकसरीनें एतद्देशीय विणकरांच्या ताऱ्या लागल्या याचा विच्यार देशहितेच्छु लोकांनीं करणें जरूर आहे.

आतां कापडाची किंमत काढावयाची ह्मटली ह्मणजे त्या वस्त्राला लागलेल्या कपाशीचा दाम आणि तें तयार करावयास लागलेली मजूरी याबरोबर असती. पण या गोष्टीचा विच्यार आमचे लोक हें कापड खरीद करतेवेळीं करतात काय ? कधीं नाहीं. फक्त त्याच्या दिखाऊ रूपावरच भाळून त्याचा संग्रह करतात आणि फसतात. कारण सदहू कापड प्रथमारंभीं जरी स्वस्तसें वाटतें तरी परिणामीं फार महाग ठरतें. वस्त्राच्या अंगीं अवश्यक गुण पाहिजे असा जो टिकाऊपणा तो इंग्रजी कापडाच्या अंगीं फार थोडा असतो. व तो कमी असणें साहजीकच आहे. पहा, विलायती कापड सर्व यंत्रावर तयार होतें. ह्मणजे १० मनुष्यांचे काम एक मनुष्य त्या यंत्राच्या साह्यानें करूं शकतो. तेव्हां हेंही कारण तें कापड स्वस्त दरानें खपण्यास सबळ आहे. पण त्याच यंत्राच्या तीक्ष्ण दात्यांनीं कापूस पिंजते वेळीं वगैरे त्यांतील टिकणारे तंतू दुखंड होऊन निर्बल होतात. तसाच येथून ६ हजार कोसांवर कापूस जाऊन तेथून त्याचें वस्त्र विणून येतें. तेव्हां जितकी थोडी जागा व्यापेल तितकी बरी ह्मणून इकडून विलातेस जाणाऱ्या कापसावर त्याचप्रमाणें तिकडून येणाऱ्या कापडावर जी दाबण्याची अनन्वित क्रिया घडती ती पक्या गठडी वरून आपण सर्व पहातोंच. या अचाट दाबानें त्याचा कस कमी होऊन तो निर्जीव होतो असें कित्येक बारीकदृष्टच्या विच्यार करणाऱ्यांचें मत पडतें. व या पैकींच एकादें कारण खरेंही असले पाहिजे. कारण आपल्या देशांतील मलमल, नांदेडी पागोटें, मोहमद्या ( शेले ) पवणारचे धोत्रजोडे यांच्या तलम सुताकडे लक्ष देऊन टिकाऊपणा पाहिला तर विलायतेहून येणारा मांजरपाट व लठ्ठा हेंही कापड त्याच्या बरोबरीनें टिकूं शकत नाहीं. पूर्वी आमचे वऱ्हाडांत पवणारचे धोत्रजोडे येत असत ते चांगले बारीकसुती, लांबरुंद पुरेसे असून त्यास ४।५ रुपये किंमत असे पण अलीकडे २ रुपयांस विलायती धोत्रजोडा त्याच धाटणीवर मिळतो तेव्हां ४, ५ रुपये खर्चून कोण घेतो ? अर्थांत तीं चाल बंद झाली पण तो वर्षभर टिकत होता त्याचे बदलांत हे ३ एका वर्षांत घ्यावे लागतात, याचा विच्यार जर आमचे लोक करतील तर त्यांस देशी कापड महाग वाटणार नाहीं व प्रघात पडेल. कळावें लोभ करावा ही विनंती. तारीख ८ आगष्ट सन १८७६ इसवी.

तुमचा दास
रामात्मज

---

वाशिम. ता. २आगस्ट १८७६.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालीं लिहिलेला मजकूर प्रसिद्ध करावा.

येथील कमेटीचें उत्पन्न कमी झालें आहे ह्मणून मागील पर्वी आपल्यास कळविलेंच आहे. तें भरून येण्यास कमेटीच्या हातीं ३४वे कलमाचें वज्र आहे ही एक दुःख मिश्रित आनंदाची गोष्ट आहे. आनंद या करितां कीं त्या पैशापासून शहर सफाई होते. व दुःख अशामुळें कीं त्या कलमाचे निमित्तानें एकाद्या संभावित गृहस्थाची अब्रू घेण्यास पोलिसास फारसा वेळ लागत नाहीं. तारीख २८ जुलै रोजीं सकाळीं मी शहरांतून फिरत असतां सुमोरे पांच पन्नास लोकांस ( त्यांत कित्येक संभावित असून कित्येक हलके लोकही होते ) पोलिसांनीं पकडून नेतांना पाहिलें. त्यांत विशेष चमत्कार हा कीं पकडलेल्या लोकां पैकीं कित्येकांचे हातीं शौचाचा तांब्या असून कित्येकांचे डोईवर कचऱ्यानें भरलेल्या पाट्या दिल्या होत्या. पाट्यांतील कचरा सदहू इसमांच्या घरांतील किंवा बाहेरील होता अगर ते म्युनिसिप्यालिटीच्या हद्दीच्या बाहेर किंवा आंत शौचास बसले होते किंवा नाहीं हे माझ्या ऱ्यानें सांगवत नाहीं परंतु त्यांस प्रायश्चित्त देण्याकरितां एका काळ्या अधिकाऱ्याकडे नेलें होतें. अधिकारी बुवांस काम पुष्कळ असल्यामुळें तारीख २८ रोजीं दंडरूप प्रायश्चित्त मिळालें नाहीं. तारीख २९ रोजीं कित्येकांस च्यार आणे, कित्येकांस आठ आणे, क्षमा दंड होऊन ज्यांनीं थोडीशी तक्रार करून गुन्हा न केल्याबद्दल पुरावा करण्याविषयीं प्रयत्न केला त्यांस मोठें प्रायश्चित्त मिळालें. ह्मणजे दोन दोन तीन तीन रुपये दंड झाला असें ऐकतों. कित्येक काळ्या गोऱ्या अमलदारांसमोर आरोपीनें अथवा प्रतिवादीनें आपल्या बचावाकरितां पुरावा आणिला तर त्यांचें पित्त चढतें. त्यांस कोणाऱ्या नें अंजन देऊन दिव्यचक्षू करवत नाहीं काय? यामुळें गरीब बिचारे लोक नुकसानीस पात्र होतात हें आपण धडधडीत डोळ्यांनीं पहातों. कसेंही असो कमेटीची तुंबडी भरते.

गावांत जिकडे तिकडे गवत सुरू आहे. लोकांनीं आपापल्या आवारांतील गवत काढावें येवढेंच नाहीं परंतु आपापल्या घरांसमोरील सरकारी- रस्त्यावरीलही का-

दविण्याविषयीं पोलिस प्रयत्न करीत आहे. लोक बिचारे गरीब ह्मणून ऐकतात परंतु शेरास सवाशेर कोणी भेटत नाहीं. यावरून कमेटीचा किती ताप आहे याची आपण कल्पना करालच.

सार्वजनिक कामाकरितां व सुखाकरितां कमेटीची स्थापना केली असून सार्वजनिक पैशावर तिचें उत्पन्न आहे. त्या अर्थी त्या पैशाचा व्यय कमेटी कसा करिते हें पाहण्याचा लोकांचा हक्क आहे व असावा. लोक पाहत नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. यामुळें पैशाचा खर्च पाहिजे त्यारीतीनें होतो, इतकेंच नाहीं परंतु वाशिमचें उदाहरण घेतलें असतां कमेटीच्या कायद्या विरुध्ध होतो असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. कायद्यांत स्पष्ट सांगितलें आहे कीं ज्या कामाकरितां पांचशें रुपयांहून ज्यास्त खर्च लागण्याचा अंदाजा आहे त्या कामाचें एस्टिमेट व प्लयान करून मे० एग्झिक्युटिव्ह इंजिनियर साहेब यांजकडे पाठवावें. तसेंच ज्या जाग्याचा अथवा जिनसांचा हरास करणें आहे त्याजबद्दल प्रथम कमेटीची परवानगी घेऊन नंतर दोन वेळां सेक्रेटरी यांणीं हरास करून कमेटीस जाहीर करावें. तशी वहिवाट हल्लीं असल्याचें मुळींच दिसत नाहीं. सन १८७५।७६ सालअखेर सुमारें दोन तीन हजार रुपये कमेटीची शिल्लक होती त्यांतून हजार बाराशांचीं कामें हल्लीं सुरू आहत. तीं कामें लोकांस मक्त्यानें दिलीं असून त्यांबद्दल कमेटीची परवानगी अगर प्रोसिडिंग झाल्याचें ऐकिवांत नाहीं. मग दंडे सेक्रेटरी यांस कोणी हुकूम दिला असेल कोण जाणे. तसेंच दंडे बोवानीं गवत ज्या ठिकाणीं विकावयास बसते ती जागा हरास केली आहे. त्या जाग्याबद्दल सुंदर उदासी याणें कमेटीवर दिवाणींत फिर्याद लाविली आहे परिणाम काय होतो तें पहावें. कमेटीवर ही पहिलीच फिर्याद आहे. त्यांत न्याय होऊन ज्याची त्यास जागा मिळो असें आह्मी इच्छितों. मे. अब्दूल हक्क सा. यांचे कोर्टांत ही फिर्याद चालू आहे. कळावें

एक
फिरस्ता

---

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ९ शके १७९८.

---

# काळा आणि गोरा या संबंधानें न्यायांत फरक.

ब्राह्मणाचे राज्यांत ब्राह्मणास आणि मोगलाई अमलांत त्या जातीस गुन्ह्याची बऱ्याच अंशीं व्यवहारीत्या माफी असे; मग देशाचे कायद्यांत कांहीं असो. आणि वस्तुतः राज्यकर्त्ता व प्रजा यांमध्यें जाति संबंधानें जर भेद असेल तर राज्य कर्त्या जातीवर कायद्याची नजर जरा नरम रहाते व त्यांचे बाबदींत कायद्याची समदृष्टि भ्रष्ट होते असें अनुभवसिद्ध आहे; व मानवी स्वभावास ही गोष्ट अनुसरून आहे. वस्तुगत्या आमच्या हिंदु लोकांची इंग्रजी अमला खालीं वरील स्वाभाविक ओघाविरुद्ध स्थिति आहे असें नाहीं हें आह्मी अनुभवतोंच आहों; आणि हल्लींची आपली स्थिति चालू राहीपावेतों यांत मोठासा फरक होईल अशी आशा बाळगण्यास ही तादृश कारणें आहेत अगर घडून येतील असें विचारी लोक समजत नाहींत. आमची स्थिति आह्मी प्रजा असल्यामुळें व आमचे राज्यकर्ते परदेशीय असल्या कारणानें जशी असण्याचा संभव आहे तशीच आहे. याकरितां जरी ती आह्मांस नीचावस्थेस आणीत आहे तरी तीबद्दल आह्मास दुसऱ्यास दोष ठेवण्यास जागा नाहीं; याबद्दल निदान खुद्द आह्मां इतका दोषी दुसरा कोणी नाहीं. परंतु आपण तो पतकरण्यास नाकबूल असल्यास आपलें प्रारब्ध तो शिरावर घेण्यास तयार आहेच. तेव्हां सांप्रत काळ्या गोऱ्या संबंधानें आमचे सरकारचे न्यायांत फरक झाल्यास आह्मांस कुरकुर करण्यास जागा नाहीं. परंतु आमचें दयाळु सरकार या अनुभवाविरुद्ध आह्मांस उपदेश करितें ह्मणजे सरकारचे घरीं सर्व प्रजा सारख्या, सर्वांस एकच कायदा, एकच न्याय, सारखेच हक्क, असें ह्मणतें व त्यावर आह्मी पूर्ण विश्वास ठेवावा असें इच्छितें याबद्दल आह्मांस आश्चर्य व दुःख वाटतें. आश्चर्यास कारण कीं आमची रयतेची वास्तविक स्थिति काय आहे, आह्मांस सरकारचे अधिकारी कसे वागवीत आहेत, काळा व गोरा हे न्यायाचे कोर्टांत गेल्यास कसा न्याय होतो, काळ्यानें गोऱ्यास सलाम न केल्यास कसे चाबुक बसतात, व काळ्याचे कितीही खून केले तरी गोरा किती सुलभ रीतीनें सुटतो, हें सरकारास कळत नाहीं. आणि दुःख वाटण्यास कारण कीं, आह्मी कितीही जरी नीट वागलों तरी सरकारास आह्मी नीट दिसत नाहीं, आह्मावर सरकारचा भरवसा नाहीं, आह्मांस रयतेचे सर्व हक्क मिळत नाहींत इतकेंच नाहीं परंतु आह्मी जर सरकाराजवळ गाऱ्हाणीं करण्यास गेलों तर सरकार आमचे राजनिष्ठेची शंका घेतें.

पूर्वींचे राजे व आपले हल्लींचे सरकार यांत स्वपर जातीस वागविण्याचे संबंधानें जो फरक आहे तो अशा अंशीं आहे. ह्मणजे पूर्वींचे राजे स्वजातीचे लोकांस उच्च समजून त्यांस मान मरातब व मोठमोठे अधिकार ज्यास्ती देत, व शिक्षेपासून त्यांस पुष्कळ अंशीं मुक्त राखीत आणि तोंडानें तसें कबूल करीत. ब्राह्मणाचें राज्य कारकीर्दींत ब्राह्मणास देहांत शिक्षा नव्हती. मनूच्या कायद्यांतही एकाच अपराध्यास वर्गाचे फरकानें नीचास ज्यास्ती आणि उंच वर्णास कमी शिक्षा सांगितल्या आहेत. परंतु आमचें सरकार सर्व रयतेस एकच कायदा असें तोंडानें ह्मणतें आणि पिनल कोडांत काळ्या गोऱ्याचे जातीस निराळे ह्मणजे गोऱ्यास अनुकूळ व काळ्यास प्रतिकूळ नियम ठरवितें. व गोऱ्यानें काळ्याचे कितीही खून केले असले तरी अपराधी बहुतकरून कोणत्या तरी एकाद्या पकडीनें सुटती, अथवा जेथें काळे लोकांस सर्व प्रकारचे मोठे हुद्दे देण्यास हरकत नाहीं असें वर्षांनु वर्ष ह्मणतें परंतु अजून तें अमलांत येत नाहीं. या व अनेक प्रकारचे उदाहरणावरून असें दिसतें कीं कृतींत तादृश अंतर नसून पूर्वींचे राजे करीत तें कबूल करीत परंतु आमचें सरकार तसें बोलून दाखवीत नाहीं. मनूनें वर्णभेदानें एकाच अपराधास निरनिराळ्या शिक्षा सांगितल्या आहेत हें पाहून त्याचा आमचे राज्यकर्ते उपहास करितात. परंतु आमच्या मतें पूर्वींचे कायदेकर्ते व राज्यकर्ते यांस सत्यवचना प्रीत्यर्थ अधिक मान देणें योग्य आहे. कारण त्यांचे वचनांत व कृत्यांत मेळ असे. तो आतां फार कमी दिसतो.

या वरील लिहिण्यांत आमचे राज्यकर्त्यांस आह्मी दोष देऊं इच्छित नाहीं. व तसें करण्यांत आमचा विशेष फायदाही नाहीं. परंतु काळ्या रयतेच्या संबंधानें सरकारी इंग्लिश नोकरांच्या व साधारणतः इंग्लिश लोकांच्या नेटिवाशीं अलीकडील वर्तनावरून या बाबदींत चार शब्द लिहिण्याचा प्रसंग आला आहे. आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, आमचे इंग्लिश अधिकारी पूर्वींप्रमाणें रयतेवर मेहेर नजर ठेवीत नाहींत व काळ्या गोऱ्याच्या न्यायांत ज्यास्ती फरक करूं लागले आहेत. अलीकडे गोऱ्याचे हातून काळ्यावर अन्याय व जुलूम झालेला नाहीं असें ऐकिल्याशिवाय एक आठवडाही जात नाहीं. या प्रकारचे अन्याय बंगाल इलाख्याकडून विशेषें ऐकूं येतात. तिकडील इंग्लिश अधिकाऱ्यांनीं अगर इंग्लिश लोकांनींच अशीं कृत्यें कां करण्याचें मनावर घ्यावें हें समजत नाहीं. बंगाल्याकडील अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रद्वारें बहुतकरून बाहेर पडलेल्या आहेत. आणि ज्या अर्थी तिकडील वर्तमानपत्रकर्ते आपलें कर्तव्य अधिक चांगल्या रीतीनें बजावीत आहेत त्या अर्थी आह्मी समजतों कीं तिकडील अशीं कृत्यें मात्र उघडीस येतात दुसऱ्या ठिकाणचीं येत नाहींत, व घडतात सर्वत्र.

गोऱ्यानें काळ्याचा अन्यायानें जीव घेणें व त्याबद्दल अपराध्यास योग्य शासन न होणें अशाप्रकारचें एक ताजें उदाहरण आग्रा शहरांत घडून आलें आहे. तेथील वकील मि० फुलर याणें आपल्या घोडेवाल्यास इतकें मारिलें कीं, तो तत्काळ मेला, आणि या अपराधाबद्दल मि० लिट्टुल जिल्हा माजिस्त्रेट यांणीं अपराध्यास तीस रुपये दंड केला. जरी ठार मारण्याचे इराद्यानें फुलर साहेबांनीं आपले घोडेवाल्यास मारलें नसेल तरी त्याचा परिणाम खून झाला. आणि कायद्याचे शकलीनें या कृत्यास नाव द्या परंतु लौकिक दृष्टीनें फुलर यास तीस रुपये दंडानें योग्य शिक्षा झाली नाहीं असें ह्मणणें जरूर येतें. मारलेला माणूस घोडेवाला असल्यामुळें धट्टाकट्टा, मजबूत व निरोगी माणूस होता असें सहज अनुमान होतें. शेंडी धरून खालीं पाडल्याबरोबर मरण्याजोगा तो रोगग्रस्त होता असा एकाएकी कोणाचाही ग्रह होणार नाहीं. त्याची प्लीहा मोठी झालेली होती व ती फुटल्यानें घोडेवाला मेला खरा पण ती फुटण्यास फारसा मोठा धक्का अगर मारामारी नको अशी डाक्तराची शायदी मिळाली यांत आश्चर्यासारखें नाहीं. कारण पूर्वीं अशा प्रसंगीं अशाप्रकारच्या जबान्या झालेल्या आहेत व त्या नेटिवाच्या दुर्दैवानें इतक्या झालेल्या आहेत कीं, त्यांचा परिणाम फार भयंकर दिसत आहे तो [illegible] कीं, आतां गोऱ्याचे हातून नेटिव [illegible] ह्मणजे दुसरीं कारणें शोधण्याची जरूर राहिली नाहीं. आणि केवळ मारल्यामुळें झालेल्या इजेनें मेला, प्लीहा रोगिष्ट असल्यामुळें मेला नाहीं असें आतां नेटिवास शाबिद करणें अति कठीण पडेल. कारण कीं या बाबदींत इंडिया सरकारानें केलेले ठरावांत सरकार असें लिहितें कीं "या देशांत रहाणारे लोकांचे अंतर्गत इंद्रियांस नेहेमीं अशा रीतीनें रोग झालेला असतो कीं, त्यांचे अंगाबाहेरून देखील लहानसा धक्का मिळाल्यास प्राणनाश सहज होऊं शकेल." या लिहिण्याचा झोंक वरील ठरावांत असें दर्शविण्याचा आहे कीं, अशाप्रकारचीं शरीरें जगजाहिर नाजुक असतां त्यावर हात टाकणें विशेष अन्यायाचें आहे. परंतु या लेखांपासून आजतागायत झालेल्या नेटिवांच्या खुनाबद्दल जें दुःख होत आहे त्यापेक्षां आह्मी ज्यास्त मानितों. कारण कसाही घडाखडा नेटिव आतां गोऱ्यानें मारिल्यास प्रथमदर्शनीं पुरावा तो नेटिव अशा रीतीचा रोगग्रस्त होता कीं, एका बुक्कीनें मरण्यास तो पात्र होता असें माजिस्त्रेटानें अनुमान केलें पाहिजे, तो मरण्याजोगा नव्हता हा असंभाव्य पुरावा करण्याचा बोजा वादीतर्फेवर ठेविला पाहिजे असें होईल. आतां डाकटराचीही जरूर राहिली नाहीं. अर्थात खुनाची शाबिदी होणें नलगे. वरील लिहिण्याचा अर्थ आमचे दयाळु गवरनर जनरल साहेब यांचे लक्षांत आला नसावा आणि त्यांचा तसा नाहीं हें उघड आहे. परंतु आह्मी ह्मणतों, या प्रमाणें त्याचा परिणाम कां होणार नाहीं? याचा कोणी विचार केलेला दिसत नाहीं कोणी या बाबदीकडे नजर पोंचविल्याबद्दल त्या साहेबाची स्तुती करीत आहेत व इंग्लिश लोकांस तें न रुचल्यामुळें निंदा करतात ही एक गोष्ट झाली. परंतु मुख्य गोष्ट ही कीं, मि० फुलर याणें आपले घोडेवाल्यास ठार मारिलें असून तो युरोपियन ह्मणून युरोपियन माजिस्त्रेटानें त्यास किंचित् दंडावर सोडावें हा मोठा अंधार व जुलूम समजला पाहिजे. हें उघड आहे कीं जर मारणारा नेटीव असता तर बहुतकरून योग्य न्याय झाला असता. जसा युरोपियनानें नेटिवाचा कसाहि अपराध केला तरी अपराधी सुटतो तसाच नेटिवानें युरोपियनाचा अपराध केल्यास अपराधाचे शेकडोपट शिक्षा होते. आणि अनेक प्रसंगीं नेटिवानें खरोखर अपराधही करण्यास नको, मात्र त्याणें अपराध केला अशी शंका यावी अथवा त्यास शिक्षा करण्याचें

अधिकाऱ्याचें मनांत यावें ह्मण ग्पराधी ठरून शिक्षा पावतो. उदाहरण दृष्टीस पडलें आ एक गरीब मुलावर माजिस्त्रे वऱ्हाडस कुत्रा मारल्याचा खोटा आ ग्स्ट्रेटाचे मेहेतरानें आणितांच वर्षाचे ट साहेबानीं त्या मुलास पहिल्यानें सालअ ग्यानें मरेमरे पावेतों मारिलें. नंतर ख किरज करून कैद दिली. माजिस्त्रेटानें त्या स मारिल्याबद्दल त्यास फियोद करूं वर्षाशी नाहीं. ही तिसरी गोष्ट.

अशाप्रकारचीं उदाहरणें आलीकडे ऐकूं येतात, त्यांची गणना करण्यांत कार्य नाहीं. यासर्वांचे तात्पर्य एकच कीं, नेटिवांवर युरोपियनांनीं केलेले जुलम आणि अपराध्याचा शिक्षेपासून बचाव किंवा अल्पशिक्षा. अशा प्रसंगीं गव्हरनर जनरल साहेबांनीं मि० फुलर यांचे बाबदींत फुलर यास, चौकशी करणारे माजिस्त्रेटास, हाय कोर्टास, व लेफ्टनेंट गव्हर्नर यांस चरचरीत हुकुम फर्माविला आहे याबद्दल हिंदुस्थानचे रयतेनें त्यांचे आभार मानिले पाहिजेत. आणि आह्मी अशी अशा करितों कीं अशा प्रकारचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची छोटेखानी अधिकाऱ्यांचे कृत्यावर नजर राहो आणि रयतेस चांगला न्याय मिळो व जुलूम न होवो.

---

**पर्जन्याचा आहवाल**—मद्रास इलाख्यांत उत्तर व मध्यभागास पाऊस कमी आहे, व हंगाम सुधारला नाहीं. झैसुर प्रांतांत पाऊस थोडा पण फायदेशीर झाला आहे. मुंबई इलाख्यांत कित्येक प्रांतांत चांगला पाऊस झाला परंतु खानदेश. दक्षिण, कलादगी, धारवाडचा काहीं भाग यांत आणखी पाऊस पाहिजे. सिंध प्रांतांत नद्या फुगल्या आहेत, कालवे तुडुंब भरले आहेत, आणि हंगाम उत्तम आहे. सेंट्रल प्राव्हिन्समध्यें साधारणपणें पाऊस पुष्कळ आहे तरी भंडारा आणि नागपुर जिल्ह्यांत आणखी पाहिजे. वऱ्हाडांत अजून पुष्कळ पाऊस पाहिजे. मध्य हिंदुस्थानांत व रजपूत संस्थानांत पर्जन्य चांगला आहे बंगाल इलाख्यांत बहार प्रांतांत पाऊस कमी, बाकी सर्वत्र चांगला आहे. वायव्यप्रांत, अयोध्या आणि पंजाब या मुलखांत पाऊस जून पडला तरी हंगाम बरा आहे.

कांहीं कांहीं ठिकाणीं तारीख ३ आगष्ट रोजीं संपणाऱ्या आठवड्यांत पाऊस किती पडला व बरसात सुरू झाल्यापासून एकंदर पाऊस किती पडला याचें टिपण—

| ठिकाण | आठवडा | एकंदर |
|---|---|---|
| | इंच | इंच |
| सुरत | ७ | २९ |
| भडोच | ६ | १६ |
| खानदेश | ॥ | ९। |
| नाशीक | ॥। | ११। |
| ठाणें | ११ | ६१ |
| पुणें | ॥ | ११ |
| नगर | . | ९॥ |
| सोलापुर | १ | ४॥ |
| सातारा | ५॥। | २६॥ |
| बेळगाव | २॥ | २४। |
| कानडा | १०॥ | ७८ |

**रेशीम.**—कोइमतूर येथील कलेक्टरानीं रेशमाची लागवड सुरू करून पाहिली. तो आरंभ मोठा चमत्कारिक व समाधानकारक आहे. प्रथम म्युनिसिपालिटीच्या मार्केटाच्या पडीत जागेंत तारिख ५ आगस्ट सन १८७५ रोजीं तुतीच्या झाडाच्या ३ फांद्या त्यांनीं लाविल्या. त्या जाग्यांत सोनखत पडलेलें होतें व अठा दिवशीं पाणी देऊं लागले. पुढें त्या झाडांना पानें बरींच येऊं लागलीं असें पाहून त्यांनीं रेशमाचे किडे थोडे मिळविले. व अशा खटपटीनें गेल्या मार्च महिन्यापावेतों १२ पौंड रेशीम काढलें. हल्लीं दीड एकर जमीन तुतीच्या झाडाखालीं आहे व किडेही पुष्कळ आहेत. रेशमाचे हंगाम वर्षांतून ६ होतात. रेशीम काढण्याचा एक देशी रहाट तयार केला आहे त्यास तीन रुपये खर्च लागला. प्रथम रेशीम खरखरीत निघत होतें तेव्हां पोट्याश व साबण यांचा उपयोग केला तेव्हांपासून तें नरम निघूं लागलें. रेशमाचा भाव त्या प्रांतीं सुमार ६ रुपये पौंड आहे व दीड एकर जमीनींत वर्षास २०० पौंड रेशीम निघेल असा अजमास आहे.

---

## वऱ्हाड.

वऱ्हाडप्रांताच्या संबंधानें पायोनियर पत्राचा लंडनचा बातमीदार लिहितो कीं स्टेटसेक्रटरी निजाम सरकारचे हक्काचा विच्यार करण्याकडे वळले आहेत असें दिसतें. त्यावरून आतां माजी व्हाईसराय यांनां सालरजंग साहेबांचें ह्मणणे नाकारिलें, त्यांचा त्यासंबंधीं पत्रव्यवहार नाकारिला, स्टेटसेक्रटरीपुढें त्यांची गोष्ट नेण्याचें नाकारिलें याविषयीं संशय घेण्यास जागा राहाते. असें ह्मणतात कीं लार्ड-नार्थब्रूक प्रमाणेंच इंडिया कौन्सलांतील बहुतेक मेंबर सालरजंग साहेबाची गोष्ट ऐकण्यास नाराज होते परंतु इंग्लंडांतील कित्येक वजनदार सभ्य गृहस्थ व सरदार व राजकारस्थानी पुरुष यांनीं या गोष्टीचें मर्म काय आहे तें लक्ष्यांत आणून तिकडे चित्त पुरविलें. अतां ही गोष्ट खरी आहे कीं ज्या कोणाचें मन कोणत्याच एका प्रकारानें दोषी झालेलें नाहीं व ज्याच्यापुढें त्यातील खऱ्या गोष्टी बनावटीनें न पालटतां जशाच्या तशा ठेविल्या तर त्यांचे अभिप्राय निजामाच्या हक्कास अनकूळ असे सहज पडतील. आतां जी गोष्ट वाटाघाटीस सुरू झाली आहे ती मधल्यामध्यें कधीं दबणार नाहीं. इंग्लंडच्या स्वाभाविक मनोवृत्तीचा असा बाणा आहे कीं ती एकदा चेतली गेली ह्मणजे अन्यायाच्या कृत्यांनीं मुडदार होऊन झोपी जाणार नाहीं.

सर सालरजंग साहेब यांनीं विलायतेहून निघण्यापूर्वीं प्रिन्स आफ वेल्स, लार्ड स्यालिस्बरी व दुसरे ४०० सभ्य गृहस्थ यांस आपले येथें मोठी मेजवानी दिली. त्यांच्याविषयीं इंग्लंडांत सर्वत्र चांगला ग्रह झाला आहे. कित्येक मासिकपुस्तकांत त्यांच्या संबंधानें वऱ्हाड परत देण्याविषयीं अनुकूळ लेख आले आहेत, त्यावरून वइतर बातम्यांवरून सरकारांत विच्यार होईल असें दिसतें. कोणी लिहिलें आहे कीं पुढील उन्हाळ्यांत सालरजंग साहेब पुन्हा विलायतेस जातील.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं कमिशनरपासून हिंदुस्थान सरकारापर्यंत बहुत दिवस वाटाघाट चालून शेवटीं रा. रा. श्रीराम भिकाजी जटार बी. ए. यांसच वऱ्हाडच्या एजुकेशनल इन्स्पेक्टरची कायमची जागा मिळाली. मि. एटकीन साहेब हायस्कूलचे हेडमास्तर व मुंबई इलाख्यांतील दुसरे कित्येक नेटिव गृहस्थ या जागेस उमेदवार होते ह्मणून कसा काय प्रकार घडेल याजविषयीं काळजी होती पण ती दूर झाली आणि जें व्हावयास योग्य व जें बहुत दिवस सर्वांनीं अपेक्षिलें तेंच शेवटीं घडून आलें, तेव्हां याबद्दल कोणास संतोष होणार नाहीं? रा. रा. श्रीरामपंत या जागेस सर्वोपरि योग्य आहेत व याबद्दल अनेकवार कित्येक पत्रांतून मजकूर प्रसिद्ध झाले आहेत ह्मणून त्याविषयीं अधिक लिहिण्याचें आतां प्रयोजन राहिलें नाहीं. आतां आह्मी उमेद बाळगतों कीं श्रीरामपंत यांना उत्तम जागा व रा. सा. नारायण भाई यांस उत्तम सहाय मिळालें आहे तेव्हां 'दुधांत साकर' याप्रमाणें सर्व खातें गोड होईल व कोणाचे मुखीं कांहीं कटु येणार नाहीं.

आतां या पुढें ज्या नेमणुका व्हावयाच्या त्या डायरेक्टर साहेब योग्य रीतीनेंच करतील अशी आमची पक्की खातरी असल्याविषयीं पूर्वींच एकवार आह्मी लिहिलें आहे. आतां त्या नेमणुका अद्यापपर्यंत झाल्या नाहींत यामुळें जें कांहीं आह्मांस समजतें आहे तें प्रसिद्ध करणें आह्मास अप्रशस्त वाटतें; तरी इतकें आह्मी खात्रीनें सांगतों कीं रिकामी झालेली जागा डिपुटी इन्स्पेक्टरांतच वर्गावर्गी होऊन भरणार व हें ऐकून सर्व जाणते लोकांस आनंद झाल्यावाचून राहाणार नाहीं.

---

क्या० एच डी पी रेनिक. थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस सेकंड क्लास केले.

---

**फोटोग्राफर**— रा. रा. नारायण गोविंद चिंचवडकर एथें आले आहेत व गावांतील कमानी पैकीं एका दुकानांत त्यानीं आपलें काम सुरू केलें आहे. हे तसबिरी चांगल्या काढतात असें ऐकतों, तर यांचा गुण पाहून लोकांनीं यांस आश्रय द्यावा.

---

क्या. फिटझगरलड साहेब आपले हेडक्वार्टरसुद्धां एथें आले आहेत. नाजर प्रकरणांतील तुटीची रकम त्यांचे हिश्शावर सुमार ५००० रुपये घातली आहे. तितकी आपणावर बसत नाहीं असें कागदपत्रांवरून सिद्ध करून देण्याकरितां ते एथें आले आहेत असें समजतें.

---

क्या. मेकंजी साहेब इलिचपुरचे डिपुटी कमिशनर एथें आले आहेत. उ.अ.

---

क्या बुलक साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर यांनीं २ महिन्यांची रजा घेतली त्यांचे जागेवर मे. लाटण साहेब यांस व खामगावास मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांस नेमिलें. ते लवकरच तिकडे जातील.

---

रेसिडेंट साहेबांनीं सिकंदराबादची ग्यारिसन व बोलारमची कांटिंजेंट यांची दुसरे तारखेस मोठी कवाईत करविली.

---

यवतमाळ जिल्ह्यांत तुरळक वाखयाचा उपद्रव आहे १०१ मनुष्यांस आजार झाला त्यांतून ३९ मरण पावलीं.

---

पर्जन्य—सर्व लोकांचे पावसाकडे लक्ष्य लागलें आहे, दोन आठवड्यांत पाऊस नाहीं. पिकें करपण्याचे बेतास आलीं, गुरास चारा नाहीं. नदीचें पाणी आटत चाललें, परमेश्वरास काळजी !

---

वाशमास गेल्या आठवड्यांत पाऊस बिलकुल पडला नाहीं तथापि शेतकरी लोक फारसे हवालदील नाहींत. तिकडच्या जमीनीस मुळीं फारसा पाऊस लागत नाहीं त्यांतून आजपर्यंत जें पाणी पडलें तें मागीतल्याप्रमाणें पडलें असें ह्मणतात. पिकें चांगलीं आहेत परंतु आणखी आठ दिवस पाऊस न पडेल तर पीक पाण्याचा खराबा आहे.

---

## वर्तमानसार

त्रावणकोरचे संस्थानची खानेसुमारी झाली. त्यांत लोक २३११३७९ आहेत. व त्या संस्थानचें उत्पन्न ५५६१६३९ रुपये आहे. व खर्च ५३२३५४० रुपये आहे.

राणी यमुनाबाई साहेब व श्री० सयाजीराव गायकवाड यांच्या हुबेहुब आयलपेंटिंगच्या तसबिरी काढण्याकरितां दिवाणानीं त्रावणकोर येथून मि० रामस्वामी नायडु यांस बोलाविलें आहे.

पी आणि ओ कंपणीचा माळवा नामें आगबोट गेले आठवड्यांत विलायतेस गेली तींतून २७ पेट्या सोन्याच्या गेल्या त्यांची किंमत २१८१४१० रुपये होती.

होळकर सरकाची रेलवे महूवरून उज्जनी पर्यंत ५० मैल नवीन चालू झाली.

जयपुरच्या महाराजा विषयीं जो विरुद्ध मजकूर प्रसिद्ध झाला तो खोटा आहे व इंग्लिश सरकारचें आणि त्यांचें अत्यंत प्रेम आहे असें हल्लीं प्रसिद्ध झालें आहे.

वर्तमानपत्रास हल्लीं जें डाकहाशील आहे त्याहूनही कमी व्हावें अशाविषयीं खटपट चालू आहे.

रुप्याचा भाव उतरला, सोन्याचा चढला व विलायतच्या हुंडीचा भाव चढला यासंबंधानें देशास नुकसान बरेंच झालें व आणखी होणार असें दिसत आहे. हिंदुस्थान सरकारानें ठराव केला कीं पब्लिक वर्कस खात्यांत जीं कामें या वर्षीं न केल्यानें मोठें नुकसान होणार आहे तेवढीं कामें मात्र करावीं व बाकी खर्च होईल तितका कमी करावा. याचप्रमाणे इलाख्याच्या सर्व सरकारानीं व खात्याखात्याच्या मुख्यानीं खर्चाच्या बाबींत जितका जितका खर्च अवश्य लागेल तितकाच करावा. व नुकसान होऊं देऊनये. म्युनिसिपालकमी

च्या, इतर सार्वजनिक कामें, नेटिव संस्था ।निक, किंवा कोणी मोठा गृहस्थ यांच्या कर्जाऊ पैशाकारितां मागण्या आल्यास त्यांस कांहीं देऊं नये वगैरे काटकसरीचे बहुत प्रकार लिहून आले आहेत तेव्हां सालम जकुरीं सरकारी खात्यांतून कांहीं नोकर लोक कमी होण्याचाही संभव दिसतो. मग पुढें पहावें.

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

नाणें सुरूं होणें, मग तें कोणत्याही प्रकारचें व कसेंही गैरसोईचें कां असेना, ही एक मोठी सुधारणेची गोष्ट आहे कीं, ज्या लोकांत असें नाणें सुरूं होतें त्यांची रानटी अवस्था सुटत चालली असें खास समजावें. नाणें असल्यापासून मुख्य फायदा हा आहे कीं, त्या नाण्यांत पाहिजे त्या पदर्थाची किंमत करता येते व १ जिन्नस देऊन दुसरी जिन्नस घेण्यास एक मोठें सर्वत्र चालणारें असें साधनहोतें. कोणत्याही प्रकारचें नाणें नसतांना जर एकाद्या मनुष्याच्या सर्व मालमत्तेची इयत्ता काढणें आहे तर आपणास सांगतां येणार ... त्याच्या सर्व जिनसांची याद देणें मात्र भाग पडेल. उदाहरणार्थ एकाद्या सावकाराची लक्ष रुपयांची मालमत्ता आहे असें ह्मणण्यापेक्षां ५० गाई, १० घोडे, १०० मनुष्यें, २५ घरें वगैरे यच्चावत् त्याच्या सर्व जिनसांची याद सांगावी लागेल. जोंपावेतों एकादें चलन सुरूं झालें नाहीं तोंपावेतों हरएक जिनसाची किंमत आपणास बरोबर करतां येणार नाहीं. असें एकादें चलन सुरूं झालें ह्मणजे तें सर्व देशभर पसरतें व सर्व पदार्थांची किंमत त्याध्यें केली जाते. नाण्यापासून दुसरा उपयोग हा आहे कीं, कोणतेही दोन पदार्थ अदलाबदलींत घेण्यास नाणें हें चांगलें साधन होतें. या साधनामुळें व्यापारास मोठी मदत होऊन तो लौकर व झपाट्यानें चालतो. तो असा. समजा, आपणापाशीं ५ गाड्या ज्वारी आहे ती मोबदला देऊन आपणास शें दोनशाचें कापड घेणें आहे त्यास ज्वारी घेऊन मोबदला कापड देईल असा मनुष्य आपणास धुंडण्यास नको. ती ज्वारी सर्व देऊन त्याचे मोबदला नाणें घ्यावें. व त्या नाण्यानें पुनः हवें असेल तेवढें कापड मोबदला घ्यावें. ज्याअर्थीं नाणें हें पाहिजे त्या पदार्थाच्या मोबदला मिळतें त्याअर्थीं नाणें असेल तर पाहिजे तो पदार्थ मिळेल हें उघड आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं, नाणें असलें ह्मणजे पदार्थांची किंमत करता येते. व ती किंमत कळली ह्मणजे कोणत्या रकमेला किती तसले पदार्थ मिळतील हेंही कळतें.

( पुढें चालू. )

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. सदाशिव नारायण वकील अकोलें | १० |
| ,, गणेश अनंत हे. मा. तळेगाव | ७॥८ |
| ,, दामोदर कृष्णाजी अ. मा. तळेगाव | ४ |
| ,, पुरुषोत्तम माधव हे. मा. चांदूर | ३ |
| ,, मोरो नारायण हे. मा. मंगरूळ दस्त. | ३ |
| ,, अनंत रघुनाथ हे. मा तिवसें | ३ |
| ,, वासुदेव वामन हे मा नांदगावकाजी | ३ |
| ,, श्रीधर नारायण अ.मा. तळेगाव | २॥८ |
| ,, मनोहर रावजी हे. मा. घुइखेड | २॥८ |
| ,, विनायक विठ्ठल हे. मा. कुऱ्हा | २॥८ |
| ,, नारायण केशव हे. मा. मंगरूळ चवाळे | २॥८ |
| ,, दाजी लक्ष्मण हे. मा. पळसखेड | २ |
| ,, केशव भिकाजी हे. मा. मु. शा. अकोला | २ |
| ,, हरी रघुनाथ हे. मा. राजुरा | २ |
| ,, गणेश अनंत हे. मा. विरूळ | २ |
| ,, अण्णाजी हरि हे. मा- मांजरखेड | २ |
| ,, गोविंद निळकंठ हे. मा. वऱ्हा | २ |
| ,, नारायण अनंत हे. मा. तळेगाव | २ |
| ,, गणेश सखाराम हे. मा. मोझरी | २ |
| ,, हरि मैराळ हे. मा. आमला | २ |
| ,, रघुनाथ भाईजी हे. मा. निंभोरा | २ |
| ,, रामचंद्र मैराळ हे. मा. अंजनसिंगी | २ |
| भि. पापा मिया हिं. मा. कुऱ्हा | २ |
| ,, महमद सयद हिं. हे. मा. अकोलें | २ |
| रा. राघो राजाराम हे. मा. जळकें | १॥८ |
| ,, विठ्ठल चिमणाजी हे.मा. धामणगाव | १॥८ |
| ,, उद्धव बाळकृष्ण हे. मा. फुपगाव | १॥८ |
| ,, बाळकृष्ण नारायण हे. मा. वाडोणें | १॥८ |
| ,, वासुदेव सदाशिव हे. मा. सिवणगाव | १॥८ |
| ,, मारुती कडताराम हे. मा. मार्डी | १॥८ |
| ,, गोपाळ आत्माराम हे. मा. धामक | १॥८ |
| ,, सदाशिव विठोबा हे. मा. येरड | १॥८ |
| ,, बाळकृष्ण विष्णु हे.मा. सातरंगाव | १॥८. |
| ,, रामचंद्र हरी अ. मा. तळेगाव | १ |
| ,, भगवंत रावजी अ. मा. चांदूर | १ |
| ,, गोपाळ रामकृष्ण अ.मा. मगंरूळ | १ |
| ,, लक्ष्मण गणेश अ. मा. तिवसें | १ |
| ,, रेणको सोनाजी अ. मा. नांदगाव | १ |
| ,, बाबुसिंग जयराम अ. मा. तळेगाव | १ |
| ,, रामकृष्ण यशवंत अ. मा. वाढोणें | १ |
| ,, गोविंद निळकंठ अ. मा. पळसखेड | १ |
| ,, रामचंद्र प्रल्हाद अ. मा. मोझरी | १ |
| ,, बाळकृष्ण रामजी अ. मा. विरूळ | १ |
| | ९३ |
| मागील जमा | १११४॥८ |
| एकंदर | १२०७॥८ |

## जाहिराती.

### IN THE PRESS

THE CODE OF CIVIL PROCEDURE

Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2--8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.

PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................... १ रुपया
नेटिव लोक .... .............. ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिरात सर्वज्ञानसंग्रह.

विनंतीयुक्त सूचना.

प्रति महिन्यास निघणारें पुस्तक.

सर्वांस विनंती जे सप्तंबर महिन्यापासून पुढें प्रत्येक महिन्यास मी खालीं सही करणारा वरील नावाचें पुस्तक डिमि कागदाच्या अष्टपत्री सांच्यावर १२० पृष्ठांचें टैपावर छापून प्रसिद्ध करण्याचा हेतू राखतों हा ग्रंथ न्याशनल छापखान्यांत मध्यम टैपानीं सुवाच्य रीतीनें छापणार. ह्या ग्रंथास विद्यावृद्धि, ज्ञानवृद्धि इच्छुकांनीं, आणि सतत् नवीन सत्कार्यास आश्रयभूत उत्तेजन देणार सद्गृहस्थानीं, व परोपकारी मंडळींनीं मला साह्य द्यावें, अशी माझी त्यांस प्रार्थना आहे. ह्या ग्रंथाची अवश्यकता असावी. व सर्वांनीं व, मुख्यत्वें प्रापंचिकांनीं, हा ग्रंथ निरंतर संग्रहीं ठेवावा ह्मणून ह्या ग्रंथांत सर्वोपयुक्त, व मान्य विषय लेखन करण्याची योजना केली आहे. माझें मत असें आहे कीं, हा ग्रंथ स्त्रीशिक्षणासही मोठा साह्य ... ग्रंथांत येणारे ।

१ नीतिसंग्रह; २ सर्व ... थांतील इतिहास; ३ एक ... गोष्ट. ४ एकंदर वाचकांस उ... णारा सर्वमान्य सुभाषितसंग्रह, ... श्लोक, संस्कृत आर्या, अभंग, दो... इंग्रजी अर्थ; ५ एक प्रकारचा कोश ज्यांत बहुशः अवश्यक वस्तूंचीं मराठी ... ग्रजी इ० नावें अनुक्रमानें येत जावीं; ... प्रत्येक महिन्याच्या वर्तमानाचा स... ७ दिवाणी फौजदारी कायदे; धर्मशा... नुरूपनोंध; ८ कवितेस उपयोगी पडण... साधनें. मुलांस उपयुक्त होणाऱ्या गोष्टी अगर गाणीं इ० इ० इ० व यापेक्षां कित्येक फरमाशीवरून नवीन विषय थोडे थोडे अनुक्रमानें येतील.

अंक ३४

डिपुटी कमिशनर साहेबांची ... गते. मला असें वाटतें ... ींत डिपुटी इन्स्पेक्टर ... कमिशनरचे हाता ... ते जसे नाचवितील ... हिजे. कोणतेंही ... ह्मणजे करणारा- ... तेंच "एक घड ... या ह्मणीप्रमाणे ... च गांठ. ... का चाकरास ... त्यास पंचा ... त पडत ... स स्कु ... क्लास ... यां ... त. ... उद्दे ... स

अशा करारानें पुस्तक रचण्यास किती श्रम लागतील हें कोणाच्याही लक्षांत सहजीकरीत्या येईल, ह्मणून या ग्रंथाची किंमत सांप्रत प्रतिवर्षाची १० रुपये सुद्धीं ठेविली आहे. बरेच आश्रय जमले आहेत, परंतु पुरतें साह्य मिळाल्यावांचून सुरवात होणें नाहीं.

प्रथम हा ग्रंथ कसा निघणार त्याबद्दल नमुन्यासह मोठीं पत्रकें सर्वांस व आश्रय दात्यांस प्रसिद्ध होतील त्यांत सविस्तर मजकूर लेखन होईल.

पत्ता— पत्र घेणारानीं आपलीं नावें मुंबईंत न्याशनल छापखान्यांत, ठाण्यास सूर्योदयांत, साताऱ्यांत महाराष्ट्रमित्रांत, व बडोदें येथें सिद्धनाथीं गणपतिमंदिरांत मालकाचे नावें पाठवावीं.

मुंबई, १ली जून सन १८७६ इसवी.

विरेश्वर सदाशिव छत्रे.

## नोटिस

नोटिस बेशमी एकोजी वल्द माधोजी पाटील रहाणार आमतोडें तालुके मूर्तिजापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आह्मी मौजे आमतोडें येथील सर्वे नंबर २चें शेत तुह्मास तयार करण्यास दिलें होतें. त्या नंबरांत आमच्या पांचशें बाभळी होत्या त्या तुह्मी आह्मास न विच्यारतां तोडून इळवाट केल्या त्याबद्दल आह्मी फौजदारींत फिर्याद करित होतों; पण तुह्मी आपसांत समजूत करून काठ्यांबद्दल रुपये ३०० कबूल केले. ते रुपये आजतागायतपावेतों देऊ दिल्हाऊ करता परंतु देत नाहीं ह्मणून ही नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून आठ दिवसांत रुपये देऊन आमची रसीद घ्यावी. नाहीं तर शिरस्त्याप्रमाणें दावा करण्यांत येईल. व तुह्मी सनदी पाटील असून बेकायदे काम करणें बरोबर नाहीं. कळावे. तारीख ८ माहे आगस्ट सन १८७६ इसवी.

(सही) लालसिंग उमेदसिंग रहाणार मूर्तिजापुर दस्तुर खुद.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.खा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० २० माहे आगष्ट सन १८७६ इ० अंक ३४

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | रु. आ. |
|---|---|
| रा. हरबाजी सखाराम पाटील | ६०८ |
| रा. रा. सखाराम मोरेश्वर खजिनदार | ६ |
| एजंट न्यू ब्यांक बांबे शाखा खामगाव | ६०८ |
| मे० दस्तुर बहिमनजी साहेब | ५ |
| ,, रतनजी साहेब. | ६०८ |
| ,, शेख हिसामुदीन साहेब | ६०८ |
| मि० साहेबखा घोसेखा मास्तर | ६ |
| रा. रा. गणेश दाजी देशपांडे | २० |
| ,, ,, वामन गणेश मास्तर | ६०८ |
| मेसर्स नरसिंह व बालाराम अकोट | ६०८ |
| रा. रा. सखाराम भगवंत मास्तर | ६०८ |
| ,, ,, गोपाळ नारायण सबइन्स्पेक्टर | २० |
| ,, ,, विष्णु कृष्ण मास्तर | ६०८ |
| ,, ,, सितळशिंग नायबतहशिलदार | ६०८ |
| ,, ,, केशव लक्ष्मण जोरवेकर मास्तर | ८ |
| ,, ,, श्रीराम भिकाजी जटार इन्स्पेक्टर | ५ |
| ,, ,, बजाबा रामचंद्र प्रधान डे. इ. | ६०८ |
| ,, ,, बाळकृष्ण चिमणाजी देशपांडे | ६०१० |
| ,, ,, विष्णु भिकाजी मास्तर | २०१२ |
| मे० यादअली तहशिल्दार | ३१०११ |
| रा. रा. दुनियासिंव्ह पोलिस इन्स्पेक्टर | १३ |
| ,, पांडुरंग अनंत दांडेकर मास्तर | ५ |
| ,, ,, हरी मोरेश्वर शेवडे मास्तर | ५०१४ |
| ,, ,, शिवराम गड्याजी कुळकर्णी | २४ |
| ,, ,, बलदेवसिंव्ह पोलिस इन्स्पेक्टर | ६०८ |
| रा. गणाजी वल्लद खानाजी पाटील | ६-८ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या [illegible] मतास मिळूनच असतील असें समजूं नये [illegible]

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० कोणत्याही व्यक्तीची अथ[illegible] पदार्थाची अथवा गोष्टीची साम्यता क[illegible] याचें मनांत आणिलें तर त्यांचे रंग, [illegible] आकार, धर्म, व इतर शारीरिक आणि मानसिक गुणांमध्यें बहुतेक अंशी मेळ पाहिजे तरच ती साम्यता समजते आणि तीच पूर्ण साम्यता ह्मणावी. परंतु आह्मां नेटिवांमध्यें कोता समज असल्यामुळें कित्येक प्रसंगीं एका अनुमानावरून साधारण व सर्वांस लागू अशा अनुमानाकडे आह्मी लागलेच धावतों, यांत फारसें नवल नाहीं. कारण गोऱ्या लोकांचे विचार पोक्त व चांगले आणि काळ्या लोकांचे कोते व वाईट असा आरोप आहेच परंतु गोऱ्याचे नेटिव व नेटिवाचे गोरे विचार होऊं लागले ह्मणजे चमत्कारिक वाटतें.

या वऱ्हाडांत इंग्रजी अमल सुरू झाल्यास आज सुमारें बावीस तेवीस वर्षें झालीं असतील. त्याचे तिप्पट वर्षें मुंबई इलाख्यांत आहे. वऱ्हाडदेशांत केवळ कुणबी व इतर जातींच्या लोकांची वस्ती असून त्यांचा मूळधंदा कृषिकर्म करण्याचा आहे. मुंबई इलाख्यांत ब्राह्मण व इतर उंच प्रतीच्या लोकांची वस्ती असून लोकांचा कल व्यापाराकडे विशेष. इकडील लोक पैशानें गरीब बुद्धीनें जड, आळशी आणि बिन खटपटी आहेत. तिकडील द्रव्यवान, बुद्धिवान, उद्योगी आणि तत्पर आहेत. इंग्रजी अमल सुरू होण्यापूर्वीं हा देश पुष्कळ दिवसांपासून मुसलमानीराजाचे अमलाखालीं होता. तिकडील देशावर ब्राह्मणांचें स्वामित्व होतें. लोकसंख्येच्या मानानें या देशांत जमीन विपुल असून अद्याप विस्तीर्ण जंगलें वहित होण्यासारखीं आहेत. त्या देशांत जमीनीची कमताई असल्यामुळें विद्या संपादन करून अथवा व्यापारांत शिरून पैसा मिळवावा याखेरीज दुसरा स्तुत्य उद्योग दिसत नाहीं. अशा कित्येक कारणावरून वऱ्हाड देशापेक्षां मुंबई इलाख्यांत विद्यावृध्धी व सुधारणा सहज व लवकर होत चालली आहे. यामुळें त्या देशाचें या देशावर वर्चस्व नेहमीं राहील व असलेंच पाहिजे. असें असतां वऱ्हाडांतील विद्याखात्याचे जे आदिपुरुष सिक्लेर साहेब ज्यांचे या देशावर महत् उपकार आहेत त्यांच्यापासून ते आमचे रावसाहेब भाई साहेबांपर्यंत सर्वांचा कल व प्रयत्न या प्रांतांतील विद्याखातें मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याशीं ताडण्याकडे असून इकडील नियम, इयत्ता आणि मास्तरांचे पगार वगै[illegible]
[illegible] गीवर करण्याकडे चालले
[illegible] ही करणें तें देश काल स्थि
[illegible] पाहिजे. कोणी ह्मणेल कीं
[illegible] ऱ्या कळसास एकदम जाऊ
[illegible] र तें ह्मणणें वृथा होणार
[illegible] सिक्लेर साहेबांनीं ज्यावेळेस प्र
[illegible] तें वऱ्हाडांत उपस्थित केलें
[illegible] स्कुलें, मिडलक्लास स्कुलें प्रथ
[illegible] केलीं हें करणें सर्वांस मान्य
[illegible] असें मला वाटत नाहीं. तथा
[illegible] भे करतेवेळीं त्यांना ज्या अडच
[illegible] असतील त्यांची आह्मास कल्प
[illegible] करवत नाहीं. मास्तर लोकांचे पगार मोठमोठाले ठेविले ह्मणून त्यांस आह्मीं दोष देतों. परंतु त्यांणीं या खात्याचे उदयार्थ आपलें तन, मन, धन किती वेचिलें याचा थोडाबहुत अनुभव सर्वांस आहेच. दुसऱ्यानें आपल्यास चांगलें करावें अशी मनुष्यास जशी इच्छा असते तसें आपणही दुसऱ्याचें चांगलें करावें अशी आपणास इच्छा असली पाहिजे. यांतच मोठेपणा आहे. हा नियम त्यांचे ठिकाणीं चांगला वसत होता ह्मणून पुष्कळांचें कल्याण झालें. याबद्दल सारासार विचार आमचे भाईसाहेब करीत आहेत हें पाहून आनंद होतो.

वर लिहिलें आहे कीं वऱ्हाडांतील शाळाखात्याचे अधिकारी मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याची व वऱ्हाडांतील त्याच खात्याची तुलना करितात. परंतु मुंबई इलाख्यांतील विद्याखातें किती स्वतंत्र आहे, त्यास आपोआप उत्तेजन कसें येत चाललें आहे आणि विद्येविषयीं लोकांची अभिरुची किती वाढत चालली आहे याची कोणी कल्पना करीत नाहीं हें पाहून अश्चर्य वाटतें! वऱ्हाडांतील शाळाखात्याचें वजन दिवसेंदिवस जास्त वाढावें हें उचित आहे पण त्याच्या उत्तेजनार्थ जे जे उपाय योजिले जातात तेणेंकरून हें खातें विशेष परतंत्र होत चाललें आहे. मुंबई इलाख्यांतील डायरेक्टर साहेबांवर वरिष्ठ अधिकारी ह्मटले ह्मणजे मुंबई सरकार. वऱ्हाडांतील डायरेक्टर साहेबांवर आजपर्यंत रेसिडेंट साहेब वरिष्ठ होते. आतां ते असून मध्यें कमिशनरसाहेबांस वरिष्ठ केलें आहे, त्यांचे मार्फतीनें सर्व पत्रव्यवहार व व्यवस्था अलीकडे चालू झाली आहे. मुंबई इलाख्यांतील मास्तरांवर, वरिष्ठ अधिकारी काय ते तीन, एक डिपुटी इन्स्पेक्टर, एक एजुकेशनल इन्स्पेक्टर आणि एक डायरेक्टर. वऱ्हाडांत तसें नाहीं. पाटील, पांडे, स्कूलकमेटीचे मेंबर, स्पेशल माजिस्त्रेट, नायब तहशिलदार, तहशिलदार, एस्कट्रा अ. क. आणि डे. क. शिवाय शाळाखात्याचे अधिकारी डे. इ., ए. इ., व डायरेक्टर इतक्यांचा कमी जास्त अमल मास्तरांवर आहे. या सर्वांची त्याणें मर्जी संपादन केली पाहिजे. या पैकीं यःकश्चित् पाटलाचें मनांत मास्तराची उचलबांगडी करावयाचे किंवा त्यास धुळीस मिळवायाचें आलें ह्मणजे फारसा उशीर लागत नाहीं. अर्ज करावा ह्मणजे प्रकरण चाललेंच. त्यांतून शाळाखातें ह्मटलें ह्मणजे अगदीं निराळें खातें आहे त्याचा आपल्याशीं संबंध नाहीं असा कित्येकांचा समज आहे असें नाहीं. कित्येक द्वेष बाळगतात यामुळें मास्तराचा कळवळा व अभिमान बाळगणारा असा याचा तोच. यामुळें लोकांवर त्याचें वजन फारच कमी असतें. आतां डिपुटी इन्स्पेक्टरांविषयीं विच्यार केला तर त्यांस तिळमात्र अधिकार नसल्यामुळें एकाद्या मास्तरास त्याचे अपराधाबद्दल कमजास्त बोलावयाचें किंवा दंड करावयाचें मनांत आलें तर त्यांस डिपुटी कमिशनर साहेबांची मंजुरी घ्यावी लागते. मला असें वाटतें कीं, हल्लींच्या स्थितींत डिपुटी इन्स्पेक्टर ह्मटले ह्मणजे डिपुटी कमिशनरचे हाताखालील बाहुलीं आहेत. ते जसें नाचवितील तसें त्यांस नाचलें पाहिजे. कोणतेंही काम एका मार्गानें झालें ह्मणजे करणाराचा बोज व वजन रहातें. तेंच "एक धड ना भाराभर चिंध्या" या ह्मणीप्रमाणें असलें ह्मणजे गाधेळाशींच गांठ.

दुसरें असें आहे कीं एका चाकरास दोन धनी असले ह्मणजे जशी त्यास पंचाईत पडते तद्वत् डि. इन्स्पेक्टरास पडत असेल यांत संशय नाहीं. लोअरक्लास स्कुलें डे. क. यांच्या ताब्यांत व मिडलक्लास स्कुलें एज्युकेशनल इ. व डायरेक्टर यांच्या ताब्यांत मुळापासून दिलीं आहेत. असा भेद करण्यांत सरकारचा काय उद्देश असेल कोण जाणें. जिल्ह्याचे आफिसर या नात्यानें दिलीं ह्मणावीं तर सर्वच द्यावयाचीं होतीं. असा भेद असल्यामुळें पत्रव्यवहाराचे बाबतींत डि. इ. चे वरिष्ठ अधिकाऱ्यांस नाखूष होण्याचा प्रसंग येत असेल. कोणतेंही करणें तें वेळेस अनुसरून केलें पाहिजे. वेळ ज्याप्रमाणें बदलते त्याप्रमाणें सर्व पालटलें पाहिजे. कोणी असें ह्मणेल कीं हल्लीं कांहींअंशीं या खात्यास परतंत्रता आहे ती घालवून स्वतंत्रता आणिली, मास्तराची बहाली व बरतर्फी डायरेक्टर साहेबांनीं सोईसोईनें आपले हातांत घेतली, डि. इन्स्पेक्टरांचा अधिकार व मास्तरांचें महत्व वाढविलें, तर हें खातें सुरळीत चालणार नाहीं. परंतु हें ह्मणणें व्यर्थ आहे. कारण सरकार करील तें होईल हें जर खरें आहे तर वर लिहिलेली गोष्टही होऊं शकेल.

रेसिडेंट साहेब या खात्यास उत्तेजन देताहेत परंतु त्यांणीं जे नियम घालून दिले आहेत त्यां पैकीं कांहीं नियमांची अमलवारी बरोबर होत नाहींसें वाटतें. हें ह्मणणें खरें आहे हें दाखविण्याकरितां फार लांब जावयास नको. गुदस्त सालीं नोवेंबर महिन्याचे पूर्वीं रेसिडेन्सी आर्डरींत एक जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे त्यांतील मतलब इतकाच आहे कीं सरकारी नोकरी मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं स्पेशल परीक्षा देऊन मे. डायरेक्टर साहेबांचें सर्टिफिकिट मिळविलें पाहिजे व सरकारी आफिसांतून उमेदवार जरी ठेवणें झालें तरी त्यांजपाशीं सदर्हू सर्टिफिकिट असल्या खेरीज त्यांस कचेरींत येऊं देऊं नये. असें असून सदर्हू जाहिरनाम्याचे तारेख नंतर ज्या नवीन नेमणुका झाल्या असतील त्या सर्व वरील नियमाचें आधारें झाल्या असतील असें वाटत नाहीं. आह्मी ऐकतों कीं वाशिमास परवा मि. अब्दुलहक्क सा. आल्यावर त्यांणीं दहा पांच उमेदवारांची परीक्षा घेऊन व त्यांच्या अत्युत्तम, उत्तम व मध्यम, अशा प्रती लावून त्यांस आपल्या कचेरींत उमेदवारी करण्याची परवानगी दि

ली. कां पत्रकर्ते महाराज या साहेबांनीं मे० रेसिडेंट साहेबांचा जाहिरनामा आपले काखेंत गुंडाळून ठेविला कीं नाहीं? त्यांणीं या उमेदवारांस परीक्षा पास झाल्याबद्दल सर्टिफिकिटें दिलीं असल्यास परिक्षेची कमालच केली असें कां न ह्मणावें? व जो अधिकार व जें काम आमचे राव साहेब नारायण भाई साहेबांचें तें क्रम आमचे हक्कानीं बजाविलें असेल तर भाई साहेबांस डायरेक्टर न ह्मणता हक्कांस कां न ह्मणावें? असें झाल्यानें लोकांत विद्याखात्याचें महत्व कितूपत राहील हें सांगावयास नकोच.

युरोपियन अमलदारांची भीति रयत जितकी बाळगते तितकी नेटिवांचा बाळगित नाहीं हें स्वाभावीकच आहे. त्यांतून वऱ्हाडांतील विद्याखात्यांत सर्व नेटिव अमलदार होण्याचा समय जवळ आला आहे नेटिवांचे हातून हें खातें चालतें किंवा नाहीं हें पहाण्याची परीक्षा आतांच आहे. याजकारितां युरोपियन अमलदार असून या खात्याचें जें वजन राहिलें असतें त्यापेक्षां नेटिवांचे हाताखालीं ज्यास्त रहातें अशी जगाची खात्री करणें भाई साहेबांकडे आहे.

पत्रकर्ते महाराज पत्रविस्तारास्तव मी आतां पुरें करितों परंतु सदरील पत्रांतील मजकूर आपल्यास रुचत असेल तर आपण ही या बाबदींत चार ओळी खरमरीत लिहाल अशी आशा आहे कळावें हें विनंती.

एक
फिरस्ता.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

वि. वि. खालील मजकूर प्रसिद्ध करण्याकरितां पाठविला आहे त्यास आपले सुंदरपत्रीं जागा द्यावी.

कांहीं महिन्यांपूर्वीं येथें एक बैरागी बावा गावच्या पश्चिमेस मारुतीचें देवालय आहे त्यांत निराहार रहात असून दर्शनास जाणारे लोकांस कांहीं प्रसाद ह्मणून देत असत. तेथें बसण्याचा त्यांचा हेतु इतकाच कीं, ग्रामस्थांनीं बावास कांहीं तरी पूजा अर्पण करावी, परंतु ह्या दारव्ह्यांच्या लोकांनीं बरेच दिवस त्यांस दाद दिली नाहीं. शेवटीं लोक भजत नाहींत असें पाहून बैरागी बावा त्यांच्या निंदेस प्रवृत्त होऊन त्यांच्या नजीक लोक बसत त्यांच्या समक्ष "गावकरी यांस कांहीं चमत्कार दाखवीन" ह्मणून धमकावणी देत. एके दिवशीं मे महिन्याचे १४ वे तारखेस अकस्मात् ऐन दोन प्रहरीं गावचे पश्चिम भागास अग्नीचा उपद्रव होऊन वायूच्या साह्यामुळें दहा बारा घरें जळून भस्म झालीं. आणि त्या दिवसापासून नित्य गावांत एक दोन वेळा आग लागत असे. हें सरासरी पंध्रा दिवस चालत असल्यामुळें लोकांचे मनांत आलें कीं, सदहू कृत्य बावाचें असावें; ह्मणून कांहीं गृहस्थांनीं बावाकडेस जाऊन ह्याचें कारण त्यास विच्यारिलें असतां ते ह्मणाले कीं हा आग्या वेताळाचा क्षोभ आहे, त्याची पूजा केली ह्मणजे शांतता होईल. बिच्यारे लोकांस तें खरें वाटून त्यांनीं बावांस विनंती केली कीं, आह्मी यथाशक्ती पूजापत्री देतों आपण वेताळास शांत करावें तें बावानीं कबूल केलें आणि सांगितलें कीं, उदईक आग लागणार नाहीं, परंतु लावणारे वेताळ नसून कोणी तरी दुष्ट मनुष्यानें दुसरे दिवशीं पुन्हा आग लाविली असतां बावाचेंच कृत्य समजून त्यांस गावांतून काढून देण्याचा उद्योग लोकांनीं केला आणि त्याप्रमाणें बावा निघून गेले परंतु आग लागण्याचें बंद न होतां दिवसेंदिवस जास्त होत गेले तें असें कीं दिवसांतून ५।६ वेळा होईसें झाल्यानें लोक अगदीं घाबरून गेले आणि बावांची छलना केल्यामुळें असें होत असेल ह्मणून कांहीं मंडळी दिग्रस मुक्कामीं जाऊन त्यांनीं त्या बावास गाठून सुमारें २५ रुपये बिदागीरी दिली आणि सदरील अरिष्ट टाळण्याची विनंती केली तेव्हां बावा ह्मणाले कीं ही गोष्ट माझ्या हातची नाहीं. असें बोलल्यावरून ते बिचारे माघारे आले. इकडे आग लागण्याचें सुरू होतेंच तें तारिख २ माहे मजकूर रोजीं व दुसरें दिवशीं पर्जन्यवृष्टी चांगली झाल्यामुळें शांत झालें. आतां जरी पर्जन्य नाहीं तरी आग लागण्याचें बंद आहे हें पाहून लोक स्वस्थ चित्त झाले आहेत.

दारव्हा—ता. ७ जूलाई १८७६ इ०

एक क्ष.

---

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १ शके १७९८.

## पर्जन्य! पर्जन्य! पर्जन्य!

श्लोक.

नमो विश्वरूपा नमो तोयराया ।
तुझा लागलों लोक धावा कराया ॥
करावी त्वरा शीघ्र धावोनि यावें ।
क्षुधाशांतिचिंतेस या संहरावें ॥१॥
खरें जाहलें पाप आह्मांत भारी ।
न देवा न धर्मास कोणी विच्यारी ॥
करावी क्षमा शीघ्र धावूनि यावें ।
क्षुधाशांतिचिंतेस या संहरावें ॥२॥
जया पाळिलें आजपर्यंत बापा ।
तया पाहसी भोगितां काय तापा ॥
दयालु प्रभो त्वां न ऐसें करावें ।
क्षुधाशांतिचिंतेस या संहरावें ॥३॥
तुझ्या शीणले नेत्र पाहोनि वाटे ।
तुला बाहतां बाहतां कंठ दाटे ॥
किती अंत घेतोसि धावूनि यावें ।
क्षुधाशांतिचिंतेस या संहरावें ॥४॥
दयाळो कृपाळो पदीं लीन झालों ।
तुला तोय मागावया दीन आलों ॥
नको नाट लावू! जनी या तरावें ।
क्षुधाशांतिचिंतेस या संहरावें ॥५॥
पहा घाबरे जाहलों! अन्न नाहीं ।
मरावेंच कां या समस्तां जनांहीं ॥
पदीं लागतों शीघ्र धावूनि यावें ।
क्षुधा शांति चिंतेस या संहरावें ॥६॥
धावे धावे मेघ-राजा दयाळा ।
यावें यावें सत्वरी लोकपाळा ॥
कंठीं आला प्राण जाईल वाटे ।
हा! हा! येतां कल्पना ऊर फाटे॥७॥

तीन आठवडे झाले पर्जन्यानें ओढून धरिलें आहे, व एकंदर साऱ्या वर्षाकाळांत एकही मोठा वाहवणीचा पाऊस अजून पडला नाहीं ह्मणून पुढें कसें होईल याविषयीं लोकांस मोठी भीति उत्पन्न झाली आहे. मुंबई इलाख्यांत बहुतेक ठिकाणीं पाऊस कमी आहे, लगत्याचे नागपुर व खानदेश प्रांतांतही पाऊस फार कमी आहे व साऱ्या वऱ्हाडांत हाकाटी आहे; नदीचें पात्र वैशाख मासासारखें कोरडें व भयंकर दिसूं लागलें आहे, पिकें थोडींशीं आलीं आहेत तीं अगदीं सुकून जाण्याच्या बेतास आलीं आहेत, गवत थोडें उगवलें होतें तें वाळून गेलें यामुळें मुक्या जनावरास मुबलक चारा मिळत नाहीं व परमेश्वरानें अशीच अवकृपा केल्यास तीं बिचारीं बहुतेक ठार मरतील! धारण प्रतिआठवड्यास कडकत चालली आहे, दुरून दुरून महामारी बाईसाहेबाची ही लीला ऐकूं येत आहे. अशा अनेक परीच्या संकटांत दुर्दैवानें या वर्षीं आह्मा दीनास लोटिलें आहे तर त्यांतून उध्धारावयास एक परमेश्वर मात्र समर्थ आहे. त्यानें कृपा करून पर्जन्यवृष्टी विपूल केल्यास या सर्व अरिष्टांचें एका क्षणांत निरसन होणार आहे. त्याची कृपासंपादनार्थ लोक परोपरीचे यत्न करूं लागले आहेत. गावांत श्रीराजेश्वरावर संतत धार अक्रा छिद्रांची धरून ३२ ब्राह्मण अभिषेकास बसले आहेत, व त्याच देवालयांत दुसरे कित्येक लोक नामसप्ताहाचा घोषही अहर्निश करीत आहेत. नदीचे काठीं श्री खोलेश्वर ह्मणून देव आहे त्यास आज प्रातःकाळीं गृहस्थ मंडळीनीं दंडविण्याची तजवीज योजिली आहे. मुसलमान लोक मशीदींतून प्रार्थना करीत आहेत. तर त्या सर्वांच्या आरोळ्यांस कृपाळु परमेश्वरानें लवकर ओ देऊन त्यांचीं चिंतेनें ग्रस्त झालेलीं व क्षोभलेलीं मनें पर्जन्याच्या धुवाधार वृष्टीनें शांत करावीं अशी आमची त्या दयाळु मरमेश्वरास सोत्कंठ प्रार्थना आहे.

श्लोक-

आतां उपाय दुसरा न दिसेचि कांहीं ।
भक्तानिमित्त धरि जो अवतार दाही ॥
प्रार्थूनि त्या विनवुं कीं धरि मेघरूपा ।
बापा कृपा करुनि वृष्टि करी अमूपा ॥१॥

---

## वऱ्हाडच्या परतीविषयीं कमिशन.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं दिवाण साहेब सर सालरजंग मोठा खर्च करून विलायतेस गेले त्याचें कांहीं चीज होणार असें सुचिन्ह दिसूं लागलें आहे. पुढें परमेश्वर कृपेनें काय व्हावयाचें तें होईल. पण वऱ्हाड परत द्यावें किंवा नाहीं याविषयीं आतां इनसाफ होणार अशी सुवार्ता निघाली आहे. व ती विलायतेहून तारायंत्रांतून आली आहे तेव्हा खोटी नसेल असें मानण्यास पुष्कळ कारण आहे. विलायतेस ड्यूक आफ सदर्लंड ह्मणून एक वजनदार व नामांकित गृहस्थ आहेत ते थोड्या महिन्यामागें हिंदुस्थानांत आले होते व हैदराबादेस निजामसरकारच्या भेटीस गेले होते तेव्हां दिवाणसाहेबांची त्यांची भेट झाली व ते उभयतां मिळून कलबुर्ग्यापर्यंत आले पुढें कलकत्त्यासही दिवाण साहेबांची आणि त्यांची भेट झाली व त्यांनीं दिवाण साहेबांस आग्रहानें विलायतेस बोलाविलें व यांनीं जाण्याचें कबूल केलें हें वर्तमान तेव्हांच प्रसिद्ध झालेलें आमचे वाचकांस आठवत असेल. आतां तरी सदरहूचे ड्यूक साहेबांनीं निजाम सरकारचा पक्ष घेतला व हौस आफ लार्ड नावाच्या पार्लमेंट सभेंत वादविवाद सुरू करण्याचा विच्यार केला. त्याचप्रमाणें निजाम सरकारचे वतीनें सर जार्ज बायर यांनींही हौस आफ कामन्सच्या पार्लमेंट सभेंत वादविवाद सुरू करण्याची तयारी केली तेव्हां व पुष्कळ वर्तमानपत्रांतून आणि मासिक पुस्तकांतून वऱ्हाडप्रांत इंग्लिश सरकारानें निजाम सरकारास परत द्यावा अशाविषयां चर्चा केली तेव्हां विलायतेंतील हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लार्ड स्यालिस्बरी यांनीं असा विच्यार केला कीं बिलायतेस या गोष्टीची वाटाघाट होण्यापूर्वीं हिंदुस्थानांतच एकवार चांगली चौकशी करावी व त्या धोरणानें स्टेट सेक्रेटरीनीं मनांत आणिलें आहे कीं वऱ्हाड प्रांत निजाम सरकारास परत देणें रास्त आहे कीं काय याजविषयीं स्पेशियल कमिशन नेमून चौकशी करावी. त्याविषयीं हल्लीं बूट बाहेर पडला आहे तो असा:—

या चौकशीकारितां ९ कमिशनर असावे. त्यांत ३ स्टेट सेक्रेटरीनीं सिव्हिल किंवा मिलिटरी आफीसर नेमावे. ३ कलकत्याच्या हायकोर्टांतील जडज असावेत व ३ निजाम सरकारानें नेटिव किंवा युरोपियन नेमावेत. व चौकशी हैदराबादेस व्हावी; ती येत्या हिवाळ्यांत सुरू व्हावी, व तिचा रिपोर्ट कमिशनरानीं व्हाइसराय यांजकडे करावा व त्यांनीं आपले अभिप्रायासहित तो विलायतेस पाठवावा नंतर अखेर ठराव होईल.

आह्मांस वाटतें कीं हक्काचे चौकशीसाठीं कमिशन नेमण्याची तजवीज वावगी नाहीं, पण मेंबरांविषयीं लोकांस काय वाटेल कोण जाणे. कोणी ह्मणतील कीं वादीचे ३, प्रतिवादीचे ३, आणि जडज ह्मणजे न्यायाधिश ३ ही संख्या फार चांगली आहे, आणि दुसरे कोणी असें ह्मणतील कीं न्यायाधीश इंग्लिश सरकारचेच आणि वादी इंग्लिशसरकारच तेव्हां त्यांच्या बाजूचे सहा मेंबर आणि निजामसरकारचे तीन मेंबर ही विषमता बरोबर नाहीं पण हा विचार करीत बसण्यांत अर्थ नाहीं. बडोद्याच्या कमिशनांत दुतर्फा ह्मणजे नेटिव व युरोपियन यांची संख्या सारखी होती व मतेंही सर्व नेटिवांचीं युरोपिनांच्या वेगळीं पडलीं तथापि ठराव युरोपियन मेंबरांच्यातर्फें झाला ह्मणून मेंबरांच्या संख्येचा किंवा मतांचा विच्यार येथें इष्ट ना

हीं. कमिशन सुरू व्हावें व खरा इनसाफ असेल तो होऊं देण्याविषयीं ईश्वरानें ब्रि० सरकारास प्रेरणा करावी ह्मणून आपण अनन्यभावानें त्याची प्रार्थना करावी ह्मण जे त्यास जें योग्य व अवश्य वाटेल तें तो घडवून आणील व त्यांतच आपण सर्वांनीं आनंद मानावा.

## संस्थानिकांनीं रेलेव प्रमाणें दुसरीं यांत्रिक कामें करावीं.

गेल्या आठवड्यांतील वर्तमानावरून समजलें कीं होळकर सरकारचा स्टेट रेलवे महूवरून उज्जनीपर्यंत ५० मैल नवीन चालू झाला. ही गोष्ट आनंदाची होय. सिंदे सरकारानींही आपले राजधानीपर्यंत रेलवे करण्याचें काम चालू केलें आहे, निजाम सरकारानीं तर मोठाच एक रेलवे केला आहे व आणखी तो वाढविण्याचा विच्यार चालू आहे. गायकवाडांचे राज्यांत कंपनीचा रेलवे नसता तर त्यांनींही बडोद्याकडे आपला स्वतांचा रेलवे केला असता असें चालू क्रमावरून दिसतें. याप्रमाणें देशाच्या व्यापाराला व इतर सुधारणेला आवश्यक आणि फायद्याचा जो रेलवे तो आमच्या संस्थानिकांनीं करण्याचें मनावर घेऊन त्याप्रमाणें करून दाखविलें ही सामान्य महत्वाची गोष्ट आहे काय? नाहीं. मोठी महत्वाची होय. व याजबद्दल त्यांचा लौकिक चिरकाल राहील. त्यांनीं मनावर घेतलें नसतें तर गरीब रयतेच्या हातून हा इतका रेलवे कधीं झाला नसता.

अशी गोष्ट जर आहे आणि संस्थानिकांनीं मनावर घेतल्यानें देशाचीं महत्कार्यें होऊन दरिद्र विच्छिन्न होण्याचा मार्ग निघत आहे तर तो त्यांनीं अवश्य काढू नये काय ? आह्मास वाटतें कीं ज्याप्रमाणें संस्थानिकानीं कोट्यावधि रुपये आगगाडी साठीं खर्चले त्याप्रमाणें लक्षावधि तरी दुसरे यांत्रिक कारखाने देशांत चालू करण्यासाठीं खर्चावे. वस्त्र विणण्याचे गिरण्याची प्रस्तुत किती अवश्यकता आहे, व विलायतचे कापडानें आपणास कसें! दरिद्री व निर्जीव करून सोडिलें आहे याजकडे त्यानीं कृपाकरून दृष्टी फेकावी. त्यांनीं असे कारखाने मांडिले तर देशाची संपत्ती वाढेल, परदेशांत जाणारा नफा आपले देशांत राहील व हजारो गरीब गुरीबांचा चरितार्थ चालेल. देशांत प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपयांचें कापड खपतें तें सर्व क्रमाक्रमानें इकडे उत्पन्न होऊं लागलें व यत्रानें सुरेख स्वस्त आणि सफाईदार झाले तर परदेशी माल घेण्याची कोणास गरज आहे ? व तसें झाल्यावर आपल्या देशाची स्थिति किती उत्तम होईल ? यासाठीं शिंद, होळकर, गायकवाड, निजाम इत्यादि सस्थानिक लोकांस अशा कामीं प्रवृत्त करण्याचें ज्यांचें हातीं असेल त्यांनीं तें काम ईश्वरास स्मरून दयाळुपणें अवश्य करावें. आह्मी वर्तमानपत्रांतून शेकडों लेख लिहिले तरी ते राजे लोकांचे कानावर घालणार कोण ? ते स्वतां वाचतात कशाला ? यासाठीं त्यांचे प्रधान, मंत्री, व इतर जिव्हाळ्यांतील लोक यांनीं या गोष्टी त्यांचे ठायीं उपतिष्ठवाव्या व याकरितां मोठाल्या प्रसिद्ध पत्रकर्त्यांनीं त्यांस वारंवार विनंती करावी अशी आमची इच्छा आहे.

कापडाप्रमाणें कागदांचाही देशांत लक्षाधि रुपयांचा खर्च आहे व ते कागद आतां बहुतेक विलायतेहून येत असतात सबब त्यांचींही यंत्रें आपल्या देशांत संस्थानिकांनीं ठिकठिकाणीं स्थापन केलीं तर फार चांगलें होईल.

**सोन्याच्या खाणी—** ईश्वराचे कृपेकरून आपल्या हिंदुस्थान देशांत बहुत प्रकारचे मोलवान पदार्थ सापडतात हा त्याचा आपणावर मोठा उपकार होय. सर्व धातूंत सुवर्ण ह्मणजे सोनें मोलवान आहे तर त्याच्याही खाणी आपले देशांत आहेत आणि कांहीं ठिकाणीं त्याचें काम फायदेशीर चाललें आहे हें पाहून संतोष वाटतो. ह्मैसूर प्रांतांत उरेगाव एथें सोन्याच्या खाणी आहेत व त्यांतून सोनें कांढण्याचा कारखाना चालविण्याकरितां आस्त्रिया देशांतून माहितगार लोक आले आहेत. त्यांच्या कामाचा असा सुमार समजला आहे कीं एक टनभर मिश्र धातूंतून चार सहा औंस उत्तम सोनें निघते व तितकें काढण्यास अर्धा औंस सोनें खर्च करावें लागतें यावरून दर टनास ४।५ औंस सोनें निवळ फायद्यांत पडतें असें दिसतें व या कारणानें त्या खाणीचें काम मोठे झपाट्यानें चाललें आहे.

## वऱ्हाड.

शाळाखात्याकडील अकोल्याच्या डिपुटी इन्स्पेक्टरची जाग खाली झाली तिच्या संबंधानें नेमणुका झाल्या त्या:—

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान यवतमाळचे १५० रुपये पगाराचे डिपुटी इन्स्पेक्टर यांस अकोल्यास २०० रुपयांवर नेमिलें, वाशिमचे १२५ रु० चे डि. इ. रा. रा. विनायक रामचंद्र भाटवडेकर यांस यवतमाळास १५० रु० वर नेमिलें, रा. रा. वामनराव बाळाजी ओझरकर डाय०चे १२५ रु० चे हेड क्लार्क यांस तितक्याच पगारावर वाशिमास डि० इन्स्पेक्टर नेमिलें, रा. रा. वामनराव कृष्ण देशमुख १०० रु०चे क्युरेटर यांस १२५ रुपयांवर डायरेक्टर साहेबांचे हेड क्लार्क नेमिलें, मि० ब्रिग्यांजा साहेब डायरेक्टरचे ८० रुपयाचे सेकंड क्लार्क यांस क्युरेटर नेमिलें व त्यांचे जागेवर ६० रु० चे थर्ड क्लार्क रा. रा. गंगाधर वासुदेव यांस नेमिलें. व त्यांची जागा अजून कोणास दिली नाहीं. बाहेरून कोणी मास्तर येतील असें वाटतें.

क्या० आर एस थामसन इलिचपुरचे असिस्टंट कमिशनर यांस २ वर्षांची खासगी कामाकरितां फर्लो रजा मिळाली.

हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे कीं सबार्डिनेट जुडिशियल आफिसरास जेव्हां जिल्हा जडजाचे कामावर नेमिलें जातें अथवा कोणे आफिसरास पोलिटिकल खात्यांत नेमिलें जातें तेव्हां त्यास दरमहा १५० रुपये अलावेन्स देत जावा.

खान बहादुर महमद शाबुदीन नबाब साहेब अब्याची यांस आगष्ट महिना अखेर पावेतों सिकंदराबादेस क्यांटनमेंट माजिस्त्रेटच्या हाता खालीं दिलें आहे.

वऱ्हाडांत जे जस्टिस आफ दि पीस नेमिले जातात त्यांचे प्रतिज्ञालेख जुडिशियल कमिशनरकडे पाठवीत जावे व इतरांचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंटकडे पाठवीत जावे असा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला आहे.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब महिनाअखेरपर्यंत खामगावास जात नाहींत.

आनंदाची गोष्ट कीं कालरात्रौ पाऊस पडला तो बारीक होता तरी चारीप्रहर होता.

### हवापाण्याचा रिपोर्ट.

( जुलईअखेर )

**अमरावती—** पावसाच्या कमताईनें पिकें बिघडण्याच्या रंगांत आहेत रोगराई नाहीं, कांहीं खेडेगावखेरीजकरून जिल्ह्यांत गुरांसही रोग नाहीं-

**इलिचपुर—**तूर व कापूस यांची पेरणी पुरी झाली. हीव ताप थोडथोडा आहे. महामारी इलिचपुर शहरांत थोडी अधिक आहे. हवा सर्द आहे.

**यवतमाळ—**पिकें सर्वत्र बरीं आहेत. हीव, ताप व महामारी एकादे गावीं नसली तरी किंचित् अंशानें सर्व तालुक्यांतून आहे. हवा कधीं थंड असते.

**अकोला—**पिकें बहुधा मागस आहेत अकोला, अकोट आणि बाळापुर तालुक्यांत गुरांस रोग आहे. साऱ्या जिल्ह्यांत पाऊस कमती आहे.

**बुलढाणा—** खरीपाचें पीक चांगलें आहे. मलकापुर तालुक्याशिवाय मनुष्यांस व गुरांस कसलाही रोग नाहीं. मलकापुराकडे पडसे खोकल्याची सांत आहे हवा थंड आहे.

**वाशिम—**पिकें चांगलीं आहेत. कांहीं गावांतून महामारी आहे व गुरांस मुखरोग झाला आहे. हवा उष्ण असून मळभ असते.

### पत्रें आल्या संबंधी सूचना.

देऊळगाव राजा येथें एक विधवेनें बालहत्या केली व तिला पोलिसानें पकडलें. त्याबद्दल दोन गृहस्थांचा संवाद पुनर्विवाहाचे पर्यवसानावर लिहिलेला आह्माकडे आला आहे तो पुढील अंकांत लिहू.

उमरावती जिल्ह्यांत भातुकली येथें मुलांस बक्षिसें वाटण्या साठीं सभा जमली होती व त्यांनीं मुलांची परीक्षा घेतली व अध्यक्ष मि० अहमद अलीखा यांनींही मुलांस कांहीं बक्षिस देण्याचें कबूल केलें.

पोस्टाच्या उशिराविषयीं पत्र पोचलें पुढें घेऊं.

“ एक फिरस्ता पक्षी” या सहीचें चिखलीहून पत्र आलें आहे. तो ह्मणतो कचेरी स्थापन झाल्यापासून कित्येक कारकून एथचे एथेंच आहेत व कांहीं सहासहा वर्षे आहेत अशांच्या बदल्या होणें अवश्य आहे.

एक हितेच्छु जळगाव नोट येथील अवलीया विषयीं लिहितो. तो मजकूर पुढील अंकांत घेऊ.

दारव्हा येथील पत्र पोचलें. पुढील अंकांत घेऊं.

तेल्हारा येथून फिरस्ता याचें पत्र आलें आहे. त्यांतील शाळा खात्याविषयींची सूचना डा० साहेबाचे विच्यारांत आहे व ती त्यांनीं शाळापत्रकांत कळविली आहे सबब वर्त० पत्रांत प्रसिद्ध करण्याचें कारण दिसत नाहीं.

## वर्तमानसार

मद्रास इलाख्यांत मंगलोर येथें आति वृष्टी झाली.नदीच्या दोहो बाजूला मैल मैल पाणी चढून फार खराबा झाला. ३०० घरें पडलीं. नुकसान एक लक्ष रुपयांचें झालें.

सालमजकुरीं तंगीमुळें खर्चाचीं मोठालीं कामें बंद होणार तरी रजपुत स्टेटरेलवेचें काम चालू होईल असें ह्मणतात. त्या स्टेटरेलवेचा एक फाटा होळकर स्टेटरेलवेला मिळवून दुसरा बडोदा रेलवेला अमदाबादपर्यंत मिळविणार आहेत. हें काम फारच महत्वाचें आहे.

गेल्या आठवड्यांत कित्येक व्यापाऱ्यानीं चिनाकडे रुप्याचें नाणें व विलायतेकडे सोन्याचें नाणें पुष्कळ पाठविलें.

सिमला येथील एका तरुण साहेबानें ख्रिस्ती धर्माचा त्याग करून हिंदु धर्माप्रमाणें आचरण चालविलें आहे. असें वर्तमान आलें आहे कीं त्याचें विऱ्हाड एका हिंदु गृहस्थाकडे आहे, त्यानें जोग घेतला आहे. व आतां तो यात्रा करीत फिरणार आहे.

मुंबईस स्टेट्समन नावाचें इंग्रजी नित्याचें वर्तमानपत्र आहे. त्यास गुदसालीं ३०००० रुपये कर्ज झालें ह्मणून तो कारखाना त्याच्या मालकानें मि. ब्लांकर्ड यास ८००० रुपयांस विकला. त्यांनाही एका वर्षांत १३००० रुपये कर्ज होऊन सावकाराच्या तगाद्यामुळें दिवाणी तुरुंगांत जावें लागलें. इतकी निकृष्ट स्थिति ज्याची त्यास न कळणें व अशा थरावर गोष्ट जाणें मोठें लज्जास्पद होय.

मि० कृष्णाजी नारायण खेर बी ए एल एल बी यांस वरणगावास मुनसफ नेमिलें.

मि० बासवेल साहेब अहमदनगरचे कलेक्टर यानीं राजिनामा दिला त्यामुळें नेमणुका झाल्या त्या अशा:—मि० नार्मन साहेब नगरास कलेक्टर, मि० ग्रे बेळगावास कलेक्टर, आणि मि० मूर सातान्यास कलेक्टर.

म्याट्रिक्युलेशनची मुंबई युनिव्हर्सिटीची परीक्षा तारीख२० नोवेंबररोजीं सुरू होणार. कोठें काठें हाणार याजविषयीं ठराव अजून झाला नाहीं.

लार्ड लिटन साहेब यांस गेल्या आठवड्यांत पुत्र झाला.

मद्रासेकडे महामारीचा उपद्रव जारी आहे.

हरद्यापासून जबलपुरापर्यंत अतिशय पाऊस पडला.

सिंधकराचीकडे पुरानें बरीच गडबड केली असें समजतें.

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

इतका वेळ नाण्याची उत्पत्ती, निरनिराळ्या प्रकारची नाणीं व तीं नाणीं नसल्यापासून होणाऱ्या गैरसोयी यांज विषयीं थोडेंसें सांगितलें. आतां सर्व विशेष सुधारलेल्या देशांतून सर्व प्रकारचीं नाणीं वर्ज करून धातूंचीं व विशेषत: सोनें व रुपें यांचींच नाणीं कां करितात याचा आपण विचार करूं.

सर्वांत मुख्य गोष्ट ही आहे कीं जो पदार्थ एखाद्या देशांत नाण्याप्रमाणें चालावयाचा असेल त्या पदार्थाचे किमतींत इतर जिनसाचे किमतीप्रमाणें वरचेवर फेरफार होऊं नयेत व जितके फेरफार होण्याचा संभव कमी तितका तो पदार्थ नाण्या ऐवजीं चालविण्यास चांगला असें समजावें. असे पदार्थ ह्मटले ह्मणजे सोनें किंवा रुपें. विशेषत: सोनें हेंच आहे. जर सोनें व रुपें यांचे भाव गहूं किंवा डाळ यांच्या भावांप्रमाणें प्रत्येक दिवशीं फिरले तर पदार्थांची किंमत त्या सोन्या व रुप्याचे नाण्यांत एका प्रमाणानें होणार नाहीं. इतके दिवस रुप्याची किंमत बहुतेक स्थाईक होती परंतु आलिकडे विलायतेंत रुप्याच्या भाव अगदीं उतरला आहे तो भाव उतरण्याचें कारण कीं युरोपांतील जर्मनी वगैरे संस्थानानीं रुप्याचें नाणें बंद केल्यामुळें सर्व रुप्याचें नाणें धातुभावानें विकावयास लागलें आहे. शिवाय रुप्याच्या खाणी सांपडल्या आहेत त्यामुळें रुप्याचा भाव ह्मणजे आपल्या १ रुपायास त्यांचे १ शिलिंग ११॥ पेन्स व मागं शिलिंग ही बरावर मिळत असे तो हल्लीं १ शिलिंग ९॥। पेन्स इतका भाव कमी झाला आहे व कांहीं लोकांची अशी कल्पना आहे कीं याहूनही रुप्याचा भाव कमती होईल. यावरून असें लक्षांत येईल कीं ज्या पदार्थांत अगदीं कमी फेरफार होतात असें एक सोनें मात्र आहे व याच कारणास्तव सर्व सुधारलेल्या देशांचा विचार सोन्याचीं नाणीं करण्याचा चालला आहे.

( पुढें चालू. )

## नोटिसा.

जीवराज बालू दुकान बंदर मुंबई यांस नोटिस देणार ताराचंद मुदडा दुकान पेठ खामगाव नोटिस देतों असी कीं, तुह्माकडेस आमची खातेबाकी रुपये ६८८५ सहा हजार आठ शें पंचायशी व्याजासुद्धां निघत आहे ते सदर्हू रुपये ही नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत व्याजासुद्धां आमचे दुकानीं पाठवून द्यावे. वर लिहिलेले मुदतींत तुह्मी रुपये न पटविल्यास शिरस्त्याप्रमाणें तुमचेवर दावा करून खर्चासुद्धां रकम भरून घेऊ. कळावें तारीख ४ माहे आगस्ट सन १८७६ इसवी.

( सही ) ताराचंद मुदडा
दुकान खामगाव
दस्तुर खुद्द.

नोटिस.

गोविंदा वल्लद तिमका महार मौजे राखेडे तालुके चिखली जिल्हा बुलढाणें यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मजला कळत नवते तवपावेतों माझें संगोपन तूं व माझे बापानें केलें. हल्लीं तीन वर्षें झालीं मजला वटी आली ते दिवसापासून [illegible]रीतीप्रमाणें मजला नांदवीत नसल्याकारणानें मी आजपावेतों माझे बापाचे घरीं राहिले. नंतर आपले जातींत तुमचे संबंधांत मजला फारकती देण्याविषयीं तुह्मास त्या लोकांनीं कळविलेंही होतें त्याप्रमाणें तुह्मी मजला आजपावेतों फारकती दिली नाहीं. तशांत तुह्मास नांदविण्याचा शऊरही नाहीं. करितां नोटिस देण्यांत येते कीं, सदर्हू नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आपले जातींत येऊन माझे नांदविण्याची सोय करून द्यावी. आणि कोणते प्रकारें नांदविण्याची सोय कराल याविषयीं नोटिशीनें कळवावें. याप्रमाणें तुमचे कडून कांहींएक न झाल्यास तुमचा मजवर अर्थाअर्थीं संबंध रहाणार नाहीं. कळावें. तारीख १५ माहे आगष्ट सन १८७६ इसवी.

( सही ) सोनी मर्द गोविंदा महार
इचे हातची निशाणी
बांगडी.

नोटिस.

किसनसिंग वल्लद श्रावणसिंग सीक कानस्टेबल टाऊन पोलिस रहणार मलकापुर यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी मजसी लग्न लाविल्यापासून सुमारें ३ वर्षें तुह्मी मला जनरीतीनें वागविलें पुढें तुमचे मनाप्रमाणें मी वागत असतां तुह्मी माझे पासीं पाव आण्याची सुद्धां चीज वस्त न ठेवितां मला मारहाण करून हाकून दिलें त्यास सुमारें ७ वर्षें झालीं. पुढें तुह्मी दुसरें लग्न करून आपला निर्वाह करीत आहा. मी आपले बापाचे घरीं चालीरितीनें वागून दिवस काढले आणि मी ४।५ वेळा घरीं आले असतां मारहाण करून घराबाहेर हाकून दिले त्यास ही नोटिस देण्यांत येतें कीं ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला दरमहा ५ रुपयेप्रमाणें देण्याची व्यवस्था लावून द्यावी याप्रमाणें न झाल्यास मुदती पुढें मजवर तुमचा कोणतेही प्रकारें हक्क रहाणार नाहीं मला समजेल त्या रीतीनें मी आपला निर्वाह करण्याकरितां दुसरा नवरा कायदेशीर रीतीनें केल्यास तुमचा दावा मजवर रहाणार नाहीं- कळावें. तारीख ११ आगष्ट सन १८७६ इसवी.

ताजाकलम– मी ७ वर्षें आपले बापाचे घरीं होते त्याजबद्दल त्यास दरमहा ५ रु. प्रमाणें ४२० रुपये खर्च आला तोही पाठवून द्यावा नाहींपेक्षां दिवाणींत दावा करून सदर्हू पैसा घेतला जाईल.

( सही ) सदाकुवर मर्द किसनसिंग
निशाणी हातची बांगडी

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास ..................... १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिरात
## सर्वज्ञानसंग्रह.

विनंतीयुक्त सूचना.

प्रति महिन्यास निघणारें पुस्तक.

सर्वांस विनंती जे सप्तंबर महिन्यापासून पुढें प्रत्येक महिन्यास मी खालीं सही करणारा वरील नावाचें पुस्तक डिमि कागदाच्या अष्टपत्री सांच्यावर १२० पृष्ठांचें टैपावर छापून प्रसिद्ध करण्याचा हेतू राखतों हा ग्रंथ न्याशनल छापखान्यांत मध्यम टैपानीं सुवाच्य रीतीनें छापणार. ह्या ग्रंथास विद्यावृद्धि, ज्ञानवृद्धि इच्छुकांनीं, आणि सतत् नवीन सत्कार्यास आश्रयभूत उत्तेजन देणार सद्गृहस्थांनीं, व परोपकारी मंडळीनीं मला साह्य द्यावें, अशी माझी त्यांस प्रार्थना आहे. ह्या ग्रंथाची अवश्यकता असावी. व सर्वांनीं व, मुख्यत्वें प्रापंचिकांनीं, हा ग्रंथ निरंतर संग्रहीं ठेवावा ह्मणून ह्या ग्रंथांत सर्वोपयुक्त, व मान्य विषय लेखन करण्याची योजना केली आहे. माझें मत असें आहे कीं, हा ग्रंथ मुलांस, व स्त्रीशिक्षणासही मोठा साह्यभूत होईल.

ग्रंथांत येणारे विषय.

१ नीतिसंग्रह; २ सर्व प्राकृत प्रियग्रंथांतील इतिहास; ३ एक सुंदर काल्पित गोष्ट. ४ एकंदर वाचकांस उपयोगी पडणारा सर्वमान्य सुभाषितसंग्रह, त्यांत समश्लोक, संस्कृत आर्या, अभंग, दंडरे, व इंग्रजी अर्थ; ५ एक प्रकारचा कोश कीं, ज्यांत बहुश: अवश्यक वस्तूंचीं मराठी, इंग्रजी इ० नावें अनुक्रमानें येत जावीं; ६ प्रत्येक महिन्याच्या वर्तमानाचा समुच्चय; ७ दिवाणी फौजदारी कायदे; धर्मशास्त्रानुरूपनोंध; ८ कवितेस उपयोगी पडणारीं साधनें. मुलींस उपयुक्त होणाऱ्या गोष्टी अगर गाणीं इ० इ० इ० न यापेक्षां कित्येक फरमाशीवरून नवीन विषय थोडे थोडे अनुक्रमानें येतील.

अशा करारानें पुस्तक रचण्यास किती श्रम लागतील हें कोणाच्याही लक्षांत साहजीकरीत्या येईल, ह्मणून या ग्रंथाची किंमत सांप्रत प्रतिवर्षाची १० रुपये सुतीं ठेविली आहे. [illegible] आश्रय जमले आहेत, परंतु पुरतें साह्य मिळाल्यावांचून सुरवात होणें नाहीं.

प्रथम हा ग्रंथ कसा निघणार त्याबद्दल नमुन्यासह मोठीं पत्रकें सर्वांस व आश्रयदात्यांस प्रसिद्ध होतील त्यांत सविस्तर मजकूर लेखन होईल.

पत्ता– पत्र घेणारानीं आपलीं नावें मुंबईंत न्याशनल छापखान्यांत, ठाण्यास सूर्योदयांत, साताऱ्यांत महाराष्ट्रमित्रांत, व बडोदें येथें सिद्धनाथीं गणपतिमंदिरांत मालकाचे नावें पाठवावीं.

मुंबई, १ली जून सन १८७६ इसवी.

विरेश्वर सदाशिव छत्रे.

## जाहिराती.

### IN THE PRESS
### THE CODE OF CIVIL PROCEDURE

Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2-8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3 afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.

PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

हें पत्र अकोलें एथें. खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० २७ माहे आगष्ट सन १८७६ इ० अंक ३५

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### विठ्ठलसुवासिनीनें बालहत्या केली.

देऊळगाव राजा ता. ६ आगष्ट.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. महाराज आपण वऱ्हाड प्रांताचा समाचार घेण्याचें अत्यंत महत्वाचें व लोकोपयोगाचें काम स्वीकारलें आहे. ह्मणून त्या भागाचे एका कोपऱ्यांतील जें हें राजाचें व विशेषेंकरून श्री बालाजीचें गाव यांत कृष्णाची लीला तर नेहेमी चाललीच आहे; पण त्यांतून कांहीं अद्भुत चमत्कार पहाण्यांत आला तो आपल्यास कळविला ह्मणजे आपण त्याचा समाचार घ्याल अशी उमेद बाळगून हें पुढील वृत्त लिहिलें आहे.

दयानंद व उदरभट हे दोघेजण आज प्रातःकाळी बालासाहेबाचे मंदिराजवळ कुजबुज करीत बसले होते त्यांचें संभाषण मी ऐकिलें तें थोडक्यांत येणेंप्रमाणें—

दयानंद— नमस्कार उदरभटजी नमस्कार, कां आज कोठें रक्षाबंधन करावयास जावयाचें नाहीं? कालच काम उरकून घेतलें वाटतें. बरें काल श्रावणीचे व रक्षाबंधनाचे मिळून एकंदर किती गंडे जमले? दोन रुपयांचे खुर्दा तर खोटच नसेल.

उदरभट— रावसाहेब आपण साक्षात् मूर्तिमंत दयानिधि आहां ह्मणून आपल्यास आह्मा उदरांची काळजी, पण आह्मास बहुतेक अशांची गांठ पडते कीं, त्यांस आशीर्वाद दिल्याबरोबर ते ह्मणतात "उदर उदर" ( तिकडे तिकडे. )

दयानंद— काल सणाचा दिवस, काल तर उदराची चंगळ, घृतकल्या मधुकल्या चमचमित नां ? बरें सांगा आतां, खरें सांगा किती दक्षिणा मिळाली ?

उदरभट— रावसाहेब कालचा फजीतवाडा पुसूं नका. इतके दिवस आह्मास वाटत होतें कीं, भट काय ते आह्मीच उदर. पण काल पाहिलें तों गावांत एक दुसरेंच उदरभट उद्भवले आहेत. त्यांच्या आदर अतिथ्यांत सर्व गृहस्थ मंडळी गुंतली होती मग आह्मास दक्षिणा कसली मिळते.

दयानंद—असे कोण भट आहेत बुवा!

उदरभट— सर्व गावभर झालें आणि तुह्मास कसें नाहीं कळलें ?

दयानंद—असें काय झालें तरी काय?

उदरभट— अहो काय सांगावें अलीकडे ब्राह्मणांच्या स्त्रियांनीं ताळ सोडिला, आजपर्यंत बाहेरील गोष्टी ऐकत होतों पण आज तर आपले गावांतच एका विधवेनें प्रताप केला.

दयानंद — कोण होती ? आणि तिनें काय केलें तरी काय ?

उदरभट— ( खेद मानून ) पहाडेकरांची कारटी चिमणी

दयानंद— ती तर देऊळघाटीं होती. ती एथें कधीं आली व तिनें काय प्रताप केला ?

उदरभट— तुह्माला तर ठाऊकच आहे कां तिचा नवरा बाळाभाऊ पाहाडी तो लहान असतांच मरण पावला. त्या ढालगजीनें गणपती वाढवून आज त्याचा प्राण किं हो घेतला! काय निर्दय व घोर कर्म हें ! !

दयानंद— हें भयंकर व क्रूर कर्म तिनें कसें केलें तें इत्थंभूत सांगा पाहू. चांगल्या व वाईट दोनोही गोष्टी श्रवण करीत असावें असें आमचे एका सुमित्राचें आह्मास सांगणें आहे.

उदरभट— देऊळघाटास ती आपले बाहिणीचे एथें होती तेव्हां कोठें एके दिवशीं चिमणीला फिरस्ता चिमणा भेटला व चिमण्यापासून तिला अमोल्य रत्न प्राप्त झालें. तें तिणें नऊ महिने पोटांत गळ्यांतल्या ताइताप्रमाणें संभाळून ठेविलें. आठ दहा दिवस झाले ती पंढरी करून एथें आली. पंढरी केल्याबरोबर पहिला सुवास परित्याग करून विठ्ठलसुवास चांगला समजून विठ्ठलसुवासिण झाली व त्या पुण्य कर्मेंकरून बंदिस्त रत्न बंदमुक्त झालें पण गाढवाला गुळाची चव काय? तसें या गाढवीणें तें दगडानें ठेचून ठार मारून घराजवळ उकिर्डा होता त्यांत टाकून दिलें व आपण स्नान करून सोंवळ्यानें पूजा वगैरे करून फराळास बसली.

दयानंद— बरें मग पुढें काय झालें ?

उदरभट— पुढें काय? त्या बोडकीचें बोडकें. त्या उकिरड्यांतील मूल कोणाचें ह्मणून पोलिसानें चौकशी करितां चिमणीचें घर जवळच होतें तेव्हां तिचा वहीम आल्यावरून तपासणी केली तों तिचें घरांत दारांत रक्ताचे थेंब पडलेले, कपडे खराब झालेले वगैरे पुद्दे सापडल्यावरून व दायांनीं तिचे शरीराची परीक्षा केल्यावरून पोलिसानें तिला गिरफ्तदार करून ठेविली आहे.

दयानंद—हर हर फार वाईट झालें! ह्या महत्पातकाबद्दल कायद्यांत फारच भयंकर शिक्षा सांगितली आहे.

उदरभट—फार चांगलें होईल. चांभाराचे देवाला खेटराचीच पूजा पाहिजे.

दयानंद—उदरभटजी, यांस कांहीं तरी युक्ती काढा.

उदरभट—यास युक्ती काढा आणि आपल्या जिवावर जोखीम आणून घ्या, इतकें कोणी सांगितलें आहे. दयानंद महाराज, आपली दया पुरी करा. आह्मी गरीब माणसें उदरार्थी. इंग्रजी कायद्याची तर आह्मास अशी भीति वाटते कीं छातींत धस्स होऊन जातें.

दयानंद—तुह्मी आपल्यावर जोखीम आणून घ्या व सरकारचे कायद्याविरूद्ध कांहीं करा असें माझे मुळींच ह्मणणें नाहीं. पण अशा प्रकारचे गुण हे कमी होण्याची व आपले ब्राह्मणपणाची योग्यता राहील अशी कांहीं तजवीज योजण्याची खटपट करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे कीं नाहीं?

उदरभट—याला युक्ती काय? जिच्यानें संन्यासव्रत करवत नाहीं तिणें कसाबिणीचा रोजगार करावा ह्मणजे चैनची चैन आणि कामचें काम.

दयानंद—महाराज अशी आपण उडवाउडवी करू नका. ही मानहानी होण्याची, कुळाला बट्टा लागणारी युक्ती काय कामाची? अशी युक्ती असावी कीं जेणेंकरून धर्मरक्षण होईल; स्त्रियांचें कार्य साधेल व कोणचेच नुकसान निघावयाचें नाहीं.

उदरभट— आह्मास कांहीं नाहीं सुचत. आपणच काढा एकादी तजवीज पाहूं.

दयानंद—स्त्रियांचा पुनर्विवाह करीत जावा. असें करण्यास मन्वादि ऋषींची संमति आहे.आतां बरेच दिवसांपासून हा प्रघात बंद पडल्यावरून लोकांस वाटतें कीं ब्राह्मणी स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास अधिकार नाहीं. या कामांत भागिनी प्रीति शोधकपणा व धूर्तता हे तीन गुण अवश्य पाहिजेत. यावांचून हें कार्य व्हावयाचें नाहीं.

उदरभट—ठीक आहे. स्त्रियांचा पुनर्विवाह करावा आणि पुरुषांना बायको मेल्याबरोबर संन्यासी करावें! कीं सुधारणा झाली? आगलागो या सुधारणेला. महाराज, आपल्याशीं नाहीं आमच्यानें बोलवत. चला येतों आतां. ( हात पुढें करून ) तपकिरीची डबी हिकडे करा पाहूं.

दयानंद— रागावू नका, चित्त शांत करून सांगतो तें श्रवण करा, पसंत पडल्यास कबूल करा. ऐकण्यास तर कांहीं हरकत नाहीं?

उदरभट—[तपकिरीची चिमटी घेऊन एक दोन वेळां ओढून आणखी चिमटी घेऊन डबी परत करतो ] बरें तर बोला. हे आह्मी बसलों.

दयानंद— उशीर तर झालाच आहे. चार पळें बसा. मलाही बाजारांत जावयाचें आहे. एकादशी करणें उत्तम पक्ष पण ती जर न होईल तर धान्यफराळ करावा कीं नाहीं? निदानीस एकधान्य तरी खावें ह्मणून ह्मणतात. त्याचप्रमाणें एक पति वारल्या बरोबर वपन करून संन्यस्त रहावें हें चांगलेंच. याला कोण नांव ठेवील? पण असें कठीण व्रत निभावणें कठीण आहे. ह्मणतात कीं स्त्रियांना पुरुषापेक्षां काम ज्यास्त आहे. निदान एवढें तर खचित् आहे कीं स्त्री पुरुषांच्या सर्व इच्छा व मनोधर्म अगदी सारिखे आहेत. ईश्वराजवळ उभयताचे हक्क समान आहेत. तर मग पुरुषांना दोन वेळा किंवा पाहिजे तितके वेळां लग्न करण्याचा अधिकार असून बिच्याऱ्या अबलांस एकदम ह्मणजे एकाकाळीं नाहीं तर नाहीं पण एक पति निवर्तल्यावर तरी दुसरा पति पाहिजे कीं नाहीं? एक घर जळालें तर दुसरें बांधावें लागतें कीं नाहीं? एक राजा मेला तर दुसरा गादीवर बसवितो कीं नाहीं? पर्जन्य काळांत एक छत्री फाटली तर दुसरी घ्यावी लागते कीं नाहीं? एका औषधाचा गुण आला नाहीं तर प्राण जाईपर्यंत एका मागून एक नवीन औषधी रोग्यास देतात कीं नाहीं? त्याच प्रमाणें जिचें छत्र गेलें आहे व जिला काम रोगानें अति पीडा दिली आहे अशा स्त्रीला कोणी पालन करणारा पाहिजे कां नाहीं? पंहा या चिमणाबाईनें जो खून केला आहे तो सुखानें केला असेल काय? हेंच मूल तिचा नवरा असून तिला झालें असतें तर तिनें मारलें असतें काय? त्या मुलाची जिवापलिकडे तिणें खबरदारी ठेविली असती. लेंकराची प्रीति व कळकळ सर्व स्त्रियांस सारखीच असते. अंधळें पांगळें किंवा कसेंही वेडें विद्रें मूल असलें तरी आईस आवडतें. असें असून चिमणाबाईनें नऊ महिने बाळगून सर्व वेदना सहन करून नंतर मारिलें तेव्हां अर्थांत तिनें अत्यंत दुःखानें व निरुपायास्तव हें घोरकर्म केलें यांत संशय नाहीं.

उदरभट— आपण ह्मणता हें खरें आहे पण आज आह्मी उघडपणें लोकांत असें बोलूं लागलों तर उद्या आमची दक्षिणा बंद होईल व बारा महिन्यांत एकही आमंत्रण यावयाचें नाहीं. ज्याचे दुःख त्यालाच ठाऊक. उदरभरास उदराची काळजी.

दयानंद— नाहीं कोण ह्मणतो, ज्याचें दुःख त्याला जसें समजतें तसें तें इतरांस कळत नाहीं. याजकरितां आपल्या भागिनीच्या दुःखाची कळकळ आपणच बाळगिली पाहिजे. यास्तव कंबर बांधा व इष्ट मित्रांचें कुत्सित निर्भर्त्सनेकडे लक्ष न देतां आपलें कर्तव्यकर्म स्मरून

पुर्नविवाह करण्यास प्रवृत्त व्हा. निदान जे लोक या कामीं पुढें सरसावले आहेत त्यांजकडे तरी तुह्मी आपल्या संकटांत पडलेल्या बहिणींस पाठवीत जा, ते त्यांचा अंगीकार करतील. माझ्या सर्व विधवा बहिणींस व मुख्यत्वेंकरून बालविधवा बहिणींस हेंच कळकळीचें सांगणें आहे कीं त्यांनीं एक तर एकनिष्ठपणें संन्यास व्रत चालवावें, नाहीं तर कोणाची भीति न बाळगतां पुनर्विवाहास जाऊन मिळावें तेणेंकरून त्यांची अप्रतिष्ठा न होतां परमेश्वराजवळ पातकाचा जबाब द्यावा लागणार नाहीं. उदरभटजी आपण आज पासून या कामीं चांगलें लक्ष पुरवीत जावें हीच शेवटली आपल्यास विनंती आहे. येतो आतां नमस्कार.

आपला

क्ष

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. वाशीमचें रजिस्टरचें काम मे० ताजुदीन साहेब असिस्टंट कमिशनर यांकडे आहे तें आपल्याकडे घेण्याविषयीं मि० अबदुलहक्क यांची खटपट चालली होती असें ह्मणतात परंतु ती शेवटास गेली नाहीं व कारणही समजलें नाहीं. ७३।७४ सालांत मि० अबदुलहक्क वाशिमास असून म्युनिसिपलकमेटीचे चेयरमन होते. हल्लीं तेंही काम त्यांकडे नसून आमचे लोकप्रिय मे० ताजुदीन साहेब यांकडे आहे. यामुळें कोठें कांहीं चळवळ नाहीं. मि० हक्क साहेब अशा कामीं असले ह्मणजे गडबड खूप असते असें लोक ह्मणतात.

येथील हुजूर रजिस्टर कारकून दत्तात्रय श्रीनिवास यांचा पगार २९ चा १९ रुपये बिन कारण केल्या मुळें त्यांणीं दोन चार महिन्यांचा पगार घेतला नाहीं. असें ऐकतो कीं त्यांणीं आपल्या वरिष्ठांकडे याबद्दल अर्ज करून त्याचा निकाल होई पर्यंत पगार घेत नाहीं ह्मणून लिहिलें होतें. याचा परिणाम व्हावा तसा न होतां त्या बिचाऱ्यास खात्यांतून दूर केलें होतें परंतु मेहेरबान रेसिडेंट साहेबांनीं कृपावंत होऊन दत्तोपंतास जागा देवविली हें पाहून आनंद होतो.

जून महिन्यांत मि. अब्दुल हक्क येथें आले ते वेळेस त्यांस राहण्याच्या जाग्याची मोठी पंचाईत पडली होती परंतु बरीच सवड निघाली. सदर स्टेनांत ज्या कोठडींत आजपर्यंत बेवारीस व हरास होण्याचा माल राहत होता त्या कोठडींतून सदर्हू माल काढून ती जागा त्यास राहावयास दिली व गावांत किरायानें एक घर घेऊन त्यांत तो माल ठेविला आहे. भाडें मि० अबदुलहक्क देतात असें ऐकतों. परंतु गावांत सरकारी माल ठेविल्यानें त्यास अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. अग्नी वाऱ्याची भीति राहते, चोरांचा डोळा असतो, व अफरातफरीस फुरसत सापडते. या सर्वांची जोखीम अबदुलहक्कांनीं आपल्यावर घेतली आहे किंवा नाझराच्या डोक्यावर ठेविली आहे हें समजत नाहीं. सरकारी मकानाचा उपयोग खानगी कामाकडे करावा असें कोणत्या निर्णयसिंधूंत सांगितलें असेल तें असो.

दहा बारा दिवसांपूर्वी येथील हेड क्लार्क यांचे तबेल्यास आग लागून राख झाली. नुकसान किती झालें हें समजलें नाहीं, परंतु विशेष चमत्कार वाटण्यासारखी ही गोष्ट आहे कीं हा तबेला ज्या बंगल्याचा भाग आहे तो बंगला पूर्वीं मि. अब० हक्काचा असून ज्या दिवशीं त्यांची बदली वाशिमाहून कारंज्यास झाली त्याचे दुसरे दिवशीं त्या बंगल्याची गुडाखू झाली. व पुन्हा वाशिमास मालक येतांच तबेल्यानेंही अग्नींत उडी टाकिली.

कोणत्याही जिल्ह्यांत पहा सदर स्टेशनांतील सडका जितक्या उत्तम असतात व त्यांविषयीं जितकी काळजी घेतली जाते तितकी दुसऱ्या कोणत्याही रस्त्याबद्दल कोणी घेत नाहीं. सदर स्टेशनांत लोकल फंडाचा पैसा मनमुराद असतो यामुळें रस्त्यांस पुरून तेथील रहिवासी लोकांच्या सोयी साठीं व सुखासाठीं त्या पैशांतून बागबगीचे व मनोरंजक जागा करितां येतात. तोच पैसा सार्वजनिक सोयीकडे लाविला असतां सद्व्यय होईल. या जिल्ह्यांत वाशिमाहून अकोल्या पर्यंत झालेल्या पक्क्या सडके शिवाय येथून तालुक्यांचे ठिकाणा पर्यंत अद्यापि पक्क्या सडका होणें आहेत, मग नदी नाल्यास पूल नाहींत यांत फारसें नवल नाहीं. या अडचणीमुळें माझ्या सारख्या फिरस्त्यास बरसातींत एका गांवाहून दुसऱ्या गांवास पोटासाठीं जाणें ह्मणजे जिवावर येतें. मला असें वाटतें कीं लोकल फंडाचा पैसा खर्च करण्याचे बाबर्दींत हल्लीं जी व्यवस्था आहे त्या पेक्षां प्रत्येक गावचे लोकलफंडाचें उत्पन्न त्याच गावचे सुधारणुके कडे लावावें हें फार चांगलें असें झाल्यानें जिल्ह्यांतील सर्व गावें व सर्व रस्ते जलदी दुरुस्त होण्याचा संभव आहे. एकादे गांवांत पाहिजे तितकी सुधारणा करण्यास लोकल फंडाच्या पैशाची कमताई आल्यास ज्या गावीं सुधारणा होऊन पैसा शिलक राहिला असेल तेथून पैशाची मदत घेत जावी. हा आपला रयतेचा विचार. आपण आपल्या मनांत पुष्कळ मांडे खातों परंतु खाऊं देतो कोण? लोकल फंडाचा आमचा ( रयतेचा ) पैसा आहे ह्मणून आमच्यानें सूचना केल्या खेरीज रहावत नाहीं.

वाशिम तारीख १९ माहे आगष्ट सन १८७६ इसवी.

एक

फिरस्ता.

---

नोटिस

खालीं सही करणार इजकडून लक्ष्मण वल्लद हनगोजी भिसडी रहाणार मौजे कोळगांव प्रगणे सिरपुर तालुके वाशिम जिल्हा वाशिम यांस नोटिस देण्यांत येतें कीं तुझें व माझें लग्न लागण्याचे दिवशीं तुझे जातीचा संशय आला यामुळें माझा बाप लग्न लावीना परंतु तूं हळद लावून आला होता सबब गांवचें यश न जावें या करितां जातीचे पंचानीं एक महिन्याचे आंत जातीचा पुरावा देण्याबद्दल तुज पासून करार नामा करून घेऊन लग्न लाविलें परंतु तुज बरोबर मजला लक्ष्मीपूजना करितां पाठविलें नाहीं. असें असून आज सात वर्षें झालीं तूं जातीचा पुरावा देऊन संशयांतून मुक्त झाला नाहींस व मला घरीं नेलें नाहीं करितां ही नोटिस पावले दिवसापासून पंध्रा दिवसाचे आंत जाती बद्दल पुरावा देऊन मी आज सात वर्षें बापाचे घरीं आहे त्याचा दर सालास रुपये ३० प्रमाणें खर्च देऊन नंतर मला घरीं घेऊन जावें नाहीं तर मी कायद्याप्रमाणें गंधर्वाचा दुसरा घरठाव करून आपला संसार करीन मग मजवर तुझा लग्न संबंधी व कोणतेच प्रकारचा हक्क किंवा दावा रहाणार नाहीं. कळावें तारीख १७ माहे आगष्ट सन १८७६ इसवी.

( सही ) वालंबी मर्द लक्ष्मण भिसडी रहाणार जवळ तालुके मेहेकर निशाणी बांगडी.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ८ शके १७९८.

---

## सर सालरजंग साहेब यांचें पुनरागमन.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं हैदराबादचे दिवाण साहेब सर सालरजंग विलायतेहून गेल्या गुरुवारीं सकाळीं मुंबईस सुखरूप येऊन पोंचले. हैदराबादेहून त्यांकरितां मंडळी आली होती ती सर्वांचे आधीं त्यांस आणण्याकरितां आगबोटीवर गेली. सरकारांतूनही अंडर सेक्रटरी, ओरियंटल ट्रान्सलेटर व पलटणीचे १०० लोक त्यांचे पेशवायासि गेले होते. शहरचे संभावीत लोकही बरेच गेले होते. आगबोटीवरून उतरतांना तींतील सर्व लोकांस त्यानीं संतोषानें चांगलीं बक्षिसें दिलीं. जमिनीवर येतांच तोफांची सलामी झाली. व ते आपले एजंट मि. मंचरजी बमनजी यांकडे उतरावयास गेले. तिसरेप्रहरीं मुंबईचे मुसलमान लोकांची अनजुमना नामें एक सभा स्थापन झाली आहे तिनें दिवाणसाहेबास मानपत्र दिलें. त्याप्रसंगी मि० कमरूदीन तयबजी व्हाईसप्रेसिडेंट, आन. महमद अली रोगे, मि० गुलाम महमद मुनशी व दुसरे १९ गृहस्थ होते. अध्यक्षानीं मानपत्र वाचून दाखविलें व त्यावर दिवाण साहेबानीं थोडक्यांत सुरस भाषण केलें.

विलायतच्या प्रवासाबद्दल ते असें ह्मणाले कीं इंग्लंडांत मला सरकाराकडून मोठा मान मिळाला, व तसाच लोकांकडूनही मिळाला. इंग्लंडांत मी ज्या ज्या गोष्टी पाहिल्या त्यांच्या योगें मला मोठा फायदा झाला. मी आपले देशाची सुधारणा करण्याविषयीं जी इच्छा बाळगित होतो तिला हा मला नवीन मिळालेला प्रत्यक्ष अनुभव फार चांगलें सहाय करील. याशिवाय मला या प्रवासापासून काय लाभ झाले ते माझ्या पुढील वहिवाटीच्या गोष्टींत आपणास दिसून येतील.

हें सांगून नंतर त्यानीं मानपत्र देणाराचे आभार मानिले.

दुसरे दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं सकाळीं साडे सहावाजतां आगगाडींत बसून दिवाण साहेबाची स्वारी हैदराबादेकडे चालती झाली. स्टेशनावरही सरकारी मंडळी, फौज, तोफांची सलामी, व लोकांची दाटी बंदराप्रमाणेंच होती.

---

## नेटिवांस जज्ज, कलेक्टर असे आपण पाहूं काय?

आमच्या हिंदु लोकांचें दुर्दैव असें बलवत्तर आहे कीं तें अनेक रीतीनीं आमच्या कल्याणास आडवें येत असतें. व आमच्या देशांत युरोपियन लोकांचें राज्य झालें ही आमचें सुदैवाची गोष्ट खरी तरी जातिभेदाचे संबंधानें त्यांतही आमचें दुर्दैव पुढें येतेंच. सिविल सर्व्हिसच्या जागा परीक्षा घेऊन जे लायक ठरतील त्यांस द्यावयाच्या, काळ्या गोऱ्याचा भेद मनांत आणावयाचा नाहीं, असा नियम असतां त्यांतही बहुत गैरसोयी नेटिवांस ठेविल्या गेल्या आहेत. नेटिवांचे वयाची यत्ता फार थोडी ठेविली आहे व त्यांस परीक्षेस इंग्लंडास अति दूर जावयाचें ठरविलें आहे, या गैरसोयीच्या व अतिशय खर्चाच्या सबबेनें शेकडा ९८ इसमांची नाउमेद झालेली आहे, तशांत इकडील संस्कृत, आरबी, परशियन या भाषांचें मोल परीक्षेंत कमी ठरविलें आहे, व हीं सर्व साधनें प्रतिकूळ असतांही नशीबानें कोणी हिंदु लोक परिक्षेस जातात व पास होऊन येतात तरपुढें ही त्यांस नाउमेदीचेच प्रसंग येतात. आमचे लोकांपैकीं जे ४।९ सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत पास झालेले आहेत त्यांतून अजून कोणी स्वतंत्र जज्ज नाहीं, कलेक्टर नाहीं, डिपुटी कमिशनर नाहीं, त्यांच्या मागाहून आलेले कित्येक सिव्हिल सर्व्हिसवाले त्यांच्या पुढें गेले आहेत व ते मागेंच राहिले आहेत ही दुर्दैवाची गोष्ट नव्हे काय?

अलीकडे नेटिव सिव्हिल सर्व्हिस लोकांनीं हा आपला उणेपणा दूर व्हावा व इतराप्रमाणें पायरीनें आपणास हक्काच्या स्वतंत्र जागा मिळाव्या ह्मणून विलायतेस एक अर्ज पाठविला होता त्याची आमच्या लोकांच्या नशीबानें दाद लागली. ह्मणजे स्टेट सेक्रेटरी लार्ड स्यालिस्बरी यानीं या अर्जाचा योग्य विच्यार करून ठराव केला कीं हिंदुस्थानांत अशी वहिवाट असेल तर ती फार गैराशिस्त आहे. सिव्हिल सर्व्हिस पास झालेल्या नेटिवांचा हक्क युरोपियन सिव्हिल सर्व्हिस पेक्षां तिलमात्रही कमी नाहीं. सबब त्यांच्या बरोबरीनें त्यांके प्रमाणें नेटिव सिव्हिल सर्व्हिसवाल्यांस महत्वाच्या व स्वतंत्र जागा देत जाव्या. व ज्या आफिसांत युरोपियन लोक असिस्टंट व इतर हुद्यावर असतील त्या आफिसाच्या मुख्याचीही जागा नेटिव सिव्हिल सर्व्हिसवाल्यास द्यावी, त्यांत बिलकूल प्रतारणा करू नये. व जे युरोपियन लोक नेटिव वरिष्ठाचे हाताखालीं कामें करावयास कुचरायी

किंवा दांडगाई करतील त्यांस बेअदबीबद्दल शासन करावें असें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं लिहून पाठविलें आहे याबद्दल आह्मी संतोष व त्यांचे आभार मानितों.

हा ठराव रास्त होय व न्यायी सरकारास अवश्यक होय. पण लिहिण्यास वाईट वाटतें कीं याचा अंमल कसा होईल कोण जाणे! नुसता ठराव प्रसिध्ध झाला इतक्यानेंच कित्येक इंग्लिश पत्रकर्त्यांचीं मस्तकें फिरून गेलीं आहेत व ते मनसोक्त वरळत सुटले आहेत. त्यांतील कोणी ह्मणतात स्टेट सेक्रेटरीला अक्कल नाहीं, त्याला कळत नाहीं कीं पाण्याचा ओघ चढावाकडे कधीं वळणार नाहीं. दुसरे कोणी ह्मणतात कीं, हिंदु लोक जडज, कलेक्टर अशा हुद्यावर नेमिल्यास त्यांच्या हाताखालीं युरोपियन लोक कधीं कामें करणार नाहींत! कारण ते जिंकणारे असून जिंकलेल्यांचे ताबेदार कसे होतील? अशा नानापरीच्या वल्गना चालू आहेत. त्यावरून आह्मी ह्मणतों कीं नेटिव लोकांचें दुर्दैव बलवत्तर आहे ह्मणून अशा अडव्या तिडव्या कोट्या युरोपियनास सुचतात; नेटिवास अशाच काय पण याहून शतपट दुसऱ्या सुचतील पण त्या काढित बसण्याचे त्यांचे दिवस नाहींत ह्मणून स्वस्थ बसणें व त्या कोट्यांचा खेद न मानणें हेंच उत्तम.

**रेलवे कंपनीचें औदार्य**— उत्तर हिंदुस्थानांत पूर्व पश्चिम मोठी रेलवे ईस्ट इंडिया या नावाची प्रसिद्ध आहे. तिनें आपल्या दोन तीन नोकरांस आलिकडे मोठ्या उदार पणाच्या देणग्या दिल्या त्याबद्दल तिची तारीफ केल्या वाचून रहावत नाहीं. मि० सिसील स्टिफनसन या कंपनीचे एजंट मरण पावले. त्यांनीं २० वर्षें उत्तम प्रकारें चाकरी केली ती स्मरून त्यांच्या कुटुंबास ४०००० रुपये कंपनीनें बक्षिस दिले. दुसरे गृहस्थ मि० डी जे नोंड या कंपनीचे लंडन येथील म्यानेजर व सेक्रेटरी हे ही कंपनी उत्पन्न झाल्या दिवसापासून हिच्या पदरीं आहेत ह्मणजे ३० वर्षांहून अधिक काल यांची नोकरी उत्तम प्रकारची झाली आहे व वार्धक्यावस्थे मुळे त्यानीं राजिनामा दिला सबब कंपनीनें ८०००० रुपये त्यांस बक्षीस दिले. याच प्रमाणे दुसरे एक गृहस्थ मि० जार्ज्य सिबली यांस ही २५००० रुपये बक्षीस मिळाले. ही व्यापारी कंपनी असून तिनें आपले नोकरांचे कामगिरिचें उत्तम स्वरूप मनांत आणिलें व मोठ्या औदार्यानें त्यांस संतोषविलें याबद्दल लोकही संतोष मानिल्या वाचून रहाणार नाहींत.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत शुक्रवारीं पहाटेच्या ३ वाजल्यापासून दोन प्रहरपर्यंत भीजपा ऊस चांगला पडला. मध्यंतरी एक दोन सरी तर फार नामी आल्या. तेणेंकरून शेतकरी व गरीब गुरीब लोकांचे तोंडावर टवटवी आली आहे. व महागाईची हौस धरून नव्या उमेदीनें गल्याची उलाढाल करणाऱ्या कित्येक छोटे खानी उदम्यास तोटा येणार ह्मणून त्यांची तोंडे उतरली आहेत. पाऊस १ इं. ८९ दो. पडला. काल रात्रीं व आज पहाटें पाऊस चांगला होता.

जुडिशियल कमिशनर साहेब लवकरच हैदराबादेस जाणार आहेत.

बुलढाण्याडे यवतमाळाकडे व इलिचपुराकडेही या आठवड्यांत फार चांगला पाऊस पडला.

मि. लायल साहेब इकडील पूर्वीचे कमिशनर यांस विलायतेस जाण्याकरितां ६ महिन्यांची रजा मिळाली.

जुडिशियल कमिशनर कर्नल अलार्डाइस साहेब यांपुढें गेले आठवड्यांत उमरावतीस एक सेशन मुकद्दम्याचा निकाल झाला. व आरोपितास ७ वर्षांची कैदेची शिक्षा झाली. सप्तंबरच्या ४ थे तारखेस वाशीम जिल्ह्यापैकीं एक सेशन मुकद्दमा एथें चालणार आहे. व त्याकरितां तिसरे तारखेस जुडिशियल कमिशनर एथें येणार आहेत.

थर्ड क्लास आस्पिटल असिस्टंट मि० रघुपती मोहोनराम यांची इंग्लिश भाषेची पगार वाढण्याबाबदची परिक्षा पास झाली.

फर्स्ट क्लास आस्पिटल असिस्टंट मि० धुनापाल यास जळगावास नेमिलें व जळगावचे मि. शेखहसन अली यास मूर्तिजापुरास नेमिलें.

मलकापुरचे नायब तहशिलदार रा. रा. अवधुतराव आनंद यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

नांदुऱ्याचे एका पुरभय्यास पोलिसानें चोरीचे वहिमांत पकडून त्याची दाढी मिशी काढली, याजबद्दल चौकशी चालू आहे व तेथील पोलिसास सस्पिंड केलें आहे. तेथील डाक्टरावरही याबाबद मुकदमा चालू आहे.

या आठवड्यांत मधून मधून दोन तीन दिवस नागपुराकडील आगगाडी दीड दोन तासानें उशिरानें आली. याचें कारण असें सांगतात कीं, हिंगणघाटाकडील वरोडा खाणींतील कोळसे आगगाडीचे उपयोगास लाविले आहेत त्यांची उष्णता विलायती कोळशाहून कमी असल्यामुळें वाफ बरोबर न होतां वेगानें गाडी येत नाहीं ह्मणून उशीर लागतो. पहिल्यानें हा कोळसा तपासला असून कामास योग्य आहे असें ठरलें होतें व हिंगणघाट रेलवेवर तो चालूही केला होता तेव्हां असा बोभाट ऐकण्यांत आला नाहीं व आतां येतो यावरून हिंदुस्थानांतील कोळसे नापसत करण्याचा त्या कामावरिल लोकांचा इरादा असेल कीं काय अशी लोक शंका घेतात. आह्मी ह्मणतो तसें नसावें. आतां रेलवे कंपनी या कामाचा चांगला तपास करून निकाल प्रसिध्ध करील तर बरें होईल.

दर्यापुरचे तहशिलदार मि० यादअली यापुढें एक फसवणुकीचा फौजदारी मुकद्दमा इं. पि. को. कलम ४१९ प्रमाणें आला होता. त्यांत आरोपीनें मी अमुक गावच्या पाटलाचा मुलगा आहे असें सांगून सुमार २५० रुपयांचें कापड फिर्यादीचे जामिनकीवर नेलें होतें. यांत तहशिलदारानीं सदर्हू च्यार्ज आरोपीवर शाबीत झाल्यामुळें त्यास दंड व कैद अशी शिक्षा दिली होती. पुढें फिर्यादीनें तें कापड परत मिळण्याविषयीं अर्ज केला असतां त्याला तहशिलदारानीं हुकूम दिला कीं, सदर्हू कापडावर तुमचा कांहीं हक्क असल्यास दिवाणींत दावा करावा. आणि कापड कैदीचें आहे असें मानून आपण सरकारी रीतीनें त्याचा हरास करून त्याचे रुपये. कैदीचे दंडाऐवजी घेतले. या गोष्टीबद्दल रेसिडेंट साहेबापर्यंत काम चालून त्यानीं तहशिलदाराचा हुकूम गैराशिस्त आहे असें ठरवून रद्द केला. आणि शेष राहिलें कापड व विकलेल्या कापडाचें झालेलें सर्व उत्पन्न फिर्यादीस द्यावें असें ठरविलें. आह्मांस मोठा चमत्कार वाटतो कीं तहशिलदार जें कापड गुन्हेगाराचें नसतां तें त्यानें घेतलें असें शाबीद झाल्यावरून त्यास शिक्षा देतात तेच पुन्हा तेंच कापड गुन्हेगाराचें ठरवून विकून टाकतात! या न्यायास काय ह्मणावें? व इतक्या सामान्य गोष्टीकडेही त्यांची अक्कल पोंचत नाहीं तर त्यांवर तहशिलदारीचा जुलूम सरकारानें काय ह्मणून करावा? मागेंही हे गृहस्थ एकवार तहशिलदार होते तेव्हां यानीं एक गोष्ट इतकी अद्भुत केली कीं त्यामुळें या. तहाशिलदारास व नायब तहशिलदार, कारकून, शिपाई वगैरे सर्वांस सरकारानें एकदम बरतर्फ करून जाजम झटकलें होतें. व तेच हे गृहस्थ तहशिलदारीवर पुन्हा नेमले गेले आहेत. तेव्हां सरकारच्या या दयाभूतपणास काय ह्मणावें ?

अकोट तहशिलींतील कारकून रा. नारायण माणकेश्वर याचे विरुद्ध लांचाचे संबंधानें कोणी अर्ज केला होता त्यावरून त्यास सस्पिंड करून मि० निकोलेट्स साहेब तालुका असिस्टंट यानीं अकोटास जाऊन चौकशी केली व तींत ते निर्दोष ठरले सबब पुन्हा त्यांस कामावर रुजू करण्याविषयीं हुकम झाला.

वाशिमचे रा० रा० शंकरराव देशमुख यांचा व त्यांचे बंधु अच्युतराव देशमुख यांचा तंटा लवकर मिटेल असें वाटतें. यांच्या फिर्यादीचा निकाल मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेबांनीं केला होता तोच मेहेरबान रेसिडेंट साहेबांनीं बहाल ठेविला असें ऐकतों. मूळचा निकाल काय झाला होता हें समजलें नाहीं. शंकरराव व अच्युतराव यांचे भांडणांत सिरपुरकर रा. रा. माधवराव देशमुख याचा फायदा झाला असें ह्मणतात. दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा लाभ तो हा.

अलीकडे महिना पंधरा दिवसांत वाशिमास पर्जन्य पडला नाहीं यामुळें पावसाळा असा वाटत नसून हवेंत उष्णता होत चाललेली आहे. एकदोन दिवसांत पाणी न पडेल तर धान्यापैकीं साळी बुडतील असें ह्मणतात. सिरपुराकडे हवेचा उपद्रव सुरू झाल्याचें ऐकतों. इंगोलीस बराच सुरू आहे. जंगलांत व कित्येक गावांत जनावरास पाणी पिण्यास मिळत नाहीं. धान्य महागच आहे. या सर्वांचा परिणाम चांगला दिसत नाहीं मेघराजानें कृपा केली तर सर्वांची काळजी दूर होईल.

## वर्तमानसार

लढाई—तुर्कस्थानांतील लढाई संबंधी खबर आली आहे कीं, सर्व्हियन लोकांनीं तुर्क लोकांचा पराभव केला. बेलगेरिया येथें तुर्क लोकांनीं ख्रिस्ती लोकांची आणखी कत्तल उडविली. तसेंच सर्व्हियन लोकांचे लश्कराचे भरतींत रशियन लोक शिपाई व आफिसर देखील शरीक होत आहेत व त्यांस रशियन सरकारची परवानगी आहे.

शाईची नदी— अलजीरिया प्रांतांत शाईची नदी आहे असें समजतें. ही नदी दोहों बाजूकडून पाढऱ्या स्वच्छ पाण्याचे दोन ओढे येऊन त्यांच्या संगमापासून झाली आहे. असें ह्मणतात कीं एका ओढ्याच्या प्रदेशात लोखंडाचें सत्व, व दुसऱ्या ओढ्याचे प्रदेशांत हिरड्याच्या अंगीं जें ग्यालिक ह्मणून सत्व असतें तें आहे व या दोहोंच्या संयोगानें ही शाईची नदी बनली आहे. हिच्या पाण्यानें शाईसारखें लिहितां येतें. या पृथ्वीवर आणखी काय काय अद्भुत गोष्टी असलेल्या माहित होतील याचा नेम नाहीं,

मुंबईचे प्रसिद्ध पार्शी गृहस्थ सर कावसजी जाहांगीर आजारी होते ते आतां बरें झाले असें समजतें.

महाराणी विक्टोरिया यांणीं बादशाहीण हा किताब विलायतेस थोड्या दिवसांपूर्वीं धारण केला हें आमचे वाचकांस मागेंच समजलें आहे. आतां हा किताब हिंदुस्थानच्या संबंधानें आहे व या देशाची पुरातन राजधानी दिल्ली शहर आहे ह्मणून येत्या जानेवारीच्या पहिले तारखेस हल्लीं एथें ही महान पदवी स्वीकारण्याचा मोठा समारंभ होणार आहे. त्या समारंभास गवरनर जनरल व सर्व इलाख्याचे गवरनर जाऊन सुशोभित करतील व फौज ही पंध्रा हजार पर्यंत जमा होईल असें प्रसिद्ध झाले आहे,

सर रिचर्ड टेंपल साहेब यांस बारोनेट हा किताब दिला.

सर टी माधवराव यांचे हाताखालीं मि० भगवानदास घेलाभाई वकील यांस जुडिशियल सेक्रेटरी नेमिलें.

प्रो. मानीयर विलियम विलायतेहून हिवाळ्यांत पुन्हा परत येणार. हिंदुस्थानांतील धर्मपद्धती व पवित्र स्थलें यांवर ते ग्रंथ लिहित आहेत व त्याकरितां मद्रास इलाख्यांत त्यांस फिरून येणें जरूर आहे.

तुर्कस्थानांतील मुसलमान लोकांनीं १२००० ख्रिस्ती लोकांस क्रूर रीतीनें मारिलें असें समजतें.

मुंबईहून ६ पारशी व पुण्याहून ५ हिंदु तरूण मद्रास इलाख्यांत, सिदापुर येथें शेतकीच्या कालेजांत शिकावयास जाणार आहेत.

व्हाईसराय साहेब आक्टोबरांत काश्मीराकडे जाऊन सिंध प्रांतांतून डिसेंबरांत मुंबईस येणार.

मि० डिसराली विलायतचे फारेन सेक्रटरी यांस अर्लची पदवी मिळाली.

---

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

नाण्यांत दुसरा गुण हा असावा कीं, तीं नाणीं अगदीं एकसारखीं असावींत ह्मणजे गहूं हे नाणें असेल तर पावशेर किंवा कांहीं नियमित धान्य तेवढेंच सर्वांनीं मोबदल्या ऐवजीं द्यावें व घ्यावें. मोहोर नाणें असले तर सर्व मोहोरांत एकसारखें सोनें असावें, कांहींत कमी व कांहींत अधिक असें असूं नये. रुपया चलनी नाणें असेल तर सर्व रुपयांत सारखेंच रुपें असावें. व याचप्रमाणें सर्व नाण्यांसंबंधी समजावें. कमजास्त असेल तर देवघेवींत अनंत घोटाळे होतील व त्या सुरळीत चालणार नाहींत हें उघड आहे.

तिसरा गुण नाण्यामध्यें जरूर असावा तो हा कीं, त्या नाण्याचे अंगीं स्वतःची किंमत येण्याची शक्ति असावी. ह्मणजे जरी तीं नाणीं मोडलीं तरी त्यांची किंमत इतर जिनसांप्रमाणें उभी रहावी. अशी आंगची किंमत असण्याचा हेतु इतकाच आहे कीं, तसलीं नाणीं असलीं ह्मणजे लोकांचे मनात विशेष खात्री उत्पन्न होते. आतां कोणी असें ह्मणतील कीं सरकारी ब्यांकनोटा, मनीआर्डर, सावकारांच्या हुंड्या वगैरे यांचे अंगीं त्यांची स्वतःची किंमत नसतांना तीं नाण्याप्रमाणें कशीं चालतात? त्यांस उत्तर इतकेंच, जरी त्यांचे अंगीं सोन्याप्रमाणें स्वतःची किंमत नाहीं तथापि त्या सरकारची अथवा सावकारांची लोकांत मोठी पत असते कीं ते कागद दाखवितांच रुपये मिळतील सबब त्या पतीमुळें ते कागद नाण्याप्रमाणें चालतात. अशी पत नसेल तर त्या नाण्यांस कोणीही पुसणार नाहीं. आतां अशीं आंगची किंमत येण्यास तो पदार्थ केवळ श्रमसाध्य असून त्या पदार्थाचा नाण्याहून अन्य उपयोग करता यावा तरच तशी आंगची किंमत येईल, नाहीं तर येणार नाहीं. तर असे पदार्थ ह्मटले ह्मणजे विशेषतः सोनें व रुपें हे होत.

नाण्यांत जरूर असावा असा एक आणखी गुण आहे. तो हा कीं त्या नाण्यानें थोडी जागा व्यापावी परंतु त्या लहान आकारांतच किंमत बहुत असावी. असा गुण नाण्यांत असावा हें फार जरूर आहे नाहीं तर तें नाणें वागविण्यास फार त्रास होईल. अशी कल्पना करा कीं सरकारानें रुपये किंवा विलायतेंतील १० रुपयाचें सोन्याचें नाणें पाउंड हें बंद केलें व सर्वत्र तांब्याचे पैसे सुरू केले. तर हजार रुपये महिनेवाल्यास सर्व खुर्दा दिला किंवा एकादें घर किंवा मौल्यवान पदार्थ विकून रुपये ५०००चा खुर्दाच आला तर वागविण्यास किती त्रास पडेल? हें सांगण्यास नको. सबब सर्व पदार्थांपेक्षां सोन्याचे अंगीं हाही गुण विशेष आहे हें सहजच ध्यानांत येईल. हे वरील सर्व गुण सोनें व रुपें यांचे अंगीं असून शिवाय आणखी त्यांचे अंगीं गुण आहेत ते हे कीं तीं नाणीं फार दिवस टिकतात गंजत व कुजत नाहींत व त्यांचीं नाणींहीं त्या धातु विशेष घनवर्धनीय असल्यामुळें लौकर नाणीं पाडता येतात. या सर्व कारणांवरून सोन्यारुप्याचीं नाणीं सर्व सुधारलेल्या देशांनीं घेतलीं आहेत हें उघड आहे. आतां तांब्याचीं नाणीं करतात याचा हेतु एवढाच कीं जर पावआण्याचें चांदीचें नाणें पाडलें तर हल्लीच्या चवलीचा आठवा हिस्सा होईल व जतन करण्यास त्रास पडेल. सबब किरकोळ देवघेवीचे साधनार्थ मात्र तीं नाणीं केलीं आहेत असें समजावें.

( पुढें चालू. )

---

## नोटिस

तुळशी मर्द कुक्या जाधव रहाणार मौजे कारंजे तालुके बाळापुर इला कुक्या वल्लद हरी जाधव मुक्काम डाबकी तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको आहेस, तुला एक मुलगी झालेली आहे व तूं मजपाशीं राहून संसार करीत असतां अलीकडे ६ महिने बापाचे घरीं राहिली आहेस. मी बोलावीत असतां येत नाहींस व तुझा बाप ह्मणतो कीं कारंजांत त्याच्या शेजारी येऊन रहावें पण तसें करण्यास माझी सोय नाहीं मी डाबकींत आपले चुलत्याजवळ रहात आहे तेथें तूं जनरीतीप्रमाणें येऊन माझा संसार करावा तुझ्यावाचून माझी भाकर तुकड्याची वगैरे फार हरकत आहे. व तूं येत नाहींस ह्मणून मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोचतांच मुकाट्यानें तूं माझे गावीं निघून यावें. आपले बापाचे फंदांत शिरून नादी लागूं नये. त्यांत तुझे नुकसान निघेल व खराबी होईल. ८ दिवसाचे आंत तूं माझेकडे आली नाहींस तर कायदेशीर रीतीनें सरकारांतून तुला आणवून घेण्याची तजवीज करीन व तूं दुसरा विच्यार करशील तर तुजवर फौजदारी करून तुला नशीयत देववीन कळावें ता. २४ आगष्ट सन १८७६ इसवी.

ताजाकलम गणू वल्लद हैबती तुझा बाप याजकडे माझीं संसाराचीं भांडीं तांब्यापितळेचीं व तुझ्या अंगावरील डागिने सुमार ५० रुपयांचे आहेत ते समागमे घेऊन यावें नाहींपेक्षां दिवाणींत दावा करीन.

( सही ) कुक्या वल्लद हरी जाधव
याचे हातची रेघ.

---

## जाहिराती.

ADVERTISEMENT.

Sealed tenders will be received by the Khamgaum Municipality at the office in the Cucherry up till Noon on Friday the 15th September 1876, for the construction of a tramway at the Lessee's own expense from the Railway station to the factories in the town to be worked by the Lessee, who will be allowed to run lorries, but not worked by steam.

The Lessee will have to make his own arrangements as to laying down the tramway, and working it from the gates, of the factories to the buildings, also he will have to make his own arrangement with Fxecutive Engineer in charge of State Raillway to carry the tramway to the goods shed. The tenderer will have to deposit 5000, Rupees in money or Government Securities on acceptance of the tender as a guarantee that the work will be completed by the 15th November 1876. The Municipality do not bind themselves to accept the highest or any tender.

The tenderer should produce letters showing what Cotton Psess Co's have agreed to his constructing and working tramway within their limits.

D. W. Laughton, Major
Vice Presedent
Municipality

Khamgaum, 23 rd
Augast 1876.

---

जाहिराती.

जाहिरात देण्यांत येते कीं, खामगाव एथील रेलवे स्टेशनापासून शहरांतील फ्याक्टऱ्या पावेतों कंट्राक्टरानें ( पट्टा घेणारानें ) आपले खर्चानें ट्रामवे बांधून उपयोग करण्याची व वाफेचे सहायाशिवाय चालणारी लारिसें चालण्याची परवानगी दिली जाईल. ज्या लोकांची पट्टा घेण्याचि खुषी असेल, त्यांणीं आपलीं मोहोरबंद टेंडरें शुक्रवार तारीख १५ माहे सपटेंबर सन १८७६ रोजीं दोनप्रहर पावेतों मुनसिपल कमेटीचे आफिसांत ( कचेरींत ) पाठविलीं असतां घेतलीं जातील.

पट्टा घेणारानें फ्याक्टरीचे दरवाजापासून फ्याक्टरीपर्यंत ट्रामवे बांधणें, व त्याचा उपयोग करणें ह्याविषयींचा बंदोबस्त त्यास फ्याक्टरीचे मालकाबरोबर करावा लागेल, तसेच ( गुडसशेड ) रेलवेकडील माल ठेवण्याचे जागेपर्यंत ट्रामवे नेण्याचा बंदोबस्त स्टेटरेलवेचें काम पाहाणारे एक्झिक्युटिव इंजिनियर याजबरोबर करावा लागेल.

टेंडर देणारा याचें टेंडर ग्राह्य झाल्यावर त्याणें काम तारीख १५ नोवेंबर सन १८७६ पावेतों पुरें केलें पाहिजे. व त्याचे हमीबद्दल रुपये ५००० रोख अगर गव्हर्मेंट सिक्युरिटीज अमानत ठेविल्या पाहिजेत.

म्युनिसिपलकमिटी मोठ्या रकमेचें अगर कोणतेंही टेंडर ग्रहण करण्याबद्दल जबाबदार नाहीं.

टेंडर देणारानां कोण कोणते कपासी दाबण्याचे कारखानदारानीं ट्रामवे त्यांचे हद्दींत बांधूं देणें व उपयोग करूं देण्याचें कबूल केलें आहे, त्यांचीं पत्रें हजर केलीं पाहिजेत. मुक्काम खामगाव तारीख २२ माहे आगष्ट सन १८७६ इसवी

D. W. Laughton Mejor.
व्हाइस प्रेसिडेंट
खामगाव म्युनिसिपलकमेटी

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................. १ रुपया
नेटिव लोक .... ............. ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

---

## जाहिरात

## IN THE PRESS

THE CODE OF CIVIL PROCEDURE

Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2--8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3 afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.

PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.